CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | सोमवार, १४ ऑक्टोबर २०२४ । युगाब्द ५१२५ । वर्ष ४० वे अंक ३४४ । पाने १२ । किंमत रु. ६/- | RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com



सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित



## महत्त्वाचे

### आंध्रच्या किनारपट्टीवरही होणार क्षेपणास्त्र चाचणी



**नवी दिल्ली :** एकीकडे भारतातील संरक्षण संशोधक मोठ्या प्रमाणात धोरणात्मक क्षेपणास्त्रे विकसित करीत असताना सुरक्षा कॅबिनेट समितीने (सीसीएस) आंध्रप्रदेशामध्ये नवीन क्षेपणास्त्र चाचणी केंद्र स्थापन करण्यास मंजुरी दिली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली मागील आठवड्यात झालेल्या बैठकीत सीसीएसने हा प्रस्ताव मंजूर केला. या प्रस्तावानुसार आंध्रप्रदेशातील नागयलंका परिसरात नवीन क्षेपणास्त्र चाचणी केंद्र उभारले जाणार आहे. विविध प्रकल्पांच्या माध्यमातून डीआरडीओने विकसित केलेली रणगाडाविरोधी क्षेपणास्त्रे, जमिनीवरून हवेत मारा करणारी यंत्रणेसारख्या धोरणात्मक क्षेपणास्त्र यंत्रणांची नवीन चाचणी केंद्रावर चाचणी घेतली जाईल, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली. मागील आठवड्यात झालेल्या बैठकीत अमेरिकेकडून ३१ प्रिडेटर ड्रोन्स घेण्यास तसेच प्रोजेक्ट एटीव्हीच्या अंतर्गत दोन अणुपाणबुड्या बांधण्यासही मंजुरी देण्यात आली.

### भारताची सर्वोच्च टी-२० धावसंख्या

**हैदराबाद :** येथील राजीव गांधी आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या बांगलादेशविरुद्धच्या तिसऱ्या व अंतिम टी-२० आंतरराष्ट्रीय्र क्रिकेट सामन्यात विजय मिळवताना २९७ अशी टी-२० आंतरष्ट्रीय क्रिकेट सामन्यातील सर्वोच्च धावसंख्या उभारली. भारतीय फलंदाजांनी बांगलादेशला कोणतीही दयामाया न दाखवता चौकर-षट्कारांचा पाऊस पाडला. अवघ्या ३ धावांच्या अभावामुळे भारताचे त्रिशतक राहिले. भारतीय फलंदाजांनी एकूण २२ षट्कार व २५ चौकार खेचले. यात भारताने विक्रमी १८ षटके दहा किंवा त्याहून अधिक धावा काढल्या. बांगलादेशच्या तीन गोलंदाजांनी ५० किंवा त्याहून अधिक धावा दिल्या. २६ डॉट बॉलपैकी दोन नो-बॉल, एक झेल सोडला व एक धावबाद हुकला. संजू सॅमसनने ११ चौकार व ८ षट्कार, अभिषेक शर्माने एक षट्कार, सूर्यकुमार यादवने ८ चौकार व ५ षट्कार, रियान परागने एक चौकार व ४ षट्कार, हार्दिक पांड्याने प्रत्येकी ४ चौकार व षट्कार व रिंकू सिंगने एक षट्कार ठोकला.

### आसाम-भूतानमध्ये भूकंप

**गुवाहाटी :** आसाममधील उदलगुरीमध्ये रविवारी ४.६ रिश्टर स्केल भूकंपाचे सौम्य धक्के बसले. यामुळे आसामसह शेजारील देश भूतानच्या अनेक भागांना हादरे जाणवले आहेत. नॅशनल सेंटर फॉर सिस्मॉलॉजीनुसार (एनसीएस), भूकंपाचा केंद्रबिंदू आसाममधील उदलगुरीजवळ १५ किलोमीटर खोलीवर होता. आसाममधील ढेकियाजिली, तवांग, बारपेटा, गोलपारा, उत्तर लखीमपूर, इटानगर, जोरहाट, तेजपूर, गोलाघाट, गुवाहाटी, नागावसह अनेक भागांत भूकंपाचे धक्के जाणवले.

### पोलिस उपायुक्तांच्या मुलाने केली आत्महत्या

**छत्रपती संभाजीनगर :** मी जीवनाचा आनंद घेतला आहे, मी माघार घेत नसून मला नवी सुरुवात करायची आहे, लव्ह यू बोथ असे खोलीतील आरशावर लिहून ठेवत पोलिस उपायुक्त शीलवंत नांदेडकर यांच्या एकुलत्या एका मुलाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना घडली.

# महायुतीने मुख्यमंत्रीपदाचा चेहरा पहिल्यांदा जाहीर करावा : ठाकरे

## • महाविकास आघाडीकडून युती सरकारचा 'गद्दारांचा पंचनामा' प्रसिद्ध



**मुंबई, दि. १३ ऑक्टोबर :** येत्या दोन दिवसात विधानसभा निवडणुकीसाठी आचारसंहिता लागू होण्याची शक्यता असताना राज्यातील विरोधी महाविकास आघाडीने प्रचारात आघाडी घेत सत्तारूढ महायुती सरकारच्या काळ्या कारभाराचा 'गद्दारांचा पंचनामा' रविवारी प्रसिद्ध केला . आघाडीचे शिल्पकार व राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे, आणि काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत त्यांचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी सत्तारूढ सरकारले पहिल्यांदा मुख्यमंत्री पदाचा चेहरा जाहीर करावा त्यानंतर लगेचच आम्ही आमचा मुख्यमंत्री पदाचा उमेदवार जाहीर करू असे आव्हान उद्धव ठाकरे यांनी दिले. त्याला शरद पवार व पटोले यांनी संमती दर्शवित मविआत नेतृत्वाच्या प्रश्न नाही व खुर्चीसाठी वादही नाहीत, आमच्यात एकमत आहे. ही निवडणूक मविआ विरुदध महायुती अशी असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी पटोले म्हणाले की, ' शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाला ज्यांनी विरोध केला त्याच विचाराचे लोक आज सत्तेत आहेत. या सरकारच्या भ्रष्टाचारामुळेच मालवणमध्ये शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळून विटंबना करण्याचे पाप केले, परंतु देवेंद्र फडणवीस यांनी अद्याप माफी मागितली नाही. शिवाजी महाराज, शाहू, फुले व आंबेडकरांच्या महाराष्ट्राला कलंक लावण्याचे पाप गुजरात धार्जिणे सरकारने केले आहे, या सरकारला सत्तेतून बाहेर काढणे, हेच महाविकास आघाडीचे लक्ष्य आहे, असे सांगून ते म्हणाले की, माजी मंत्री आमदार बाबा सिददीकी यांच्या हत्येने महाराष्ट्र हादरला. शाळेतील मुली, महिला, राज्यातली जनता सुरक्षित नाही आता तर सत्तेतील लोकही सुरक्षित नाहीत. कायदा सुव्यवस्था बिघडली आहे आता महायुतीच्या मंत्र्यांचे राजीनामे मागितले जाणार नाहीत तर जनताच यांना सत्तेतून खाली खेचेल. पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला यांना असंवैधानिक पद्धतीने पदावर बसवले आहे, काँग्रेसने त्याची निवडणूक आयोगाकडे तक्रार केली आहे. राजकीय फायद्यासाठी सत्ताधारी पक्ष त्यांच्या विचारांच्या अधिकाऱ्यांना महत्वाच्या पदावर बसवून लोकशाहीचा खुन करण्याचे काम करत आहे, रश्मी शुक्ला हे त्याचेच एक उदाहरण आहे.

यावेळी उद्धव ठाकरे म्हणाले की, बाबा सिद्दीकींची हत्या होईपर्यंत यंत्रणा काय करत होत्या? फडणवीसांचे सरकार असताना नाना पटोले यांचा फोन टॅप केला जात होता, विरोधकांवर बारीक लक्ष पण गुन्हेगारांवर लक्ष का नाही? ईडी, सीबीआय फक्त विरोधकांसाठीच आहे. महाराष्ट्राच्या राजधानीत जर हत्या होत असेल, महिलांवर अत्याचार होत असतील तर राज्यात कायदा आहे कुठे? अभिषेक घोसाळकर या तरुणाची हत्या झाली त्यावेळी, गाडीखाली कुत्रे आले तरी विरोधक गृहमंत्र्याचा राजीनामा मागितील, असे फडणवीस म्हणाले होते, हे जनतेला कुत्रे म्हणतात. महायुतीने महाराष्ट्राला गुजरातची वसाहत बनवले आहे

काँग्रेसने बंजारा समाजाला काहीच दिले नाही या आरोपाचा समाचार घेत शरद पवार म्हणाले की, काँग्रेसने बंजारा समाजाला राज्याचे नेतृत्व करण्याची दोनदा संधी दिली. वसंतराव नाईक यांना ११ वर्षे मुख्यमंत्रीपद दिले तर सुधाकर नाईक यांनाही मुख्यमंत्री केले. नरेंद्र मोदींनी पंतप्रधानपदाची प्रतिष्ठा राखली पाहिजे असेही पवार म्हणाले.

हरियाणाच्या निकालावर विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना शरद पवार म्हणाले की, महाराष्ट्रातील जनता राज्यात बदल करण्यासाठी उत्सुक आहे. लोकसभा निवडणुकीवेळीही तसेच चित्र होते. मविआने ४८ पैकी ३१ जागा जिंकल्या आणि विधानसभेलाही तसेच परिणाम येतील असा विश्वास पवार यांनी व्यक्त केला. पत्रकार परिषदेला माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, मुंबई काँग्रेसच्या अध्यक्षा खा. वर्षा गायकवाड, खा. संजय राऊत, खा.अरविंद सावंत, खा.सुप्रिया सुळे, खा.अनिल देसाई, आ.आदित्य ठाकरे, नाना गावंडे आदी उपस्थित होते.

### निर्णयाची अंमलबजावणी होईल का : शरद पवार

महायुती सरकारने मंत्रिमंडळात धडाधड निर्णय घेतले पण त्यातील किती निर्णयांची अंमलबजावणी होईल. महाराष्ट्राच्या प्रशासनाचा देशात लौकिक होता पण महायुती सरकराच्या काळात ही प्रशासकीय व्यवस्था उद्ध्वस्थ झाली आहे, त्याची महाराष्ट्राला मोठी किंमत मोजावी लागत आहे. प्रशासन व्यवस्था उद्ध्वस्त करणाऱ्यांच्या हातून महाराष्ट्र वाचवावे लागेल आणि त्यासाठी मविआ प्रयत्न करत आहे, असेही शरद पवार म्हणाले.



# ना युती, ना आघाडी
# मनसे स्वबळावर लढणार

## राज ठाकरेंची घोषणा

**तभा वृत्तसेवा/ विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि.१३ ऑक्टोबर-** राज्यातील राजकारण अत्यंत खालच्या स्तरावर सुरू असून कोण कुठे जात आहे याचा कोणालाच स्थान पत्ता लागत नाही, त्यामुळे मनसे ही निवडणूक कोणाशीही युती, आघाडी न करता स्वबळावर लढणार आहे. अशी घोषणा मनसेचे प्रमुख राज ठाकरे यांनी रविवारी केली.

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर गोरेगावातील मेस्को येथे झालेल्या मेळाव्यात पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते यावेळी त्यांनी राज्यात परिवर्तन घडवून विकास साकडे नेण्यासाठी, आम्हाला संधी द्या, असे आवाहनही केले. राज्य सरकार मुख्यमंत्री एकनाथ शिंदे माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यासह शरद पवार यांच्यावर कडाडून टीका केली.ते म्हणाले, निवडणुकीसाठा जागा वाटपाची चर्चा सुरू असताना प्रत्येकवेळी विचारावं लागतंय की हा नेता आता कुठे आहे. निष्ठा वगैरे नावाची गोष्ट आहे की नाही? आणि महाराष्ट्रातील जनता यांना भरभरून मतदान करते. हे यांचे राहिले नाहीत, तुमचे काय राहणार. अशी अवस्था महाराष्ट्राची करून ठेवली'', कालचा दसरा मेळावा पाहिला. उद्धव ठाकरे इतिहासातून बाहेरच येत नाहीत. सारखे वाघनखे काढतात, इथून अफजल आला, शाहिस्तेखान आला. अरे महाराष्ट्राबद्दल बोल. तिकडे पुष्पाचं वेगळंच चालू आहे. एकनाथ शिंदे, मै आयेलाय असं म्हणत त्यांनी एकनाथ शिंदे यांची मिमिक्री करून दाखवली. मी असा महाराष्ट्र कधीच पाहिला नाही. कोण निवडून आला, कोणाला मतदान केलं, सध्या ते काय करतात अशा पद्धतीने महाराष्ट्रात मी पाहिलंच नाही.

मला कळेच ना काय सुरूय?'' अशी टीका करून ते म्हणाले की,शरद पवार सांगतात आमचा पक्ष फोडला, तुम्ही काय केलंत आयुष्यभर? १९७८ ला काँग्रेस फोडली, १९९१ ला शिवसेना फोडली, त्यानंतर नारायण राणेंना फोडलं, तुम्ही कसल्या फोडाफोडीच्या गोष्टी बोलताय? आणि मी आता अजित पवारांबद्दल बोलतच होतो. आता गुलाबी जॅकेट घालून फिरतात. कोणी सांगितलं माहिती नाही. भाजपा यांना स्वीकारतो तरी कसा? अजित पवार भाजपात यायच्या ८ दिवस अगोदर मोदी म्हणाले होते की ७० हजार कोटींचा भ्रष्टाचार करणाऱ्या लोकांना जेलमध्ये टाकू. पण जेलमध्ये टाकण्याएवजी त्यांना मंत्रिमंडळात टाकलं. हे का होतंय?''असा प्रश्नही राज ठाकरेंनी महाराष्ट्राच्या जनतो विचारला. असेही राज ठाकरे म्हणाले.

### मराठी भाषा भवन उत्तम आणि दर्जेदार व्हावे

◆ **मुंबई, १३ ऑक्टोबर**
माय मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाल्याने आता मराठी भाषेचा डंका अधिक जोमाने सर्वत्र गाजणार आहे. मराठी भाषेच्या संवर्धन आणि विकासासाठी मुंबईत होत असलेले मराठी भाषा भवन उत्तम आणि दर्जेदार व्हावे, असे सांगून भाषा भवनाच्या माध्यमातून मराठी भाषा अधिक समृद्ध आणि प्रगल्भ करण्यासाठी जोमाने काम करूया, असे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले.



जवाहर बाल भवन परिसरात उभारण्यात येणाऱ्या मराठी भाषा भवनचे भूमिपूजन मुख्यमंत्री शिंदे यांच्या हस्ते दूरदृश्य प्रणालीद्वारे करण्यात आले. मुख्यमंत्री म्हणाले, मराठी भाषा भवनासाठी चांगली जागा उपलब्ध झाली असून, भवनाचे भूमिपूजन आज सागराच्या साक्षीने होत आहे, याचा आनंद आहे. भाषा भवनाचे काम अतिशय दर्जेदार व्हावे, असे सांगून या भाषा भवनाच्या माध्यमातूफन मराठी भाषेच्या संवर्धन, संशोधन आणि प्रसारासाठी अधिक बळ मिळेल, असा विश्वास व्यक्त केला. भाषा भवनसाठी साहित्यिक व अन्य क्षेत्रातून आलेल्या सूचनांचा आदर केला जाईल, असे ते म्हणाले. दोन हजार वर्षांपेक्षा अधिक जुनी माय मराठी भाषा असल्याचे सिद्ध झाले असून, मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळण्यासाठी अनेकांचे योगदान मिळाले आहे. सर्वांनी केलेल्या सकारात्मक प्रयत्नामुळेच मराठी भाषेला अभिजात दर्जा प्राप्त झाला, असे शिंदे म्हणाले. संतांनी अभंग, गवळण, भारुड यातून मराठी भाषेचे सौंदर्य समोर आणले, मराठी भाषेच्या वैभवात भर घातली. ज्ञानपीठकार आणि सर्व साहित्यिकांनी मराठी भाषा समृद्ध केली, असे सांगून मराठी भाषेच्या विकासासाठी जे करता येईल, ते केले जाईल, अशी ग्वाही दिली. (तभा वृत्तसेवा)

# बाबा सिद्दिकी यांच्या हत्येप्रकरणी तिघांना अटक

### विजयादशमीच्या रात्री मुंबईत थरार

◆ **मुंबई, १३ ऑक्टोबर**
राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते, माजी मंत्री बाबा सिद्दिकी यांची मुंबईच्या वांद्र्यातील खेरवाडी परिसरार हत्या करण्यात आली. बाबा सिद्दिकी यांच्यावर तीन हल्लेखोरांनी रात्री ९.३० वाजताच्या सुमारास गोळीबार केला. त्यांच्यावर ६ गोळ्या झाडण्यात आल्या. त्यातील तीन गोळ्या त्यांना लागल्या असून, एक गोळी छातीवर आणि दोन पोटात लागल्या. सिद्दिकींना तातडीने लिलावती रुग्णालयात दाखल करण्यात आले; मात्र उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. याप्रकरणी तीन आरोपींना अटक करण्यात आली आहे.



देवी विसर्जनाच्या मिरवणुका सुरू असल्याने बॅण्डचा आवाज आणि फटाक्यांच्या आतषबाजीत गोळीबार झाला. सिद्दिकी यांना गोळी लागली, हे इतरांना कळलेच नाही. सिद्दिकी आपला आमदार मुलगा झिशानच्या कार्यालयातून निघून गाडीत बसत असताना गोळीबार करण्यात आला. उपस्थित कार्यकर्त्यांना लक्षात येताच त्यांनी सिद्दिकी यांना तातडीने लिलावती रुग्णालयात दाखल केले. रुग्णालयात पोहोचेपर्यंत मोठ्या प्रमाणात रक्तस्राव झाला होता.

या घटनेतील तीन आरोपींपैकी करनैल सिंग हा हरयाणाचा तर, धर्मराज कश्यप हा उत्तरप्रदेशचा रहिवासी आहे. तिसरा आरोपी अद्याप फरार असून, मुंबई पोलिस केंद्रीय तपास यंत्रणांच्या सहायाने तपास करीत आहेत. या संशयीत आरोपींचे तार बिष्णोई टोळीसोबत जुडले असल्याची प्राथमिक माहिती पुढे आली आहे. सिद्दिकी यांच्या हत्येसाठी चार जणांना सुपारी देण्यात आली होती. विशेष म्हणजे, हे आरोपी पंजाबच्या एका कारागृहात होते. तिथेच त्याचा संपर्क बिष्णोई टोळीसोबत आला. तिथेच सिद्दिकींच्या हत्येचा कट रचण्यात आला. कारागृहातून बाहेर आल्यानंतर त्यांना मुंबईला पाठवण्यात आले. २ सप्टेंबरला हे आरोपी मुंबईत आले. त्यांनी कुर्ल्यात एक खोली भाड्याने घेतली. त्याचे भाडे १४ हजार रुपये ठरले होते. तिथे राहत असताना हे आरोपी बाबा सिद्दिकींवर नजर ठेवून होते. त्यांनी रेकीही केली होती. सिद्दिकी कधी आणि कुठे जातात, यावर त्यांची नजर होती. (तभा वृत्तसेवा)

### कठोर कारवाई करू : मुख्यमंत्री

बाबा सिद्दिकी हत्येतील तिन्ही आरोपींवर कठोर कारवाई होईल. प्रकरण फास्ट ट्रॅकमध्ये चालवण्यासाठी न्यायलयाला विनंती कलू. गुन्हेगारांवर जबर बसेल अशी कारवाई करण्याचा निर्देश दिला आहे, अशी माहिती मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली. मुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, बाबा सिद्दिकी यांच्यावर गोळीबार झाल्याची दुर्दैवी घटना घडली. याप्रकरणी तीन आरोपींना पोलिसांनी अटक केली. एक आरोपी हरयाणा आणि एक आरोपी उत्तरप्रदेशाचा आहे. मुंबईतील कायदा सुव्यवस्था कुणीही हातात घेता कामा नये, टोळीयुद्ध डोके वर काढता कामा नये, असा आदेश पोलिसांना दिला आहे.

### उत्तराखंडात रुळावर आढळले सिलेंडर

# लष्करी साहित्याची मालगाडी उलटवण्याचा कट उधळला

◆ **रुरकी, १३ ऑक्टोबर**
गेल्या काही दिवसांपासून रेल्वेच्या रुळावर गॅस सिलेंडर किंवा अडथळे निर्माण करून रेल्वेसेवा बाधित करण्याचे किंवा मोठ्या अपघाताचे षडयंत्र रचले जात आहे. अशीच एक घटना उत्तराखंड येथील रुरकीमध्ये समोर आली आहे. येथे रेल्वेच्या रुळावर एक सिलेंडर ठेवण्यात आला होता. सिलेंडर ठेवलेल्या रुळावरून लष्करासाठीचे साहित्य वाहून नेणारी मालगाडी जाणार होती. मात्र, सुदैवाने चालकाच्या सतर्कतेमुळे हा अपघात टळला.

रुरकीच्या ढंडेरा रेल्वे स्टेशनजवळ रेल्वेच्या रुळावर एलपीजी सिलेंडर हस्तगत करण्यात आला आहे. चालकाने रेल्वेच्या रुळावर गॅस सिलेंडर पाहिले आणि तत्काळ इमर्जन्सी ब्रेक लावत गाडी थांबवली. चालकाने याची माहिती तातडीने मुरादाबाद येथील रेल्वे नियंत्रण कक्षाच्या अधिकाऱ्यांना दिली. यानंतर तत्काळ रेल्वेच्या सुरक्षा रक्षकांनी घटनास्थळी येत रेल्वे रुळावरील सिलेंडर हटवले. पोलिस या घटनेचा तपास करीत आहेत.



अज्ञात लोकांविरुद्ध गुन्हा

घटनेची माहिती मिळाल्यानंतर सुरक्षा यंत्रणा आणि रेल्वे कर्मचाऱ्यांनी रेल्वे रुळावर जवळपास ५ किमीपर्यंत तपास अभियान चालवले. मात्र, रुळावर सिलेंडर कुणी ठेवले, याची माहिती अद्याप समोर आलेली नाही. सापडलेले गॅस सिलेंडर ढंडेरा रेल्वे स्टेशनच्या स्टेशन मास्तरजवळ ठेवण्यात आला आहे. या प्रकरणी अज्ञात लोकांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. (वृत्तसंस्था)

### माजी प्राध्यापक साईबाबाचा हैदराबादेत मृत्यू

◆ **हैदराबाद, १३ ऑक्टोबर**
दिल्ली विद्यापीठाचा माजी प्रा. जी. एन. साईबाबा याचे हैदराबाद येथे निधन झाले. मुंबई उच्च न्यायालयाने ७ महिन्यांपूर्वी माओवाद्यांशी संबंध असल्याच्या प्रकरणातून त्याची निर्दोष मुक्तता केली होती. त्यांच्यावर गेल्या २० दिवसांपासून हैदराबादच्या निजाम इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेसमध्ये उपचार सुरू होते. तो मूळचे आंध्रप्रदेशचा राहणारा होता.

यावर्षी मार्चमध्ये मुंबई उच्च न्यायालयाने माओवाद्यांशी संबंध असल्याच्या प्रकरणात साईबाबाला दोषमुक्त केले होते. त्याच्यावर हा खटला १० वर्षे सुरू होता. दिल्ली विद्यापीठाच्या राम लाल आनंद महाविद्यालयात तो इंग्रजीचा प्राध्यापक होता. माओवाद्यांशी संबंध असल्याच्या आरोपावरून महाराष्ट्र पोलिसांनी त्याला अटक केली होती. त्यानंतर २०१४ मध्ये त्याला महाविद्यालयाने निलंबित केले होते.

उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने मार्चमध्ये साईबाबा आणि अन्य पाच जणांना कथित माओवादी संबंधांच्या प्रकरणातून दोषमुक्त केले होते. त्यांच्याविरुद्ध खटला सिद्ध करण्यात फिर्यादी पक्ष अपयशी ठरला होता. न्यायालयाने त्याची जन्मठेपेची शिक्षाही रद्द केली होती. (वृत्तसंस्था)

# २१ ऑक्टोबरला होणार आकाशात दिवाळी!

◆ **अकोला, १३ ऑगस्ट**
सद्य:स्थितीत निसर्ग विविध प्रकारच्या रंगांनी बहरला असून, त्याला आकाशही साजेशी साद देत असल्याने सर्वत्र उत्साह आहे. अशा या वातावरणात बहुपरिचित असलेल्या मृग नक्षत्रातून सोमवार २१ च्या रात्री ११ नंतर पूर्वेच्या आकाशात विविध रंगांच्या उल्का पडताना पाहता येतील. पहाटे त्यांचा जोर वाढेल. दिवाळीपूर्वीच आकाशात विविध रंगांची उधळण होणार आहे. या आनंदोत्सवात सहभागी होण्याचे आवाहन विश्वभारती केंद्राचे प्रमुख व खगोल अभ्यासक प्रभाकर दोड यांनी केले आहे.

'शनी आणि चंद्र पिधान' सूर्यमालेत सर्वाधिक सुंदर असलेला वलयांकित शनी ग्रह सध्या पूर्व क्षितिजावर दिसत असून, १४ ला हा ग्रह चंद्राच्या खूप जवळ येत असल्याने ग्रहणासमान पृथ्वी, चंद्र आणि शनी एका रेषेत आल्याने शनी काही भागात काही कालावधीकरिता चंद्रबिंबाआड झाकला जाईल, तर काही ठिकाणी या दोघांमधील अंतर कमी असेल.

### उल्कापात ठळक दिसणार



१६ ऑक्टोबरच्या पहाटे ५.९ ते ५.१३ या वेळेत आंतरराष्ट्रीय अवकाश स्थानक नैर्ऋत्य ते ईशान्य आकाशात ठळक चांदणी रूपात जाताना दिसेल, ते सुपरिचित असलेल्या अंतराळ संशोधक सुनीता विलियम्स व अन्य १० जणांचे निवास व प्रशिक्षण केंद्र असून, त्याचा वेग एका सेकंदाला सुमारे साडेसात किमी आहे. ही महाकाय वस्तू गुरू ग्रहाजवळून सप्तर्षी समूहाकडे भ्रमण करताना पाहता येईल, असे प्रभाकर दोड यांनी सांगितले.

**सुपर मून दर्शन**

नेहमीच्या पौर्णिमेला दिसणारा चंद्र १७ च्या रात्री पृथ्वीच्या जवळ ३,५७,२०० किमी अंतरावर राहणार असल्याने १४ टक्के मोठा आणि ३० टक्के अधिक प्रकाशमान दिसेल. १९ रोजी रात्री चंद्र ६ तारकांचा पुंज म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कृत्तिका नक्षत्राच्या जवळ पाहता येईल. (तभा वृत्तसेवा)

# शक्तिसॅट मिशनमधून १०८ देशांतील १२ हजार मुलींना प्रशिक्षण

### चांद्रयान-४ मोहिमेत होणार प्रक्षेपण

◆ **नवी दिल्ली, १३ ऑक्टोबर**
अंतराळ तंत्रज्ञानात १०८ देशांतील जवळपास १२ हजार मुलींना प्रशिक्षण देणारी एरोस्पेस स्टार्टअप कंपनी 'किड्झ इंडिया'ची शक्तिसॅट ही जागतिक मोहीम सुरू झाली असून, त्यासाठी चांद्रयान-४ मोहिमेतून उपग्रह प्रक्षेपित केला जाईल. अंतराळ संशोधनासाठी आंतरराष्ट्रीय सहकार्य वाढवण्याचा उद्देश यामागे आहे.




राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू नोव्हेंबरमध्ये याच्या अधिकृत फलकाचे अनावरण करतील, अशी माहिती कंपनीने दिली. अंतराळ तंत्रज्ञानातील पेलोड डेव्हलपमेंट, अंतराळ यंत्रणेसारखी तंत्रज्ञानातील विविध आयाम १२ ते १८ वर्षे वयोगटातील मुलींना समजवून सांगण्यासाठी या मोहिमेंतर्गत १२० तासांचे ऑनलाईन प्रशिक्षण दिले जाईल, अशी माहिती शक्ती मोहिमेचे नेतृत्व करणाऱ्या डॉ. केसन यांनी दिली.

ब्रिटन, संयुक्त अरब अमिरात, ब्राझील, केनिया, ऑस्ट्रेलिया, फ्रान्स, ग्रीस, श्रीलंका आणि अफगाणिस्तान या देशांतील मुलीही यात सहभागी होणार आहेत. सहभागी देशातून १०८ विद्यार्थ्यांना गुंतवून मिशन प्रतिभेचे पालनपोषण, आंतरराष्ट्रीय सहयोग वाढवणे आणि अंतराळ विज्ञानाच्या अफाट शक्यतांमध्ये रस निर्माण करण्याचा प्रयत्न करणे, शेवटी जगभरातील लाखो तरुण मुलींना प्रेरणा देणारा एक प्रभाव निर्माण करणे हा उद्देश यामागील असल्याचे एका निवेदनात कंपनीने म्हटले आहे. (वृत्तसंस्था)

सोलापूर
SOLAPUR TARUN BHARAT
तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित






शुभेच्छुक :
सर्व शिवसेना नेते, महिला आघाडी, युवा सेना, पदाधिकारी व कार्यकर्ते
शिवसेना सांगोला विधानसभा मतदार संघ

## अग्रलेख...

# सामर्थ्यशाली राष्ट्राची आराधना आवश्यक

'धर्म व संस्कृती आणि सनातन मूल्यांच्या रक्षणासाठी आणि स्वतःच्या अस्तित्वासाठी हिंदूंची एकजुटता अतिशय आवश्यक असून, आताच जर एक झालो नाही तर हिंदू समाज दुर्बल होऊन भविष्यात त्याचे गंभीर परिणाम भोगावे लागतील. सद्भाव आणि सहिष्णुतेचे रक्षण बलसंपन्न समाजच करू शकतो. दुर्बलता घातक असून, जग दुर्बल लोकांना महत्त्व देत नाही तर सामर्थ्यशाली, शक्तिसंपन्न लोकांचीच सर्वत्र पूजा होते' हा सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांनी विजयादशमीच्या पर्वावर दिलेला संदेश समस्त हिंदू समाजाच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचा आणि हिंदूंना आत्मचिंतन करण्यास व अंतर्मुख होण्यास प्रवृत्त करणारा आहे. हिंदू समाजाला व भारताला दुर्बल करणाऱ्या शक्तींचे अंतःस्थ हेतू ओळखून या देशद्रोही शक्तींचा पाडाव करण्यासाठी राष्ट्रभक्त नागरिकांनी सक्रिय होण्याच्या आवश्यकतेवरही सरसंघचालकांनी आपल्या भाषणात भर दिला. हिंदू समाजाला आपले स्वत्व, स्वाभिमान, शौर्य, पराक्रम, उदात्त संस्कृती, शाश्वत मूल्ये, भव्य-दिव्य परंपरा, इतिहास, विजयी वारसा यांचा विसर पडला आणि त्यामुळेच आज विविध प्रकारची सांस्कृतिक व वैचारिक आक्रमणे हिंदूंवर होत असून, समाजाला दुर्बल करीत आहेत, याविषयी सरसंघचालकांनी आम्हा सर्वांनाच सजग, सावध केले आहे. वस्तुस्थिती ही आहे की, ज्या देशाला किंवा ज्या देशातील नागरिकांना आपल्या उज्ज्वल इतिहासाचा आणि भूगोलाचा विसर पडतो तेव्हा ते राष्ट्र एकतर दुर्बल होते किंवा विभाजित होते किंवा त्या राष्ट्राचा विनाश तरी होतो. आज अफगाणिस्तान, पाकिस्तान व वर्तमानातील बांगलादेशातील परिस्थितीतून ही बाब सिद्ध झाली आहे. जेव्हा जेव्हा हिंदू हिंदुत्व विसरला तेव्हा तेव्हा या राष्ट्राचे विभाजन झाले आहे. बांगलादेशातील अल्पसंख्यक हिंदूंवर सध्या अस्तित्वाचेच भयंकर संकट कोसळले आहे. मात्र, तेथील हिंदूंनी काळाची पावले ओळखून एकत्रित होऊन शक्तीचा हुंकार केला आणि त्यामुळेच हिंदू समाजाचे काही प्रमाणात रक्षण झाले. बांगलादेशातील या घटनांचा यथार्थ बोध भारतातील हिंदूंनी घेतला पाहिजे. याचे कारण असे की, विजयादशमी हा पराक्रम, शौर्य, विजिगीषुवृत्तीची आठवण करून देणारा सण आहे. त्यामुळे समस्त हिंदू समाजाने गतवैभव प्राप्त करण्यासाठी व भारतमातेला पुन्हा तिचे गौरवाचे स्थान प्राप्त करून देण्यासाठी तन-मन-धनपूर्वक राष्ट्र आराधना केली पाहिजे. सामाजिक समरसता, पर्यावरण, नागरी कर्तव्य, कुटुंब प्रबोधन आणि स्वआधारित व्यवस्था या पंचसूत्रांच्या आधारावर पुढील वाटचाल करण्याचे सरसंघचालकांनी केलेले आवाहन अतिशय महत्त्वाचे आणि सांस्कृतिक राष्ट्रवादाला बळकटी प्राप्त करून देणारे आहे. केवळ समानतेच्या नाही तर आत्मीयतेच्या पायावर व्यक्ती आणि राष्ट्राचा विचार भारतीय संस्कृतीत केला जातो. भारताच्या राष्ट्रवादाचा उदय स्वार्थासाठी नाही, त्याचा आधार परस्पर संघर्ष नाही तर समन्वय आणि परस्पर अनुकूलता हा आहे. सामूहिक जीवनाची समान अनुभूती सर्व भारतीयांच्या अंतःकरणात निर्माण व्हावी, ही राष्ट्र म्हणून आम्हा सर्वांचीच इच्छा आहे. राष्ट्र जीवनाच्या आधारे मनुष्यात उदात्त तत्त्वे विकसित होऊ शकतात. मानवी जीवनातील श्रेष्ठ गुणांची आराधना भारतीयत्वाची विशेषता आहे. या पृष्ठभूमीवर सरसंघचालकांनी प्रतिपादिलेल्या पंचसूत्रांकडे पाहिले पाहिजे. कोणतेही राष्ट्र बळकट व्हायचे असेल तर समाजातील भेदभाव संपुष्टात यायला हवेत व सर्वांमध्ये ऐक्याची भावना वृद्धिंगत होण्याची आवश्यकता आहे. यासाठीच सामाजिक समरसतेची आवश्यकता आहे. आज पाश्चात्त्यांच्या भोगवादी व चंगळवादी संस्कृतीचा भारतीय जनमानसावर एवढा पगडा आहे की, देशवासीयांना भारताची उदात्त संस्कृती व चिरंतन जीवनमूल्यांचा विसर पडला आहे. त्यामुळेच भारतीयांनी सरसंघचालकांनी सांगितलेल्या पंचसूत्रांचा प्रामाणिकपणे अवलंब केला तर हे राष्ट्र पुन्हा विश्वात अजिंक्य बनू शकते. पाश्चात्त्यांच्या 'युज ॲण्ड थ्रो' आणि जडवादी विचारसरणीमुळे जागतिक स्तरावरच पर्यावरणाचा भीषण प्रश्न निर्माण झाला आहे. विकासाच्या नावाखाली नैसर्गिक साधनसामग्रीचा अंदाधुंद वापर केल्यामुळे भारतासमोरही पर्यावरण संरक्षणाचा गंभीर प्रश्न उपस्थित झाला आहे. तसेच नागरिकांना आपल्या कर्तव्यबुद्धीचा विसर पडल्यामुळे अनेक सामाजिक स्वरूपाचे प्रश्न निर्माण झाले आहेत. राज्यघटनेने आपल्याला जसे मूलभूत अधिकार दिले आहेत तसेच कर्तव्य पालनही सांगितले आहे. मात्र, आम्हा भारतीयांच्या आत्मकेंद्रित वृत्तीमुळे आम्हाला देश व समाजविषयक कर्तव्याचा विसर पडला आणि अधिकार तेवढे लक्षात राहिले. टोकाची व्यक्तिवादी विचारसरणी, 'मी' आणि 'माझे' या पाश्चात्त्य मूल्यांना भारतीयांनी आपल्या जीवनात स्थान दिल्यामुळे संकुचित व आत्मकेंद्रित वृत्ती, कमालीचा स्वार्थ घराघरात, कुटुंबात वाढला. आधुनिक जीवनशैलीमुळे भारतीयांची परंपरागत कुटुंबव्यवस्था उद्ध्वस्त झाली. स्थैर्य, समाधान, समन्वय, सहकार्य, त्याग या मूल्यांवर आधारित कुटुंबव्यवस्थेला हादरे बसल्याने पुन्हा नव्याने कुटुंब प्रबोधन करण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. संस्कार निर्माण करणारी, चारित्र्य घडविणारी, नीतिमूल्यांचे संवर्धन करणारी, शाश्वत जीवनमूल्यांवर आधारित कुटुंब व्यवस्था नव्याने निर्माण करणे हे हिंदू समाजापुढचे मोठेच आव्हान आहे. यासाठी कुटुंब प्रबोधन ही काळाची गरज आहे. भारतीयांना अर्थात हिंदूंना 'स्व'चा विसर पडल्याने प्रत्येक क्षेत्रात परकीयांचे अनुकरण करण्याची वृत्ती बळावली. मग ती राज्यव्यवस्था असो किंवा अर्थव्यवस्था, स्वदेशी अथवा कायदे असो की उद्योग व कृषी क्षेत्र असो. प्रत्येक वेळी परकीयांचे अनुकरण करण्याची वृत्ती अतिशय घातक आणि आणि या देशाच्या अस्तित्वालाच नख लावणारी आहे. त्यामुळे भारताने आपल्या शाश्वत विचारांच्या, अस्सल भारतीय जीवनमूल्यांवर आधारित व्यवस्था विकसित केली पाहिजे आणि त्याचाच अवलंब केला पाहिजे. स्वदेशी निर्मित वस्तू, उत्पादने खरेदी करण्यावर अधिकाधिक भर दिला पाहिजे. त्यामुळे देशातील संपत्ती देशातच राहून कोट्यवधी लोकांना रोजगार मिळू शकेल. त्यामुळे स्वदेशी आधारित अर्थव्यवस्था भारताला अधिकाधिक बळकटी देणारी ठरू शकते. आज इस्रायल, जपान, चीन, रशिया, जर्मनी या देशांनी प्रखर राष्ट्रवाद आणि देशभक्तीच्या जोरावर 'स्व' आधारित व्यवस्था निर्माण केली. प्रत्येक क्षेत्रातील मग ती भाषा असो अथवा तंत्रज्ञान, अथवा उच्च शिक्षण सर्वच क्षेत्रातील पाश्चिमात्यांचा प्रभाव त्यांनी झुगारून लावला आणि आज ते देश नवनवीन आव्हाने स्वीकारत विकासाच्या वाटेवर अग्रेसर आहेत. प्रखर राष्ट्रवाद आणि स्वाभिमान आणि ज्वलंत देशभक्ती या गुणांच्या बळावर चिमुकले इस्रायल-हमाससह सर्वच क्रूर जिहादी दहशतवादी संघटनांशी आणि आक्रमक इस्लामी देशांशी जबरदस्त झुंज देत आहे. एक इंच भूमीदेखील शत्रूच्या घशात जाऊ देणार नाही, असा इस्रायलचा ठाम निर्धार आहे. आज आम्हा हिंदूंना इस्रायलकडून प्रेरणा घेण्याची नितांत आवश्यकता आहे. भारताचे नंदनवन समजल्या जाणाऱ्या काश्मिरात आणि ईशान्य भारतात तसेच देवभूमी केरळमध्ये असंख्य जिहादी विषारी नाग घुसले आहेत. त्यांचा तातडीने कायमचा बंदोबस्त होणे अत्यंत अत्यावश्यक आहे. संपूर्ण देशातील नागरिक या दृष्टीने सावध व सजग राहिले पाहिजेत. आमच्या देशात लव्ह जिहाद बरोबरच लॅण्ड जिहाद आणि व्होट जिहादची नवनवीन प्रकरणे समोर येत आहेत. त्या विरुद्ध हिंदू समाजाने एकत्रित येऊन कृतिशील होण्याची आज नितांत आवश्यकता आहे. जर पुन्हा भारताला सामर्थ्यशाली करायचे असेल तर समस्त हिंदूंनी एकत्र येऊन, सर्व इच्छाशक्ती एकवटून राष्ट्र उभारणीच्या कार्यात संपूर्ण योगदान दिले पाहिजे. सरसंघचालकांच्या विजयादशमीच्या संदेशाचा हाच अन्वयार्थ आहे.

## दिल्ली दिनांक

**रवींद्र दाणी**

# मालदीव पुन्हा भारताकडे!



'कधी गरम, कधी नरम' अशी भूमिका घेणारे मालदीवचे राष्ट्रपती मोहम्मद मुईझ्झू आता नरम झाले आहेत. नवी दिल्लीला दिलेल्या विशेष भेटीत मुईझ्झू यांनी भारत-मालदीव मैत्रीच्या आणाभाका घेतल्या. ही बाब भारतासाठी सुखद असली, तरी मालदीवचे घुमजाव काही शंका निर्माण करणारे आहे. मालदीवच्या राष्ट्रीय निवडणुकीत मुईझ्झू यांच्या पक्षाने 'भारत विरोध' हा मुख्य मुद्दा केला होता. मालदीवमध्ये तैनात भारतीय वायुदलाच्या दोन तुकड्यांना देशाबाहेर काढणे हा मुद्दा केला होता. केवळ निवडणुकीत हा मुद्दा करून ते थांबले नव्हते तर निवडून आल्यावर त्यांनी भारताला आपल्या वायुदलाच्या या दोन तुकड्या माघारी बोलाविण्यास जवळपास बाध्य केले होते आणि आता काही महिन्यांच्या आत त्याच नेत्याने नवी दिल्लीत येऊन भारताशी मैत्रीच्या आणाभाका घ्याव्यात, हे आश्चर्यच होते; जे घडले.

**चीनचा पाठिंबा** : मालदीव हा कधीकाळचा भारताचा मित्र. भारताने मालदीवसाठी खूप काही केले आहे. असा हा मालदीव अचानक चीनच्या गोटात गेला. मालदीवमध्ये चिनी मदतीचा ओघ सुरू झाला. रस्ते बांधण्यापासून वसाहती बांधण्यापर्यंत, रुग्णालये, ॲम्बुलन्स या साऱ्या बाबी चीनकडून मालदीवला मिळू लागल्या आणि मालदीवचे नेते भारताविरोधात डरकाळ्या फोडू लागले.

**अचानक जादू** : मालदीव व चीनचा मधुचंद्र सुरू असताना अचानक असे काय घडले की, मालदीवला भारताची आठवण झाली, हे मात्र समोर आलेले नाही. चीन या देशावरचा ताबा एवढ्या सहजासहजी सोडणार नाही, हे स्पष्ट आहे. कारण मालदीवचे स्थान लष्करीदृष्ट्या अतिशय महत्त्वाचे आहे. भारताला चारही बाजूने वेढण्याची जी व्यूहरचना चीन मागील काही वर्षांपासून राबवित आहे, त्याचाच एक भाग म्हणून चीनने मालदीववर एक प्रकारचा ताबा मिळविला आहे. आता मालदीवचे घुमजाव त्याच्या कोलमडलेल्या अर्थव्यवस्थेपोटी असावे काय, असा एक प्रश्न विचारला जात आहे. मालदीवची अर्थव्यवस्था पूर्णपणे पर्यटनावर अवलंबून आहे आणि यात भारतीय पर्यटक हा सर्वात मोठा घटक आहे. भारत-मालदीव संबंध ताणले गेल्यानंतर भारतीय पर्यटकांनी मालदीवचा रस्ता बंद केला आणि याचा सरळ परिणाम मालदीवच्या अर्थव्यवस्थेवर झाला. चीनने याची भरपाई करण्याचा प्रयत्न केला. पण, चीनची स्वतःचीच स्थिती कमजोर असल्याने तो किती काळ मालदीवला मदत करू शकणार होता. चीनने आपले हात आखुडते घेतले आणि मग मालदीवला मदतीसाठी भारतासमोर हात पसरण्याशिवाय पर्याय राहिला नव्हता.

**आर्थिक मदत** : भारताने मालदीवला काही आर्थिक सहाय्य करण्याची घोषणा केली आहे. त्यानुसार या देशाला काही कोटी रुपये दिले जाणार आहेत. या मदतीसाठी राष्ट्रपती मुईझ्झू यांनी भारताचे आभार मानले आहेत. आपण कधीही भारताच्या विरोधात नव्हतो, असे स्पष्टीकरण त्यांनी केले आहे. मालदीवच्या भूमीवर कोणतेही विदेशी सैनिक असता कामा नये, ही मालदीवच्या नागरिकांची भूमिका आहे. आपण फक्त त्या भूमिकेचे पालन केले, असेही त्यांनी म्हटले आहे. 'मालदीव फर्स्ट' ही आमची भूमिका आहे. त्यानुसार आम्ही काही निर्णय घेतले. त्यात भारताचा विरोध नव्हता. भारतीय पर्यटकांनी पुन्हा एकदा मालदीवचा रस्ता धरावा, असे आवाहनही त्यांनी केले आहे. राष्ट्रपती मुईझ्झू यांची सारी भूमिका सारवासारव करणारी आहे. मात्र, ती प्रामाणिक असेल तर झाले गेले विसरून भारताने मालदीवशी मैत्री ठेवली पाहिजे. पण, यातही चीनची चालाखी असेल तर? कारण चीन चालाखी आणि फसवाफसवीसाठीच प्रसिद्ध आहे.

**लष्करप्रमुखांचे अभिनंदन** : देशाचे लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी यांनी भारत-चीन सीमेवरील स्थितीचे फार नेमक्या शब्दात विश्लेषण केले आहे, त्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले पाहिजे. भारत-चीन पूर्व लडाख सीमेवरील स्थिती शांत असली, तरी 'सामान्य नाही' असे त्यांनी म्हटले आहे. सोबतच त्यांनी तीन बाबी स्पष्ट केल्या आहेत. या साऱ्या बाबी जून २०२० मध्ये भारत-चीन सैन्यात झालेल्या चकमकीच्या संदर्भात आहेत. सैन्य माघारीची प्रक्रिया, बफर झोन आणि टेहळणी व्यवस्था या त्या तीन बाबी आहेत.

**तीन महत्त्वाचे मुद्दे** : जनरल द्विवेदी यांनी फार नेमकेपणे हे तीन मुद्दे उपस्थित केले आहेत. पहिला मुद्दा म्हणजे सैन्य माघारीचा. चीनने भारताच्या ज्या भागावर अनधिकृत कब्जा केला होता तो त्याने पूर्णपणे रिकामा केलेला नाही. हीच बाब परराष्ट्रमंत्री जयशंकर यांनी एका मुलाखतीत स्पष्ट केली होती. सैन्य माघारीची प्रक्रिया ७५ टक्के पूर्ण झाली आहे, असे त्यांनी म्हटले होते. याचा अर्थ चीनने २०२० मध्ये बळकावलेल्या भारतीय भूभागापैकी २५ टक्के भाग अद्याप सोडलेला नाही. या भागात चीनने बांधलेल्या हवाई पट्ट्यांची छायाचित्रे प्रसिद्ध झाली आहेत. चीनने उभारलेल्या पायाभूत सोयींची छायाचित्रे प्रसिद्ध झाली आहेत. लष्करप्रमुखांनी आपल्या प्रतिपादनात किती टक्के वगैरे असा काही हिशेब मांडला नसला, तरी सीमेवरील स्थिती सामान्य नसल्याचे म्हटले आहे. त्याचा अर्थ स्पष्ट आहे. दुसरा भाग म्हणजे बफर झोनचा. दोन्ही देशाच्या सीमेवर काही भाग बफर झोन म्हणून चिन्हांकित केला जातो. याबाबतही स्थिती सामान्य नसल्याचे लष्करप्रमुखांनी म्हटले आहे. याचा अर्थ म्हणजे चीनने बफर झोन म्हणून ओळखल्या जाणाऱ्या काही भागावर घुसखोरी केली आहे आणि हा पेचप्रसंग अद्याप सुटलेला नाही. तिसरा मुद्दा टेहळणीचा. जून २०२० पूर्वी भारताच्या लष्करी पथकांना ज्या भागापर्यंत टेहळणीसाठी जाता येत होते तेथे त्यांना आता जाता येत नाही. ९, १०, ११, १२, १२ ए, १३, १४, १५, १७ आणि १७ ए या त्यातील काही प्रमुख टेहळणी चौक्या आहेत. जून २०२० नंतर ६५ पैकी २६ टेहळणी चौक्यांवर भारताची टेहळणी बंद झाली असल्याची माहिती लेहच्या पोलिस प्रमुख नित्या यांनी आपल्या अहवालात दिली होती. ही सारी माहिती अधिकृतच मानली जाते.

**२१ फेऱ्यानंतर...** : लष्करप्रमुख जनरल द्विवेदी यांचे हे विधान भारत-चीन लष्करी अधिकाऱ्यांमध्ये झालेल्या चर्चेच्या २१ फेऱ्यानंतरचे आहे, हे विशेष. मागील काही महिन्यांपासून तर ही चर्चा थांबली आहे. चीन याबाबत काही बोलण्यास तयार नाही, असे त्याच्या भूमिकेवरून दिसते.

**'जमिनी हकीकत'** : जनरल द्विवेदी यांनी स्पष्ट केलेला आणखी एक मुद्दा म्हणजे राजनैतिक नेतृत्व सीमेवरील स्थितीत सामान्य होत असल्याचे सांगत आहे. चीनकडून सकारात्मक संकेत मिळत असल्याचे सांगत आहे. ही चांगली बाब आहे. पण, या साऱ्याचा कस लागतो लष्करी अधिकाऱ्यांच्या बैठकीत. कारण तेव्हा जमिनीवर काय करावयाचे याचा विचार आणि निर्णय होत असतो. जोपर्यंत चीन एप्रिल-जून २०२० ची स्थिती बहाल करीत नाही, तोपर्यंत सीमेवरील स्थिती सामान्य झाली आहे, असे म्हणता येणार नाही आणि जोपर्यंत स्थिती सामान्य होत नाही आम्हाला जराही बेसावध होऊन वा ढिलाई देऊन चालणार नाही, असेही त्यांनी म्हटले आहे.

**१९ फेब्रुवारीनंतर** : जून २०२० मध्ये लडाख भागात भारत-चीनच्या लष्करी तुकड्यांमध्ये झालेल्या चकमकीचा सर्वात मोठा बळी म्हणजे विश्वासार्हता हा आहे, हे जनरल द्विवेदी यांचे विधान बरेच काही सांगणारे आहे. भारत-चीन सीमेवरील चुसूल मोल्डो चौकीवर भारत-चीन यांच्यात या समस्येवर २७० हून अधिक तास चर्चा झाली आहे. त्यात काही प्रगती झाली आहे; मात्र ती पुरेशी नाही. चर्चेची शेवटची फेरी १९ फेब्रुवारी रोजी झाली होती. म्हणजे मागील आठ महिन्यात चीनने याबाबत कोणतीही सकारात्मक हालचाल केलेली नाही.

## वेध

**अनिरुद्ध पांडे**

# मंदिरांवरचे नियंत्रण

संपूर्ण भारतातील हिंदूंच्या सर्व मंदिरांवर सरकारचे नियंत्रण आहे. या मंदिरांच्या दानपेटीतील पैसे, देणगीद्वारे येणारे पैसे, वस्तुरूपातील, विशेषतः सोने-चांदी स्वरूपातील दान या साऱ्यांवरच तेथील राज्य सरकारांचे नियंत्रण असते. त्याची नोंद आणि त्यातून मंदिरासाठी करावयाच्या खर्चावरही नियंत्रण समितीचे लक्ष असते. केरळसारख्या राज्यात बहुधा ख्रिश्चन किंवा मुसलमानांचे प्राबल्य असलेले उजव्या विचारसरणीचे सरकार असते. त्यामुळे मंदिरांवरही स्वाभाविकच त्यांचे लक्ष असते. मंदिरातील पैसा तर घेऊन जायचा, पण तेथील आवश्यक खर्चासाठीही पैसा द्यायचा नाही, अशी केरळ सरकारची सर्वसाधारण कार्यपद्धती आहे. केरळच नव्हे तर अनेक तथाकथित सर्वधर्मसमभाववाल्या राज्यांमध्ये मंदिरांवर असाच अन्याय केला जातो. त्यामुळे काही ठिकाणचे व्यवस्थापनही गैरव्यवहारांच्या गुंत्यात गुरफटले असते. मध्यंतरी केरळमधील एका मोठ्या हिंदू मंदिराच्या दानपेटीवर बहिष्कार टाकण्याचे एक आंदोलनच तेथील भक्तांनी केले. त्यामुळे उत्पन्नावर आणि पर्यायाने सरकारवरही परिणाम झाला. निदान आमचा पैसा तरी आम्हाला योग्य कारणासाठी द्या, अशी मागणी करून हा बहिष्कार होता. पैसा आला नाही तरी मंदिराचे नियमित व्यवस्थापन करण्याची जबाबदारी राज्य सरकारवर असते. मंदिरातून पैसा येणे बंद झाल्यामुळे केरळ सरकारही हादरले आणि वठणीवरही आले. हिंदूंनी आपण 'कोणत्या जातीचे आहोत यापेक्षा हिंदूच आहोत,' ही खूणगाठ मनात बांधल्यास अनेक गोष्टी बदलतात.

जसे हिंदू मंदिरांवर सरकारी नियंत्रण असते तसे मशिदी किंवा गिरजाघरांवर नसते. उलट मंदिरांमधून येणारा अतिरिक्त पैसा मशिदींसाठी खर्च करण्याची त्या अधिनियमांतच मोकळीक असते. ख्रिश्चन पाद्री किंवा मुसलमान मौलवी यांना तर दरमहा वेतन देण्याचीही तरतूद काही 'धर्मनिरपेक्ष' सरकारे करत असतात. त्यांना वेतन देण्यास हरकत नाही, पण हिंदू पुजाऱ्यांची दखलही घेत नाहीत, इतके ते 'धर्मनिरपेक्ष' असतात. इतकेच नव्हे, तर मंदिरांना ज्या दरात वीज मिळते त्यापेक्षा अर्धाही दर मशिदी आणि गिरजाघरांसाठी नसतो. एका राज्यात नागरिक व मंदिरांसाठी ७.८५ रुपये आणि मंदिर व गिरजाघरांसाठी फक्त १.८५ रुपये इतका भयंकर फरक आहे. काय करणार, घटनेनेच तर सांगितले आहे धर्मनिरप□□क्षतेबद्दल आणि तेही फक्त हिंदू धर्म वगळून...! भारतातील १८ राज्यांमध्ये हिंदूंच्या मंदिरांवर राज्य सरकारचे नियंत्रण असल्याची माहिती आहे. त्यात सुमारे ४ लाख मंदिर, मठ यांचा समावेश असून त्यातून १ लाख कोटी रुपये या सरकारांना मिळतात. पूर्वी काही हिंदू मंदिरांच्या हिंदू व्यवस्थापनांनी आपल्या पैशांचा गैरवापर केला, असे घडले आहे. कदाचित त्यामुळेच हिंदू मंदिरांवर सरकारी नियंत्रण आणण्यात आले असावे. पण असेच गैरप्रकार किंवा भ्रष्टाचार होऊनही, केवळ राजकीय कारणांसाठी मुसलमानांच्या मशिदी आणि ख्रिश्चनांचे चर्च मात्र सरकारी नियंत्रणमुक्त आहेत. उलट हिंदू मंदिरांच्या उत्पन्नातून मशिदी आणि मौलवींना दरमहा पैसे देण्याचा उद्योग काही राज्य सरकारे करीत आहेत. काही मंदिर समित्या जसे आर्थिक घोळ करायच्या त्याचप्रमाणे आता हिंदू मंदिरांवरील सरकारी समित्याही करतात, असे आढळून आले आहे.

महाराष्ट्राचे कुलदैवत असलेल्या तुळजापूरच्या भवानी मंदिरात सरकारी समितीच्या सरकारी अधिकाऱ्यांनीच सुमारे १० कोटी रुपयांचा दानपेटी घोटाळा केला आहे. या घोटाळ्याची चौकशी बंद करण्याचा निर्णयही काँग्रेसी सरकारने घेऊन टाकला. पण ही चौकशी गुंडाळून ठेवण्याच्या सरकारी निर्णयाला हिंदू जनजागृती समितीने उच्च न्यायालयात जनहित याचिकेद्वारे आव्हान दिले. ही याचिका स्वीकारून उच्च न्यायालयाने सरकारचा चौकशी बंद करण्याचा निर्णय रद्द ठरविला आहे. मंदिरांकडून पैसा घ्यायचा, पण मंदिरांना तो देण्यास टाळाटाळ करायची प्रशासनाची भूमिका अनेकदा दिसून येते. सप्टेंबर २०२३ मध्ये छत्रपती संभाजीनगरात झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत तुळजापूरच्या भवानी मंदिराला १३२८ कोटी रुपये देण्याची घोषणा करण्यात आली होती. पण सप्टेंबर २०२४ पर्यंत यापैकी १ रुपयाही तुळजाभवानी मंदिर विकासासाठी मिळालेला नाही. या कामांसाठी एक विकास आराखडा तयार करायचा असून तो मंजूर न झाल्यामुळे निधी मिळाला नसल्याची माहिती आहे. विकास आराखडा तयार करणे, मंजूर करणे ही कोणाची जबाबदारी आहे व कोण 'शुक्राचार्य' आहे, हे तपासून पाहण्याची आता गरज आहे. त्याचवेळी पैठणच्या ज्ञानेश्वर उद्यानासाठी १५० कोटी, वेरूळच्या घृष्णेश्वर मंदिरासाठी १५६ कोटी, परळीच्या वैजनाथ मंदिरासाठी २५६ कोटी, औंढा नागनाथ मंदिरासाठी ६०.३५ कोटी, सिल्लोडच्या मुर्डेश्वर मंदिरासाठी ४५ कोटी रुपयेसुद्धा घोषित करण्यात आले होते. हे सारे पैसे या मंदिरांच्या परिसर विकासासाठी आहेत. यातील काही कामांना हात लागला असून हळूहळू का होईना पैसे येत आहेत. पण यात सर्वात महत्त्वाच्या आणि मोठ्या तुळजाभवानी मंदिराला मात्र दुसऱ्या वर्षीचे नवरात्र उलटून गेल्यानंतरही एक पैसाही मिळू न शकणे म्हणजे हिंदूंच्या भावनांना ठेचच आहे, हे मात्र खरे.

९८८१७१७८२९

## कानोसा

**अमोल पुसदकर**

# हरयाणाच्या विजय मंत्राचा बोध

सर्व प्रकारच्या एक्झिट पोलचे निकाल चुकीचे ठरवून तसेच तमाम विरोधी पक्ष, चुकीचे नॅरेटिव्ह (कथानक) समाजामध्ये पसरविणारे लोक व शेतकरी नाराज आहेत, अशी बोंब उठविणारे लोक या सर्वांच्या नाकावर टिच्चून भारतीय जनता पार्टीने हरयाणामध्ये तिसऱ्यांदा आपले सरकार बनविले आहे. जनतेने त्यांना पुन्हा एकदा चांगले काम करण्याची संधी दिलेली आहे. भाजपाच्या नेतृत्वामध्ये हरयाणा हा दिल्लीचा आधारस्तंभ बनेल आणि जे खलिस्तानवादी विनाकारण शेतकरी आंदोलनाच्या निमित्ताने दिल्लीचे रस्ते अवरुद्ध करतात, त्यांनाही खीळ बसविण्यात हरयाणा आणि भाजपा यशस्वी होतील, असा विश्वास आहे. भाजपाने हरयाणासारख्या लहान परंतु महत्त्वाच्या राज्याची परीक्षा उत्तीर्ण केलेली असली, तरीही आता महाराष्ट्राची परीक्षा तोंडावर आलेली आहे. अशा परिस्थितीत ज्यावेळेस सर्व एक्झिट पोल काँग्रेसचे सरकार येणार म्हणत होते, जनता भाजपाच्या बाजूने नाही म्हणत होते, त्यावेळेस भाजपाने असे काय केले की, जेणेकरून त्यांचा विजयरथ काँग्रेस रोखू शकली नाही, याचा विचार करणे आवश्यक आहे. त्यातून महाराष्ट्राला काय बोध घ्यायचा तो महाराष्ट्राने घेतला पाहिजे.

लोकसभेच्या निवडणुकीमध्ये काँग्रेस भाजपाच्या बरोबरीत येऊन पोहोचली होती. दोघांनाही लोकसभेच्या पाच-पाच जागा मिळाल्या. त्यावरून काँग्रेस म्हणायला लागली की, लोकसभेमध्ये यांना केले हाप, आता विधानसभेत यांना करू पूर्ण साफ! तिकीट वितरण हे नेहमीच एक जिकिरीचे कार्य असते. काँग्रेसमध्ये याच्यामुळे प्रचंड राजी-नाराजी होती तर भाजपामध्येही मोठमोठे नेते निवडणुकीच्या तोंडावर पार्टी सोडून गेले. परंतु काँग्रेस नेत्या कुमारी शैलजा ज्यांचा दलित समाजामध्ये मोठा चाहता वर्ग आहे, त्यांना काँग्रेसने तिकीट वितरणात बरोबर सहभागी करून घेतले नाही, त्यामुळे त्या नाखूश होत्या व प्रचारांमध्ये जवळपास एक हप्ता त्या सामीलच झाल्या नाही, या गोष्टीचा भाजपाने पुरेपूर उपयोग केला व भाजपाच्या मंचावरून काँग्रेसमध्ये दलितांना न्याय दिला जात नाही, अशा पद्धतीची ओरड सुरू केली. त्यामुळे दलित मतदारांमध्ये काँग्रेसबद्दल नाराजी पसरत गेली. काँग्रेस ही जाट लोकांची पार्टी आहे व आम्हाला तिथे काही स्थान नाही, अशा पद्धतीची भावना त्यांच्यात निर्माण झाली. त्यामुळे दलित मतदार काँग्रेसपासून दूर झाला. भाजपाने दलित मतदारांना आपल्या जवळ आणण्यासाठी विशेष रणनीती बनविली आणि त्याद्वारे ते अधिकाधिक दलित समाजापर्यंत पोहोचण्यात यशस्वी झाले. महाराष्ट्रातही असेच काही करण्याची आवश्यकता आहे. जाटव्यतिरिक्त जो इतर ओबीसी समाज आहे त्यांच्यापर्यंतसुद्धा भाजपा पोहोचला व लोकसभेसारखे जाट मत जर काँग्रेसच्या पारड्यात गेले तर आपल्या पारड्यात काय राहील, यासाठी जाट व्यतिरिक्त इतरही सर्व समाजांना एकत्रित करण्याचा भाजपाने चंग बांधला. त्याचाच परिणाम म्हणून जाट व्यतिरिक्त इतर ओबीसी समाज हा भाजपाच्या बाजूला झुकला गेला. यावरून आपल्या असे लक्षात येते की, राज्य कुठलेही असो; परंतु जातीय समीकरणे ही असतातच. त्या अनुषंगाने तिकीट वाटप व इतर राज्यातील त्या त्या समाजाच्या नेत्यांना आपल्या राज्यामध्ये फिरविले पाहिजे व मतदारांना आकृष्ट केले पाहिजे. हरयाणामध्ये भाजपाचे चार प्रभारी असलेले विप्लव कुमार देव, धर्मेंद्र प्रधान, सुरेंद्र नागर व सतीश पुनिया यांनी आपापल्या जागा वाटून घेत त्या मतदारसंघांमध्ये सूक्ष्म नियोजन केले व चमत्कार घडवून आणला. जे कधीच झाले नाही ते देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असताना त्यांनी करून दाखविले. परंतु मराठा समाजाचा जो उपकारकर्ता आहे त्यालाच समाजाचे नेते शत्रू म्हणून समाजाच्या समोर प्रस्तुत करीत आहेत, ही अतिशय चुकीची गोष्ट आहे. परंतु, राजकारणात हे सर्व चालणारच आहे. त्यामुळे देवेंद्र फडणवीस यांची प्रतिमा समाजामध्ये अधिक चांगली करण्यासाठी प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. विविध छोट्या-छोट्या समाजाची मते व त्या मतांनी प्रभावित होणाऱ्या जागा लक्षात घेऊन स्टार प्रचारकांची त्या त्या क्षेत्रामध्ये योजना करणे गरजेचे आहे. नुकतीच लाडकी बहीण योजना महाराष्ट्र सरकारने आणलेली आहे. महाराष्ट्रातील महिला खूश आहेत. त्या महिलांपर्यंत पोहोचून ही योजना भाजपाने आणलेली आहे, त्यामुळे येणाऱ्या निवडणुकीमध्ये तुम्ही भाजपालाच किंवा महायुतीला मतदान करावे अशा पद्धतीचे आवाहन प्रत्येक महिलेला करणे गरजेचे आहे. अनेक लाडक्या बहिणींची मतदार यादीमध्ये नावे नसतील. 'आंधळा दळतो आणि कुत्रा पीठ खातो' ही परिस्थिती बरोबर नाही. लाडकी बहीण ही योजना गेम चेंजर ठरली पाहिजे. नुसते पैसे वाटून होणार नाही. कार्यकर्त्यांनी जनतेपर्यंत पोहोचण्याची आवश्यकता आहे. ज्याच्याकडे कुठलेही दायित्व नाही, परंतु जो भाजपाचा कार्यकर्ता आहे, हितचिंतक आहे अशा लोकांना जोडून ठेवण्यासाठी अधिक प्रयासाची आवश्यकता आहे. सत्ता आली की सर्वसामान्य कार्यकर्ते हे सत्तेपासून दूर ठेवले जातात, हा अनुभव आहे. यामुळे सत्तेनंतर येणाऱ्या निवडणुकीच्या वेळेला प्रचंड नाराजी पाहायला मिळते. याचाच परिणाम म्हणून सत्ताधाऱ्यांना पुन्हा सत्तेमध्ये येण्यामध्ये जास्त परिश्रम करावे लागतात.

हरयाणामध्ये निवडणुकीच्या ऐन सहा महिनेआधी भाजपाने मनोरलाल खट्टर यांना मुख्यमंत्री पदावरून दूर केले व नायबसिंह सैनी या ओबीसी चेहऱ्याला समोर आणले; तो प्रयोग यशस्वी झालेला आहे. मराठा चेहरा दिसला पाहिजे यासाठी एकनाथ शिंदे यांना मुख्यमंत्री करण्यात आले. पडद्यामागचे राजकारण काही असो; परंतु जनतेने हाच संदेश ग्रहण केलेला आहे. यावेळेस बंडखोरी मोठ्या प्रमाणावर होणार, असे चित्र आहे. हरयाणामध्ये मोठमोठ्या नेत्यांना बंडखोरीमुळे बाहेरचा रस्ता दाखविण्यात आला. त्यांच्याऐवजी निवडून येऊ शकणाऱ्या लोकांना तिकीट दिले गेले व त्याचा फायदा झालेला आता दिसून येत आहे. बंडखोरीमुळे अधिक नुकसान होऊ नये याची काळजी घ्यावी लागणार आहे.

राजकारणाच्या या धुमश्चक्रीमध्ये भाजपामध्ये कार्यकर्ता प्रशिक्षणावर भर दिला गेलेला नाही. सामान्य कार्यकर्त्यांना आपण कसे बोलले पाहिजे, संपर्क कसा केला पाहिजे, लोक काय प्रश्न विचारू शकतात, त्याचे काय उत्तर आहे, याचे प्रशिक्षण व साहित्य वितरित करणे गरजेचे आहे. महिला, मध्यमवर्गीय, ज्येष्ठ नागरिक आणि शेतकरी या सर्वांवर लक्ष केंद्रित करून राज्य सरकारने गेल्या अडीच वर्षांत काय केलेले आहे, हेही सांगितले पाहिजे आणि आधीच्या लोकशाही आघाडीची कोरोना काळातील निष्क्रियता, त्याने लोकांचे गेलेले प्राण हा इतिहास लोकांसमोर मांडला पाहिजे.

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

### अभिजात दर्जा, मराठी भाषेचा!

महायुती सरकारने मराठी भाषेला अभिजात दर्जा प्रदान करून या भाषेला अधिक श्रीमंत केले आहे. अलिकडे इंग्रजी भाषा बोलणारे अधिक आधुनिक समजले जात होते आणि मराठी भाषा बोलणारे मागासलेले! आता आपले मराठी भाषिक मराठी भाषा अगदी आनंदाने व अभिमानाने बोलतील. पूर्वी इंग्रजी भाषेच्या पाठशाळांना आपण सारे खूप मोठी शाळा समजत होतो. 'आमच्या मुलाला मराठी नीट बोलता येत नाही' हे त्यांचे आई-बाबा खूप कौतुकाने सांगत असत. आता आपल्याला मराठी नीट बोलता येत नाही, याचे मराठी भाषिकांना वाईट वाटेल. आपण जेव्हा मराठीमध्ये बोलत असतो, तेव्हा मध्ये मध्ये इंग्रजी भाषेतील शब्द दत्तक घेत असतो. आपण सर्वांनी असे इंग्रजी भाषेमधील शब्द दत्तक घेणे कमी केले पाहिजे. अगदी मराठी भाषेचे जाणकार लोकही असे इंग्रजी भाषेमधील शब्द दत्तक घेत असतात. मात्र, आता इंग्रजी भाषेचा उपयोग करणारे मराठी भाषेमधील शब्द दत्तक घेतील सहजपणे! आता सर्वच इतर भाषांतील शब्द मराठी भाषेत भाषांतरित करण्याचे प्रयत्न या भाषेचे जाणकार करीत आहेत. फक्त ते शब्द बोलण्याची सवय आपल्या मराठी भाषिकांना लावणे गरजेचे आहे. आपल्याला मराठी भाषेसोबत इतर भाषेत बोलता येणे ही चांगली गोष्ट आहे. परंतु मराठी भाषा शुद्ध पद्धतीने बोलता येणे गरजेचे आहे. आपण शुद्ध भाषेत मराठी बोलू लागलो की आपली पुढची पिढी ही शुद्ध भाषेत मराठी बोलू लागेल आणि सर्वांची मराठी मातृभाषा श्रीमंत होत जाईल. महाराष्ट्र सरकारने अभिजात दर्जा या भाषेला दिला. आपण या भाषेचा दर्जाही वाढविला पाहिजे छान मराठी भाषा बोलून आणि लिहून! पूर्वी शुद्ध भाषेत कोणी मराठी बोलले की लोक हसत होते. आता या भाषेला विशेष दर्जा प्राप्त झाल्यामुळे सर्वच मराठी भाषिक भाषेचा दर्जा वाढवतील आणि मनापासून हा दर्जा टिकवून ठेवण्यासाठी प्रयत्न करतील.




**शशिकांत पांडे**/७५८८७४१९९६

## वाचक पत्रे

### नवी मुंबई एअरपोर्टला रतन टाटा यांचे नाव द्या



रतन टाटा यांचे भारताच्या आर्थिक व औद्योगिक विकासातले अनन्य योगदान, वैद्यकीय क्षेत्रात अमूल्य सहभाग, इतर सामाजिक दायित्वाचे निर्वहन, खरोखर साधी राहणी उच्च विचारसरणी, लहानातल्या लहान माणसाचा विचार व त्याला साहाय्य करणे या सगळ्याचा गौरव व्हावा व येणाऱ्या पिढीला त्यांचे कर्तृत्व, दातृत्व कळावे म्हणून नवी मुंबई एअरपोर्टला रतन टाटा यांचे नाव द्यावे.

**रवी वाघमारे**/नागपूर

### टेलिकॉमनगर पार्कची दुरवस्था

टेलिकॉमनगरमध्ये मोठा बगीचा आहे; ज्याचा वापर मुख्यत्वेकरून टेलिकॉमनगर, रामकृष्णनगर, रवींद्रनगर, शास्त्रीनगर, खामला, त्रिशरणनगर, गावंडे लेआऊट, सेंट्रल एक्साईज कॉलनी इ. भागातले रहिवासी करतात. यामध्ये ज्येष्ठ नागरिकांची संख्या जास्त आहे. लोक सकाळ-संध्याकाळ फिरायला व व्यायाम करायला येतात. परंतु त्यामध्ये अडचणी येऊ लागल्या आहेत. जॉगिंग ट्रॅक अनेक ठिकाणी उखडला असून, काही ठिकाणी तो उंच-सखल झाला आहे. कुठे नळाचा पाईप टाकण्यासाठी खोदला आहे, परंतु डागडुजी झालेली नाही. काही सिमेंट ब्लॉक्स उखडले गेले आहेत. संध्याकाळी अपुऱ्या उजेडामुळे ट्रॅकवर गैरसोय होते. परिणामी पडण्या-झडण्याची शक्यता वाढते. लाकडी, लोखंडी व दगडाचे अनेक बेंचेस तुटलेले आहेत. बसायला जागा कमी पडते. व्यायामाची साधने वाढविण्याची गरज आहे. उदा. पायडल मारून व्यायाम करायची सोय. लहान मुलांना खेळायला घसरगुंडीव्यतिरिक्त काही नाही. सी-सॉ, झोपाळे, मेरी गो राऊंड आदी साधने वाढविण्याची आवश्यकता आहे. मुलाच्या खेळण्याच्या जागेवरही संध्याकाळी अंधार पडतो. त्यामुळे उद्यानातील लायटिंगमध्ये सुधारणा करण्याची गरज आहे. लोकसभा निवडणुकीआधी एक कार्यकर्ते एका नेत्याला घेऊन आले होते; त्यांना या सगळ्या अडचणी सांगितल्या होत्या. त्यानंतर ते कार्यकर्त्यांनी मला बगिच्यासाठी ५० लाख रु. मंजूर झाल्याचे सांगितलेही होते व आचारसंहिता संपल्यावर कामाला सुरुवात होईल, असे सांगितले होते. निवडणूक होऊनही गेली. आता विधानसभेची निवडणूक येऊ घातली आहे, परंतु काम काही सुरू होऊ शकले नाही. सर्व संबंधितांना विनंती आहे की, बगिच्यात आवश्यक त्या सर्व सुधारणा करून द्याव्या. म्हणजे या भागातील नागरिकांची सोय होऊन दिलासा मिळेल. आणखी एक- तात्या टोपेनगरातील बगीचा अतिशय चांगला व सुविधायुक्त आहे. त्या धर्तीवर या बगिच्याचे काम व्हावे एवढेच.

**दीपक अमीन**/७३८७१२२२४९

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त



### लोकमान्य विद्यापीठातर्फे पंचांगकर्ते मोहनराव दाते यांना डिलीट पदवी

**सोलापूर, दि. १३ ऑक्टोबर-**

श्री मोहनराव दाते पंचांगकर्ते यांना लोकमान्य संस्कृत विद्यापीठाच्या वतीने डिलीट पदवी देऊन सन्मानित करण्यात आले आहे. त्या बद्दल श्री गद्रे महालक्ष्मी मंदिराच्या वतीने श्री मोहनराव दाते यांचा सत्कार करण्यात आला. यांप्रसंगी दाते पंचाग ग्लोबल करून करून त्यातील माहिती इंटरनेट वर उपलब्ध करून दिली तसेच जन्मपत्रिका तयार करण्यासाठी ॲप तयार करून सर्व गुरुजींना दिल्यामुळे अचूक पत्रिका तयार करणे सोईचे झाले.तसेच मागील ५० वर्षापासुन ची पंचाग नेट वर उपलब्ध करण्याचे उल्लेखनीय कार्य श्री ओंकार मोहनराव दाते यांनी केले आहे.त्याबद्दल ओंकार दाते यांचा सत्कार करण्यात आला. मोहनराव दाते पंचागकर्ते यांना लोकमान्य संस्कृत विद्यापीठाच्या वतीने डिलीट पदवी देऊन सन्मानित करण्यात आले आहे. त्याबद्दल श्री गद्रे महालक्ष्मी मंदिराच्या वतीने मोहनराव दाते यांचा सत्कार करण्यात आला.

### जेऊरे यांच्या घरी यंदाही नवरात्र महोत्सव उत्साहात

**सोलापूर, दि. १३ ऑक्टोबर-**



सालाबदाप्रमाणे नवरात्र महोत्सव साजरा करण्याची पन्नास वर्षापासूनची परंपरा जपत, भक्तीभावाने मल्लिनाथ जेऊरे यांनी आपल्या घरी देवीची प्राणप्रतिष्ठा करून स्वखर्चाने मूर्तीची स्थापना केली. पूर्व मंगळवार पेठ, बोरामणी तालीम येथील तुळजाभवानीचे निशीम भक्त मल्लिनाथ जेऊरे यांनी घरी पन्नास वर्षांपूर्वी अस्सल मातीपासून बनवलेली लक्ष्मी मातेची, मूर्तीची स्थापना केली होती. पावसाळ्याचे दिवस असल्याने मोठ्या पावसाला सुरुवात झाली. तेव्हा जेऊरे यांनी घरासमोर बसवलेली मातीची मूर्ती भिजल्यानंतर भंग पावेल म्हणून ती मूर्ती घरात ठेवली व उत्सव साजरा केला. पण काहीतरी अनर्थ घडेल. म्हणून त्यांनी तुळजापूरच्या (भोपी) पुजाऱ्यांना हकीकत सांगितली. तेव्हा तुम्ही यापुढे घरातच प्राणप्रतिष्ठा करून पूजा करा. असे पुजाऱ्याने सांगितले. कालांतराने आता माती ऐवजी शेडूचा वापर देवीच्या मूर्तीसाठी वापरला जातो. घटस्थापने पासून पहाटे पाच वाजता अभिषेक, पूजा, होम हवन, नऊ दिवस विविध रंगाची साडी देवीला अर्पण करतात. पाचव्या दिवशी कुंकुमार्चन तर अष्टमीच्या दिवशी होम हवन करून स्वखर्चाने भक्तांना महाप्रसाद वाटप करतात. अशी माहिती मल्लिनाथ जेऊरे यांनी दिली. याशिवाय ही नवसाला पावणारी देवी आहे. म्हणून अनेक भक्तांनी यांच्या घरी येऊन देवीची ओटी भरतात. जेऊरे यांनी सुद्धा कॉलनीतील सर्व भक्तांना घटस्थापने निमित्त कडधान्य व इतर साहित्य स्वखर्चाने देतात, अशी माहिती त्यांचे नातेवाईक राजकुमार दोड्याळे यांनी दिली. घटस्थापनेच्या अगोदर आठ दिवसांपासून घरात देवीचे आगमन होणार म्हणून लगभग सुरू असते. पूजा जेऊरे, आरती जेऊरे, मृदुला जेऊरे या घरातील महिला व व्यवस्थापक राजू जेऊरे तसेच अबालवृद्धांनी नवरात्र महोत्सव दोन पिढ्यांपासून मोठ्या उत्साहात साजरा करतात.



### मोची, पद्मशाली, लोधी समाजासाठीही महामंडळाची होणार घोषणा : वाघमारे

**सोलापूर, दि. १३ ऑक्टोबर-**

दसरा मेळाव्यानिमित्त शिवसेना एकनाथ शिंदे पक्षाच्यावतीने आझाद मैदानावरील घेण्यात आलेल्या मेळाव्यात राज्य प्रवक्त्या ज्योती वाघमारे यांचे तडफदार भाषणावर झाले. दसऱ्यानिमित्त मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना शुभेच्छा देण्यासाठी ज्योती वाघमारे गेल्या असता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्यांचे कौतुक केले. या भेटी दरम्यान ज्योती वाघमारे यांनी स्वतःसाठी काहीही न मागता आमच्या समाजातील युवकांना रोजगार मिळावा, यासाठी तीन महामंडळे मागत त्यांना प्रत्येकी शंभर कोटीचा निधी देण्यात यावा, अशी मागणी केली. मोची समाजासाठी बाबू जगजीवन राम आर्थिक विकास महामंडळ, पद्मशाली समाजासाठी श्री मार्कंडेय महामुनी आर्थिक विकास महामंडळ आणि लोधी समाजासाठी महाराणा प्रताप आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्यात यावे व या तिन्ही महामंडळांना प्रत्येकी १०० कोटींचा निधी देण्यात यावा अशी मागणी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली. याची तातडीने दखल घेत मुख्यमंत्री शिंदे हे सोमवारच्या मंत्रिमंडळ बैठकीत निर्णय जाहीर करणार असल्याची शक्यता आहे. यावरूनच शहर मध्यची दावेदारी ही ज्योती वाघमारे यांची निश्चित असल्याची चर्चा सुरू आहे. यामुळे विधानसभेतील सोलापूर शहर मध्य ची जागा ही ज्योती वाघमारे यांना सुटण्याची शक्यता वर्तवली जात आहे. विजयादशमी सणाच्या दिवशी आझाद मैदानावरील झालेल्या दसरा मेळाव्यात शिवसेनेच्या राज्य प्रवक्त्या ज्योती वाघमारे यांनी महाविकास आघाडीतील सर्वच नेत्यांचा चांगलाच समाचार घेतला. प्रणिती शिंदे यांच्यासोबतच खासदार सुप्रिया सुळे व रश्मी ठाकरे यांच्यावरही तोफ डागली. सोलापुरातील मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेतही वाघमारे यांनी जोरदार भाषण ठोकले होते. एकंदरीत, ही त्यांनी मागणी केलेली ३ महामंडळांची निर्मिती झालीतर मोची, पद्मशाली आणि लोधी समाजातील युवकांची प्रगती होणार आहे.

# अण्णा भाऊ साठे स्मारक जागा भूसंपादनासाठी निधी द्या

## आ. रोहित पवार यांचे मुख्यमंत्र्यांना पत्र; घराच्या नूतनीकरणासाठी स्वखर्चातून दिले १५ लाख

**तभा वृत्तसेवा,**
**सांगली/वाटेगाव दि. १३ ऑक्टोबर-**

साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या स्मारकाचा प्रश्न कर्जत-जामखेडचे आमदार रोहित पवार यांनी हाती घेतला आहे. याबाबत त्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पत्र दिले असून स्मारकासाठी लागणाऱ्या जागेचे भूसंपादन करण्यासाठी पुरेसा निधी उपलब्ध करुन देण्याची मागणी केली आहे. सरकार याकडे दुर्लक्ष करणार असेल तर पवार कुटुंब आणि कर्जत-जामखेड व महाराष्ट्रातील नागरिकांच्या सहकार्याने स्मारकासाठीची जागा घेण्यासाठी निधी उभारण्याची तयारीही त्यांनी दर्शवली. शिवाय अण्णा भाऊंच्या वंशजांच्या घराच्या नूतनीकरणाचेही काम त्यांनी स्वखर्चातून हाती घेतले आहे.

महापुरुष अभिवादन यात्रेच्या सांगता समारंभाच्या निमित्ताने आमदार रोहित पवार यांनी वाटेगाव येथे साहित्यरत्न, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जन्म स्थळाची नुकतीच पाहणी केली. यावेळी त्यांनी त्यांच्या वंशजांचीही भेट घेऊन संवाद



साधला आणि राहत्या घराबद्दल माहिती घेतली. या घराची दूरवस्था झाल्याने त्यांनी या घराच्या नुतनीकरणासाठी स्थानिक कंत्राटदाराला स्वखर्चातून १५ लाख रुपये निधीही उपलब्ध करुन दिला आणि सध्या घराच्या नुतनीकरणाचे कामही सुरु झाले आहे. अण्णाभाऊंचे व्यापक कार्य बघता हा निधी म्हणजे केवळ खारीचा वाटा असून भविष्यात आणखी निधीची गरज लागली तर तोही उपलब्ध करून देण्यात येईल, अशा शब्दात त्यांनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे वारसदार सावित्रीमाई साठे यांना आश्वस्त केलं.

साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे समाजाप्रती असलेले कार्य सर्वज्ञात आहे. त्यांनी आपल्या काव्यातून आणि लेखनातून समाजातील शोषित, वंचित वर्गाच्या व्यथा मांडल्या. त्यांचे समाजासाठी मोठे योगदान असल्याने त्यांच्या जन्मस्थळी वाटेगाव इथे त्यांच्या कार्याला साजेसं असं भव्य स्मारक उभारण्याची गरज आहे. यासंदर्भात वाटेगाव येथील ग्रामस्थांनीही जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेऊन त्यांना निवेदन दिले आहे. स्मारक उभारणीकरिता लागणाऱ्या जागेचा बाजारभाव हा सरकारने उपलब्ध करुन दिलेल्या निधीपेक्षा अधिक असल्याने अद्याप भूसंपादन झालेले नाही. याबाबत आमदार रोहित पवार यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पत्र दिले असून साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या वाटेगाव येथील जन्मस्थळी स्मारक उभारणीसाठी आवश्यक असलेली जागा संपादन करण्यासाठी पुढील १५ ते २० दिवसात पुरेसा निधी देण्यात यावा आणि या स्मारकासाठी एक वेगळा ट्रस्ट स्थापन करून त्यावर प्रशासकीय अधिकारी व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे वारस यांची नियुक्ती करण्याची मागणी केली आहे. स्मारकासाठी लागणाऱ्या जमिनीचा मोबदला देणं सरकारला शक्य नसेल तर पवार कुटुंबियांच्या वतीने १ कोटी रुपयांचा निधी देऊन आणि उर्वरित निधी कर्जत जामखेड मतदारसंघातील आणि या लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्यावर प्रेम करणाऱ्या राज्यभरातील स्वाभिमानी जनतेच्या सहकार्याने लोकवर्गणीतून उभारून जागा ताब्यात घेण्याचा संकल्पही आमदार रोहित पवार यांनी यावेळी सोडला.

> लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांनी साहित्यक्षेत्रात आणि महाराष्ट्रासाठी दिलेलं योगदान हे अनन्यसाधारण असल्याने अशा महापुरुषांचं स्मारक लवकर होणं गरजेचं आहे. सरकारकडून विलंब होत असेल तर माझं कुटुंब, माझा कर्जत-जामखेड मतदारसंघ आणि महाराष्ट्रातील जनता स्मारकासाठी लागणारी जमीन खरेदीसाठी निधी उभा करु. अण्णाभाऊंच्या कुटुंबियांच्या घराचंही नूतनीकरण सुरु केलं असून त्यासाठी आणखी निधी लागला तरी तो आम्ही उपलब्ध करुन देऊ. कारण या महान व्यक्तींनी महाराष्ट्रासाठी जे कार्य केलं ते पाहता त्यांच्या कुटुंबियांची आपण कितीही सेवा केली तरी ती कमीच आहे.
>
> **- रोहित पवार, आमदार, कर्जत-जामखेड**

# श्री तुळजाभवानी मातेचा सीमोल्लंघन सोहळा जल्लोषात

### हजारो भाविकांची सोहळ्यासाठी उपस्थिती

**तभा वृत्तसेवा,**
**तुळजापूर, दि. १३ ऑक्टोबर-**

अवघ्या महाराष्ट्राचे आराध्यदैवत श्री तुळजाभवानी मातेचा सीमोल्लंघन सोहळा रविवार, दि. १३ मोठ्या भक्तीमय वातावरणात उत्साहात पार पडला. या सोहळ्यासाठी हजारो भाविकांनी उपस्थिती लावली.

विजयादशमीदिनी उषःकाली श्री तुळजाभवानी मातेच्या मूर्तीची पालखीतून कुंकवाची उधळण करीत प्रदक्षिणा मार्गावर भव्य मिरवणूक काढण्यात आली. यावेळी तुळजापूर शहरासह विविध ठिकाणच्या भाविकांची मोठी गर्दी झाली होती. विजयादशमीदिनी रविवारी पहाटे श्री तुळजाभवानी मुर्तीस अभिषेक घालण्यात आला. यानंतर श्री देविजींची मुर्ती मंदिराबाहेर आणली जाणार असल्याने संरक्षणासाठी मुख वगळता १०८ वस्त्रांचे दिड



गुंडाळण्यात आले.

यानंतर देविजींची मुळ मुर्ती पहाटे सिंहासनावरून नगर येथून आणलेल्या पलंग पालखीत ठेवण्यात आली. त्यानंतर संभळाच्या कडकडाटात, फुलांचा पाकळ्या व कुंकुवाचा उधळण करीत देवी विराजमान असलेल्या पालखीची मंदिर प्रदक्षिणा मार्गावरून मिरवणूक काढण्यात आली.

ही मिरवणूक पिंपळाच्या पारावर आल्यानंतर येथे श्री देवीजींना नैवद्य वाढवून आरती करण्यात आली. नंतर देवीची मुळ मूर्ती मंदिराचा सिंह गाभाऱ्यात नेऊन निद्रीस्त करण्यात आली. त्यानंतर मंदिर समितीतर्फे मानकरी वर्गाचा यथोचित सन्मान करण्यात आला. या सोहळ्यास जिल्हाधिकारी डॉ. सचिन ओम्बासे, तहसिलदार तथा व्यवस्थापक माया माने यांच्यासह भोपे, पाळीकर, उपाध्ये, पुजारी, सेवेकरी, मानकरी, हजारो भाविक व मंदिर कर्मचारी, भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# तुप्पीनमठ नागणसूर येथे उद्यापासून विविध कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट, दि. १३ ऑक्टोबर-**





श्री जगद्गुरु बसवलिंगेश्वर महासंस्थान तुप्पीनमठ नागणसूर मठाचे श्री जगद्गुरु बसवलिंग महास्वामी यांच्या ९२ व्या पुण्यतिथीनिमित्त मंगळवारी १५ ऑक्टोबरपासून विविध कार्यक्रम होणार असल्याचे मठाधिपती डॉ. अभिनव बसवलिंग महास्वामी यांनी सांगितले.

श्री जगद्गुरु बसवलिंगरत्न पुरस्कार वितरण, सामूहिक विवाह, जंगम गणराधना, सुवासिनींची ओटी भरणे व महाप्रसाद वाटप होणार आहे. १४ ऑक्टोबर रोजी सायंकाळी सहा वा. भक्तीगीत, भावगीत व जानपद गाण्यांचा कार्यक्रम, १५ ऑक्टोबर रोजी सकाळी महारुद्राभिषेक, षटस्थल ध्वजारोहण, सामूहिक विवाह, धर्मसभा, ११ हजार सुवासिनींना ओटी भरणे, सात हजार जंगमांचे जंगमाराधना आणि भक्तांना पुरणपोळी व तुपाचे महाप्रसाद असे कार्यक्रम होणार आहेत. १६ ऑक्टोबर रोजी सायंकाळी पाच वाजता श्रींच्या भव्य प्रतिमा व वचनग्रंथांची मिरवणूक काढण्यात येणार आहे. या कार्यक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# राजस्वनगर गृहनिर्माण संस्थेतर्फे लाठीकाठीचे प्रशिक्षण



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ ऑक्टोबर-**

विजापूर रोड येथील राजस्वनगर सहकारी गृहनिर्माण संस्थेतर्फे नवरात्र उत्सव विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला. यावेळी वय वर्षे ५ ते १६ वयोगटातील मुले व मुलींसाठी लाठीकाठीचे प्रशिक्षण देण्यात आले. यावेळी ३५ मुला-मुलींना लाठीकाठीचे प्रशिक्षण अश्विन कडलासकर यांनी दिले. कार्यक्रमाचे नियोजन कॅस्पर ॲकॅडमीचे अर्चना बरडे व नवरात्र मंडळ यांनी केले

दि. ३ ऑक्टोबरपासून दररोज दहा दिवस सकाळी व संध्याकाळी श्री देवीची आरती, ज्येष्ठ नागरिकांसाठी श्री गजानन महिला भजनी मंडळ व श्री दुर्गादेवी महिला भजनी मंडळ यांचे भजन, कुंकूमार्चन, श्रीसुक्त पाठ पठण, भोंडला, गरबा व दांडिया, फॅशन शो, कुबेर ज्वेलर्स माधव मैंदर्गीकर आयोजित होम मिनिस्टर आदी विविध उपक्रमांनी नवरात्र उत्सव साजरा करण्यात आला. नवरात्र उत्सव यशस्वी पार पाडण्यासाठी उर्मिला बचुटे, अंजली जाधव, मंगल परशेट्टी, निवेदिता जाधव, रूपा मल्लाबादे, दिपा बाबर, अपूर्वा माने, अनिता मल्लाव, अंजली अनिखिंडी तसेच दांडिया प्रशिक्षक अनिल राठोड, विजय चाबुकसवार, संतोष शिवशरण, आशा मगर आदींनी परिश्रम घेतले.

# मॉडर्न हायस्कूलमध्ये वृक्षदिंडी उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर,दि.१३ ऑक्टोबर-**

एस आर दळवी (ख) फाऊंडेशन सोलापूर व मॉडर्न हायस्कूल सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने वृक्षदिंडी साजरी करण्यात आली. एस आर दळवी (ख) फाऊंडेशन हि संस्था शिक्षक सक्षमीकरण आणि पर्यावरण ह्या दोन विषयांवर काम करणारी संस्था आहे, संस्थेचे अध्यक्ष रामचंद्र दळवी आणि सीता दळवी हे आहेत, यांच्या मार्गदर्शनाखाली सादर वृक्षदिंडी आयोजित केली होती.

संत तुकाराम महाराजांच्या प्रतिमेचे पूजन डॉ. ओंकार कोरके, एस. आर. दळवी, विशाल मनाले, एस. आर. दळवी फाउंडेशनच्या उपाध्यक्षा दीपाली डोळस, विशेष सल्लागार इलियास शेख, मुख्याध्यापिका प्रज्ञा मुळे यांनी केले. प्राथमिक विभागाची ५५० विद्यार्थी, एनसीसी पथक, उपस्थित होते. डॉ. ओंकार कोरके यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत पर्यावरण आणि निसर्ग समतोल राखण्याविषयी मार्गदर्शन केले.



# व्ही. आर. पवारमध्ये साड्यांसह शालू, घागरा नव्या स्वरुपात उपलब्ध

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ ऑक्टोबर-**

सणासुदीच्या खरेदी सोबतच ग्राहक आपल्या कुटुंबाची प्रतिष्ठा आणि वधूचा आनंद अगदी सुनिश्चित करतात. कारण त्यांच्या सोबत असते व्ही. आर. पवार सारीज यांचा ब्रायडल शालू आणि घागरा असे मत मुख्य व्यवस्थापक राजेश पवार यांनी व्यक्त केले.

चाटी गल्ली येथील व्ही. आर. पवार मध्ये लग्नबस्ता आणि ब्रांडेड शूटिंग शर्टिंग खरेदी करिता सोलापूर शहर व परिसरातील ग्राहका सोबतच लातूर, धाराशिव, बीड, परभणी तसेच पुणे, मुंबईचे देखील ग्राहक मोठ्या उत्साहाने येथे खरेदीला येताना दिसत आहेत. डिझायनर ब्रायडल शालू डिझायनर वर्क सारीज डिझायनर लाचा ब्रँडेड सिंथेटिक साड्या डिझायनर ब्रायडल कांची अँड पैठणी अशा विविध वेगवेगळ्या मध्ये प्रचंड व्हरायटीज उपलब्ध आहेत. यासोबतच फॅन्सी ड्रेस, मटेरियल ड्रेस, फॅन्सी ड्रेस मटेरियल, ड्रेस पार्टी वेअर, ऑफिशियल ड्रेस, वन पीस स्टेट लॉन्ग, ऑफिशियल ड्रेस पार्टीवेअर अशा मध्ये नवीन स्टॉक उपलब्ध असल्याचे त्यांनी सांगितले. सुंदर शालू म्हणजे व्ही. आर. पवार असे समीकरण झालेले आहे, व्ही. आर. पवार मध्ये सध्या खरेदीसाठी मोठे झुंबड उडत आहे त्यामुळे आपल्या आवडीची साडी किंवा लग्नबस्ता खरेदीसाठी आजच व्ही आर पवार सारीज शोरूम ला भेट द्यावे असे आवाहन अमर पवार, महेश पवार, गिरीश पवार यांनी केले आहे.

# मंदिर जतन संवर्धनाची कामे पुरातत्व विभाग, संबधित कंत्राटदारांनी वेळेत पूर्ण करावीत

## मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या सूचना; आराखड्यातील कामांचा अहवाल जिल्हाधिकारी, पुरातत्त्व विभागास देणार

### कार्तिकी यात्रेत भाविकांना सोयीसुविधा उपलब्ध करून देण्याचे नियोजन

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१३ ऑक्टोंबर-**

श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर व परिवार देवता मंदिराचे जतन व संवर्धनाचे काम पुरातत्त्व विभागाच्या मार्गदर्शनाखाली शासन निधीतून सुरू आहे. पुरातत्त्व विभाग व संबधित कंत्राटदारानी सदर कामास गती देऊन वेळेत व गुणवत्तापूर्ण कामे करावीत. तसेच आराखड्यातील काम अत्यंत संथगतीने सुरू असल्याने सदर कामाबाबत जिल्हाधिकारी सोलापूर व पुरातत्व विभाग यांना अहवाल सादर करण्यात येणार असल्याची माहिती मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिली.



श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरे समितीच्या बैठकीत ते बोलत होते. यावेळी मंदिर समितीचे सदस्य शकुंतला नडगिरे, डॉ. दिनेशकुमार कदम, भास्करगिरी महाराज, संभाजी शिंदे, हभप ज्ञानेश्वर देशमुख जळगावकर, हभप शिवाजीराव मोरे, कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, व्यवस्थापक मनोज श्रोत्री, लेखा अधिकारी मुकेश अनेचा, पुरातत्व विभागाचे सहायक संचालक डॉ. विलास वाहणे उपस्थित होते. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार व मुख्य सचिव सुजाता सौनिक यांच्या अभिनंदनाचा ठराव करण्यात आला. या बरोबरच कार्तिकी एकादशी १२ नोव्हेंबर रोजी होत आहे. या दिवशी पहाटे २.२० वाजता उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य व मानाचे वारकरी यांच्या हस्ते सपत्नीक शासकीय महापुजा केली जाणार आहे. दरम्यान परंपरेनुसार दि. ४ नोव्हेंबर रोजी श्रींचा पलंग काढून प्रक्षाळ पूजेपर्यंत ४ ते २० नोव्हेंबरदरम्यान २४ तास दर्शन उपलब्ध असणार आहे. मागील वर्षीप्रमाणे पत्राशेड येथे पूर्णवेळ अन्नछत्र सुरू करणे तसेच यात्रेच्या अनुषंगाने विविध सोयीसुविधांचा आढावा घेऊन भाविकांना पुरेसा प्रमाणात सोयीसुविधा उपलब्ध करून देण्याचे ठरले. धर्मादाय आयुक्त यांनी नुकतीच अनुकंपा तत्त्वावरील नियमावलीस मंजुरी दिली आहे. अमोल चंद्रकांत वाडेकर, अशोक विठ्ठल कोले, सुनिता अरूण माळवदकर, अभिमन्यू रंगनाथ क्षीरसागर या मयत कर्मचाऱ्यांच्या वारसांना सेवेत समाविष्ट करून घेण्याचा निर्णय घेण्यात आला. कर्मचाऱ्यांचे सेवानिवृत्तीचे वय ६० वर्षे करण्यात आले. सोलार प्लॉन्ट बसविणे, मंजूर २७० पदांच्या आकृतीबंधातील रिक्तपदे भरती भरण्यासाठी नियमावली बनवणे, एमटीडीसी भक्तनिवासाचा करार वाढवून घेणे, यमाई तुकाई मंदिर येथील जागा मागणीचा प्रस्ताव शासनास सादर करणे, नामदेव पायरी दरवाजाला मोफत चांदीने मढविणे, सिक्युरिटी कंपनीच्या प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने समिती गठीत करणे, मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांना महाराष्ट्ररत्न पुरस्कार मिळाल्याबद्दल अभिनंदनाचा ठराव करण्यात आला. संतांची भूमी असलेल्या महाराष्ट्रातील प्रमुख ठिकाणी म्हणजेच पंढरपूर (श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर), आळंदी (श्री संत ज्ञानदेव), त्र्यंबकेश्वर (श्री संत निवृत्तीनाथ), सासवड (श्री संत सोपानदेव), मुक्ताईनगर (श्री संत मुक्ताबाई), पैठण (श्री संत एकनाथ) व देहू (श्री संत तुकाराम) येथे कम्युनिटी रेडिओ प्रवर्तित करण्याचा मंदिर समितीचा मानस आहे, असे हभप गहिनीनाथ औसेकर महाराज यांनी बैठकीत बोलताना सांगितले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# भारताला ऐतिहासिक तीन कांस्यपदके

### आशियाई टेबल टेनिस स्पर्धा

◆ **अस्ताना, १३ ऑक्टोबर**

कझाकस्तान येथे सुरु असलेल्या आशियाई टेबल टेनिस अजिंक्यपद स्पर्धेत भारताने महिला दुहेरीतील ऐतिहासिक कांस्यपदकांसह तीन पदके जिंकलीत. रविवारी येथे उपांत्य फेरीत अहिका मुखर्जी व सुतीर्थ मुखर्जी या जोडीला पराभव पत्करावा लागला, परिणामी त्यांना कांस्यपदकावर समाधान मानावे लागले.

भारतीय पुरुष व महिला संघाने यापूर्वी सांघिक स्पर्धेत ऐतिहासिक कांस्यपदक पटकावले होते.

३० मिनिटे चाललेल्या उपांत्य सामन्यात जागतिक क्रमवारीत १५ व्या क्रमांकावर असलेल्या भारतीय जोडीला मिवा हरिमोटो व मियु किहारा या जपानच्या जोडीकडून ४-११, ९-११, ८-११ असा पराभव पत्करावा लागला. गतवर्षी आशियाड क्रीडा स्पर्धेत कांस्यपदकाच्या लढतीत जपानच्या ोडीने विद्यमान विश्वविजेत्या जोडीला चकित केले होते. त्याआधी भारतीय जोडीने उपांत्यपूर्व फेरीत दक्षिण कोरियाच्या किम न्योंग व ली युन्ह्ये यांचा पराभव करून आशियाड स्पर्धेत भारताला पहिले दुहेरीचे पदक जिंकून दिले होते.



महिला दुहेरीत कांस्यपदक पटकावणाऱ्या भारतीय टेबल टेनिसपटू

मनिका बत्रा, अहिका मुखर्जी व सुतीर्थ मुखर्जी या त्रिकुटाने १९७२ मध्ये स्पर्धा सुरू झाल्यापासून महिला सांघिक गटात देशासाठी पहिले पदक जिंकून दिले होते, तरीही त्यांना उपांत्य फेरीत जपानकडून १-३ ने पराभव पत्करावा लागला.

पुरुष गटात उपांत्य फेरीत शरथ कमल, मानव ठक्कर व हरमीत देसाई यांचा संघ चीन तैपेईकडून ०-३ असा पराभूत झाल्यानंतर भारताने आणखी एक कांस्यपदक मिळवले, या स्पर्धेत त्यांचे सलग तिसरे पदक ठरले.

पुरुष एकेरीत मानव ठक्कर व मानुष शाहने उपउपांत्यपूर्व फेरीत नमते घेतले. जागतिक क्रमवारीत ६० व्या स्थानावर असलेल्या मानव ठक्करने याआधी जागतिक क्रमवारीत १४ व्या स्थानावर असलेल्या दक्षिण कोरियाच्या जांग वूजिनला हाँगकाँगच्या बाल्डविन चॅनने ४-११, ४-११, ८-११ असे पराभूत केले.

दरम्यान, मानुषने चीन तैपेईच्या लिन युन-जूविरुद्ध कडवी झुंज दिली व दोन गेम जिंकले, परंतु त्यानंतर त्याला ८-११, ५-११, ११-७, ११-६, १२-१४ असा सहज पराभव पत्करावा लागला. (वृत्तसंस्था)

# विदर्भाच्या अथर्व तायडेचे शतक

### विदर्भाचे आंध्र प्रदेशसमोर ३१८ धावांचे आव्हान

### अमन मोखाडे व दानिश मालेवारचे अर्धशतक

### विदर्भ सर्वबाद ३६६, आंध्रप्रदेश १ बाद ७९

◆ **नागपूर, १३ ऑक्टोबर**

रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेत येथे सुरू असलेल्या एलिट ब गटाच्या साखळी सामन्यात तिसऱ्या दिवशी अथर्व तायडेचे शतक तसेच अमन मोखाडे व दानिश मालेवारच्या अर्धशतकांच्या बळावर विदर्भाने दुसऱ्या डावात १०२.१ षटकांत सर्वबाद ३६६ धावा उभारल्या आणि प्रतिस्पर्धी आंध्र प्रदेश संघासमोर विजयासाठी ३१८ धावा काढण्याचे लक्ष्य ठेवले. दिवस अखेर आंध्र प्रदेशने २१ षटकांत १ बाद ७९ धावा काढल्या. ते अजून २३९ धावांनी पिछाडीवर आहे.

खेळ थांबला तेव्हा अभिषेक रेड्डी नाबाद ३८ धावांवर, तर शेख रशीद नाबाद १८ धावांवर खेळत होते. हनुमा विहारी २२ धावा काढून हर्ष दुबेच्या चेंडूवर पायचित झाला.

विदर्भाच्या पहिल्या डावातील ११८ धावांच्या प्रत्युत्तरात आंध्रप्रदेशने १६७ धावा काढून ४९ धावांची आघाडी मिळविली होती.



अर्धशतक पूर्ण केल्यानंतर प्रेक्षकांना हात उंचावून अभिवादन करताना विदर्भाचा अथर्व तायडे

पहिल्या डाव गडगडल्यानंतर विदर्भाच्या फलंदाजांनी दुसऱ्या डावात देखणी फलंदाजी केली. सलामीवीर अथर्व तायडे व अमन मोखाडेने १३७ धावांची सलामी भागीदारी केली. अमनने ९८ चेंडूंत ५ चौकारांसह ५३ धावांची अर्धशतकी खेळी केली. त्यानंतर अथर्वने दानिश मालेवारच्या साथीने आपले शतक साजरे केले व त्याच्यासोबत दुसऱ्या गड्यासाठी ६७ धावांची भागीदारी करत संघाची धावसंख्या दोनशेच्या वर पोहोचवली. याचवेळी राजूने अथर्वला पायचित केले. अथर्व तायडेने १७० चेंडूंचा सामना करत १५ चौकार व २ षटकारांच्या साहाय्याने ११८ धावा काढल्या. दरम्यान, दानिश मालेवारनेही ६ चौकारांसह ६१ धावांची खेळी करत विदर्भाला मजबूत स्थितीत आणले. दानिशने करुण नायरसोबत तिसऱ्या गड्यासाठी ६८ धावांची भागीदारी केली. करुण नायर याने ४३ धावा काढल्या.

कर्णधार अक्षय वाडकरने ५७ चेंडूंत ५ चौकारांसह ४० धावांची भर घालत संघाला १०२.१ षटकांत सर्वबाद ३६६ धावांचा टप्पा गाठून देण्यास मदत केली. आंध्रतर्फे त्रिपूरन विजयने सर्वाधिक ४ खेळाडू बाद केले. ललित मोहन याने ३ व राजूने २ गडी बाद केले. विजयासाठी ३१८ धावा काढण्याचे आव्हान स्वीकारून आंध्रप्रदेशने तिसऱ्या दिवसअखेर दुसऱ्या डावात १ बाद ७९ धावा काढल्या असून त्यांना विजयासाठी आणखी २३९ धावांची गरज आहे. आंध्रप्रदेश संघाचे ललित मोहन, व्यंकट राजू, कर्णधार रिकी भुई, यष्टिरक्षक श्रीकर भारत अजून फलंदाजीला यायचे आहेत. आंध्रप्रदेश संघ विजय प्राप्त करतो की विदर्भाचे गोलंदाज या संघाला लक्ष्य गाठण्याच्या आधीच थांबवतील का, याकडे साऱ्यांचे लक्ष लागले आहे. (तभा वृत्तसेवा)

## महत्त्वाचे

### केनियाच्या रुथ चेपनेटिचचा मॅराथॉनमध्ये नवीन विश्वविक्रम

**शिकागो :** केनियाच्या रुथ चेपटेनिचने महिलांच्या मॅराथॉन स्पर्धेत नवीन विश्वविक्रम प्रस्थापित केला. रुथने जागतिक विक्रम मोडीत काढत काढताना दोन तास, नऊ मिनिटे आणि ५६ सेकंदांच्या अनधिकृत वेळेत ही मॅराऑन जिंकली. तिने गत विक्रमाला दोन मिनिटांनी मोडून विजेतेपद पटकावले. शिकागोमधील हे तिचे तिसरे विजेतेपद ठरले. तिने गत वर्षी बर्लिनमध्ये इथियोपियाच्या टिगस्ट असेफाचा (२:११:५३) मागील विक्रमाचा मोडीत काढला. इथिओपियाच्या सुटुम केबेडेने सात मिनिटे आणि ३६ सेकंदांसह दुसरे स्थान, तर केनियाच्या इरिन चेप्टाईने (२:१७:५१) तिसरे स्थान मिळविले. माझे स्वप्न सत्यात उतरले, अशा शब्दात रुथ चेपटेनिचने आनंद व्यक्त केला. रुथने सुरुवातीपासूनच धडाकेबाज वेग वाढविला व पहिले पाच किलोमीटरचे अंतर १५ मिनिटांत पार केले व अर्ध्या टप्प्यात तिने प्रतिस्पर्धी केबेडे हिच्यादरम्यान १४ सेकंदांची दरी निर्माण केली.

### भारताला कनिष्ठ विश्वचषक नेमबाजी स्पर्धेचे यजमानपद

**नवी दिल्ली :** भारताला रविवारी आंतरराष्ट्रीय नेमबाजी महासंघाकडून पुढील वर्षी आयएसएसएफ कनिष्ठ गट विश्वचषक नेमबाजी स्पर्धेचे यजमानपद बहाल करण्यात आले. आंतरराष्ट्रीय नेमबाजी महासंघाच्या हंगामाच्या अखेरच्या विश्वचषक नेमबपाजी अंतिम फेरीच्या स्पर्धेसाठी आयएसएसएफचे अध्यक्ष लुसियानो रॉसी येथे आले आहे. त्यांनी भारताला यजमानपद बहाल करत असल्याची घोषणा केली. पेरू येथे नुकत्याच पार पडलेल्या कनिष्ठ गटाच्या विश्व नेमबाजी स्पर्धेत भारताच्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल मी त्यांचे अभिनंदन करू इच्छितो. तसेच आम्ही २०२५ मध्ये आयएसएसएफच्या कनिष्ठ गट विश्वचषक स्पर्धेचे आणि भविष्यातील आंतरराष्ट्रीय स्पर्धांचे आयोजन करण्याच्या भारताच्या अर्जास समर्थन देऊ इच्छितो, असे रॉसी म्हणाले. भारत केवळ आपल्या प्रतिभावान खेळाडूंसहच, नव्हे तर खेळाच्या पायाभूत सुविधा वाढविण्याच्या वचनबद्धतेमुळे नेमबाजीच्या जगात एक महत्त्वपूर्ण शक्ती आहे, अशी प्रशंसाही त्यांनी यावेळी केली. नॅशनल रायफल असोसिएशन ऑफ इंडियाचे (एनआरएआय) चे अध्यक्ष कालिकेश सिंग देव यांनी आयएसएसएफचे आभार मानले.

### कलिंगा लान्सर्सचे स्ट्रॅटेजी संचालक डेव्हिड जॉन

**नवी दिल्ली :** आगामी हॉकी इंडिया लीग हंगामापूर्वी (एचआयएल) कलिंगा लान्सर्सने डेव्हिड जॉन यांची स्ट्रॅटेजी डायरेक्टर आणि डॉ. ए.बी.सुब्बय्या यांची संघ व्यवस्थापक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे, अशी घोषणा रविवारी वेदांत लिमिटेडच्या मालकांनी केली. या महत्त्वाच्या नियुक्त्या आगामी एचआयएल हंगामासाठी स्पर्धात्मक आणि यशस्वी संघ तयार करण्याच्या संघाच्या बांधिलकीवर प्रकाश टाकतात, कारण स्पर्धेत वर्चस्व गाजवण्याची तयारी करतात आणि स्पर्धा जिंकण्यासाठी सक्षम संघ घडवतात. डेव्हिड जॉन २०११ पासून भारतीय हॉकीशी संबंधित आहेत, त्यांनी राष्ट्रीय पुरुष संघाचे व्यायाम फिजिओलॉजिस्ट आणि हॉकी इंडियाचे उच्च-कार्यक्षमता संचालक म्हणून काम केले आहे. स्ट्रॅटेजी डायरेक्टर म्हणून डेव्हिड कलिंगा लान्सर्सला उत्तम कामगिरी करणारा संघ घडवण्यावर लक्ष केंद्रित करेल.

# दबाव अन् अपयशासह जगायला शिकलोय् : संजू सॅमसन

◆ **हैदराबाद, १३ ऑक्टोबर**

अपरिहार्य दबाव व अपयशाचा सामना करायला शिकलो आहे. वाईट परिस्थितीतून जात असताना संघ व्यवस्थापनाने मला योग्य मार्गदर्शन केले व आपली योग्यता सिद्ध करण्याची संधी दिल्याबद्दल मी त्यांचे मनापासून आभार मानतो, असे भारतीय संघाचा सलामीवीर संजू सॅमसन म्हणाला.

शनिवारी हैदराबाद येथे भारताने बांगलादेशविरुद्धच्या तिसऱ्या व अंतिम टी-२० सामन्यात ११८ धावांनी दणदणीत विजय नोंदविला व या विजयाबरोबरच तीन सामन्यांच्या टी-२० मालिकेत ३-० असे निर्विवाद वर्चस्व गाजविले. यात सलामीवीर संजू सॅमसनने बांगलादेशविरुद्ध पहिले टी-२० शतक झळकावले. त्याने अवघ्या ४७ चेंडूंत १११ धावांची देखणी शतकी खेळी केली, यात त्याने ११ चौकार व ८ षट्कार खेचलेत.

संजू सॅसमनने शतक झळकावताना प्रतिभा व उपयुक्तता यांच्यातील पूल बांधण्यात यश मिळविले, परंतु त्यापूर्वीचा कालावधी त्याच्यासाठी खरोखर खडतर होता. जुलैमध्ये श्रीलंकेविरुद्ध लागोपाठ दोन सामने व गत आठवड्यात बांगलादेशविरुद्धच्या आणखी दोन वाईट खेळीमुळे तो डगमगला होता.



श्रीलंकेहून परतल्यानंतर मला बांगलादेशविरुद्धच्या मालिकेत संधी मिळण्याबाबत साशंकता होती, पण मुख्य प्रशिक्षक गंभीर व कर्णधार सूर्यकुमार यादवने मला पाठिंबा दिला. काहीही झाले तरी आम्ही तुझ्या पाठीशी राहू असा दिलासा दिला, असे २९ वर्षीय संजू सॅमसन म्हणाला.

एक भारतीय क्रिकेटपटू म्हणून मी मानसिकदृष्ट्या बऱ्याच गोष्टींमधून जात आहात, विशेषतः टी-२० फॉरमॅटमध्ये दबाव व अपयशाचा सामना करायला शिकलो आहे, याचे बरेच श्रेय ड्रेसिंग रूमला, नेतृत्व गटाला व कर्णधार आणि प्रशिक्षकांना जाते, कारण ते माझ्या पाठीशी आहेत, असेही तो म्हणाला.

मुख्य प्रशिक्षक गंभीर यांनी बांगलादेश मालिकेदरम्यान सलामीवीराची भूमिका माझ्याकडे सोपवण्याचा निर्णय अगोदरच कळवला होता. या मालिकेच्या तीन आठवड्यांपूर्वी 'मी सलामी फलंदाज म्हणून मैदानात उतणार आहे' असा संदेश मुख्य प्रशिक्षक गंभीर, कर्णधार सूर्यकुमार व सहायक प्रशिक्षक अभिषेक नायर या नेतृत्व गटाकडून मिळणे, याबद्दल मी स्वतःला खूप भाग्यवान समजतो, असे तो म्हणाला.

मी राजस्थान रॉयल्स अकादमीमध्ये परत गेलो व नवीन गोलंदाजांविरुद्ध बरेच खेळलो, त्या तयारीमुळे मला थोडीशी मदत झाली. त्यामुळे मी इतर कोणत्याही मालिकेपेक्षा या मालिकेत १० टक्के अधिक सज्ज होतो. भूमिका स्पष्टतेमुळे मला स्वतःची जागरूकता विकसित करण्यास मदत झाली, असेही तो म्हणाला. (वृत्तसंस्था)

## ए. जी. पाटील महाविद्यालयात उद्यापासून विभागीय खो-खो स्पर्धा

### डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशात्र विद्यापीठाचे सलग तिसऱ्यांदा सोलापूर झोनचे यजमानपद

**सोलापूर, दि. १३ ऑक्टोबर-**

ए. जी. पाटील महाविद्यालयात उद्यापासून विभागीय खो-खो स्पर्धेचे आयोजन केले आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशात्र विद्यापीठ लोणेरे (जि. रायगड) अंतर्गत सोलापूर झोनचे यजमानपद सलग तिसऱ्यांदा ए. जी. पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय सोलापूरला मिळाले. या शैक्षणिक वर्षाच्या १५ व १६ ऑक्टोबर रोजी सोलापूर विभागीय खो -खो स्पर्धेचे आयोजन केले आहे. यात सोलापूर विभागातील धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली व सोलापूर अशा ६ जिल्ह्यातील व्यावसायिक शिक्षण देणाऱ्या विद्यापीठ संलग्न महाविद्यालयातील ३५० खेळाडू सहभागी होणार आहेत. संस्थेचे अध्यक्ष सिद्धेश्वर पाटील, संचालक शिवानंद पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली कॅम्पस डायरेक्टर डॉ. एम. ए. चौगुले, प्राचार्य डॉ. व्ही. व्ही. पोतदार, सर्व विभाग प्रमुख, डिपार्टमेंट स्पोर्ट्स कॉर्डिनेटर, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व महाविद्यालयाचे खेळाडू यांच्या सहकार्याने शारीरिक शिक्षण संचालक प्रा. शिवशरण एस. कोरे यांनी या स्पर्धेचे आयोजन केले आहे.



## संगमेश्वर महाविद्यालयाची विभागीय तलवारबाजी स्पर्धेत ५ पदकांची कमाई

**सोलापूर, दि. १३ ऑक्टोबर-**

विभागीय शालेय तलवारबाजी स्पर्धेमध्ये संगमेश्वर कनिष्ठ महाविद्यालयाच्या खेळाडूंनी ३ सुवर्ण, १ रौप्य व १ कांस्य अशी ५ पदकांची कमाई केली. या खेळाडूंना शारीरिक शिक्षण संचालक डॉ. आनंद चव्हाण, शारीरिक शिक्षण शिक्षक प्रा.संतोष खेंडे, प्रा. विक्रांत विभुते व प्रा. शरणबसवेश्वर वांगी यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे श्री संगमेश्वर एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन धर्मराज काडादी, सचिवा ज्योती काडादी, प्राचार्य डॉ. ऋतुराज बुवा, उपप्रचार्य प्रा.प्रसाद कुंटे आदींनी अभिनंदन केले.

**कामगिरी : सेबर :** समृद्धी घाळे (सुवर्ण), श्रुतिका चव्हाण (रौप्य), श्रेयस तळभंडारे (सुवर्ण), व्यंकटेश खंडेलवाल (कांस्य). फॉईल : सुमित जाधव (सुवर्ण).

### ऑस्ट्रेलिया दौऱ्यासाठी ऋतुराज गायकवाडला आशा

**श्रीनगर :** रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेत अ गटाच्या साखळी सामन्यात जम्मू काश्मीरने महाराष्ट्र संघाविरुद्ध ७ बाद ५१९ धावांवर आपला पहिला डाव घोषित केला. याला चोख प्रत्युत्तर देताना महाराष्ट्राच्या ऋतुराज गायकवाडने सलामीवीर सिद्धेश वीरसोबत १७५ धावांची भागीदारी केली. युधवीर सिंगने बाद करण्यापूर्वी ऋतुराज गायकवाडने १३० चेंडूंत १३ चौकारांसह ८६ धावा केल्या. महाराष्ट्राचे दोन गडी २९ धावांत बाद झाल्यानंतर ऋतुराज व सिद्धेशने संघाचा डाव सावरला. त्यामुळे आगामी बॉर्डर-गावस्कर करंडक स्पर्धेसाठी भारताच्या संघात स्थान मिळविण्याचे लक्ष्य असलेला महाराष्ट्राचा कर्णधार गायकवाड याने रणजी करंडक हंगामात शानदार सुरुवात केली आहे.

# स्कॉटलंडला नमवून इंग्लंड उपांत्य फेरीत

### आयसीसी महिला टी-२० विश्वचषक क्रिकेट

◆ **शारजाह, १३ ऑक्टोबर**

माईया बाऊचर (नाबाद ६२) व डॅनी व्याट-हॉजच्या (नाबाद ५१) नाबाद शतकी भागीदारीच्या बळावर इंग्लंडने स्कॉटलंडला १० गड्यांनी पराभूत करून आपल्या ब गटात अव्वल स्थानी झेप घेत रविवारी येथे महिला टी-२० विश्वचषक क्रिकेट स्पर्धेच्या उपांत्य फेरीत प्रवेश केला.

प्रथम फलंदाजी करताना स्कॉटलंडने निर्धारित २० षटकांत बाद १०९ धावा केल्या. प्रत्युत्तरादाखल इंग्लंडचे सलामीवीर माईया बाऊचर व डॅनी व्याट-हॉजने नाबाद खेळी करत अवघ्या १० षटकांत आपल्या संघाला सामना जिंकून दिला.

माईया बाऊचरने ३४ चेंडूंत १२ चौकारांसह नाबाद ६२ धावांची, तर डॅनी व्याट-हॉजने अवघ्या २६ चेंडूंत ७ चौकारांसह नाबाद ५१ धावांची विजयी खेळी केली.

स्कॉट्लंड संघाची फलंदाजी पुरेशी चांगली होती, परंतु इंग्लंडच्या गोलंदाजांनी त्यांना खेळपट्टीवर टिकू दिले नाही. कर्णधार कॅथरिन ब्राइसने तेवढी २८ चेंडूंत ३३ धावांची खेळी केली व सारा ब्राइसने ३१ चेंडूत २७ धावांची भर घातली. इंग्लंडची सोफी एक्लेस्टोन (४ षटकांत १३ धावांत २ बळी टिपत सामन्यातीप यशस्वी गोलंदाज ठरली.



सामनावीर माईया बाऊचर

सामना सुरू होण्यापूर्वी तिसऱ्या क्रमांकावर असलेल्या इंग्लंडला आपली निव्वळ धावगती दक्षिण आफ्रिकेच्या पुढे नेण्यासाठी ११.५ किंवा त्यापेक्षा कमी षटकांत लक्ष्याचा पाठलाग करणे आवश्यक होते आणि वेस्ट इंडिजच्या निव्वळ धावगतीला मागे टाकण्यासाठी ९.३ किंवा त्यापेक्षा कमी षटकांत लक्ष्य गाठायचे होते. (वृत्तसंस्था)

# सचिन तेंडुलकर टेक्सासमधील युवा खेळाडू, चाहत्यांना प्रोत्साहित करणार

◆ **ह्यूस्टन, १३ ऑक्टोबर**

दिग्गज सचिन तेंडुलकर आपल्या टेक्सासच्या बहुप्रतिक्षित भेटीदरम्यान युवा खेळाडूंना व क्रीडा चाहत्यांनाप्रोत्साहित करणार आहे. सचिन नॅशनल क्रिकेट लीग (एनसीएल) फायनल वीकेंडचा भाग म्हणून एका विशेष क्रिकेट कार्यशाळेचे नेतृत्व करणार आहे.

डॅलस येथील टेक्सास विद्यापीठात आयोजित करण्यात येणाऱ्या या या कार्यशाळेचा उद्देश क्रिकेटपटूंना प्रेरित करणे आणि अमेरिकेत तळागाळात क्रिकेट खेळण्यास प्रोत्साहन देणे हा आहे.

क्रिकेटने मला खूप काही दिले आहे व आता त्याची परतफेड करण्याची वेळ आली आहे, असे तेंडुलकर रविवारी सकाळी होणाऱ्या कार्यक्रमापूर्वी म्हणाला.



या युवा खेळाडूंना भेटण्यास मी खूप उत्सुक आहो. कठोर परिश्रम व उत्कटतेने कार्य केल्यास काहीही शक्य आहे हे मला त्यांना दाखवून द्यायचे आहे, असेही तो म्हणाला. या क्रिकेटच्या कार्यशाळेशिवाय सचिन प्रतिष्ठित टीएक्स-ओयू फुटबॉल सामन्यात तसेच डॅलस काउबॉयच्या फुटबॉल सामन्यातसुद्धा विशेष पाहुणा म्हणून उपस्थित राहणार आहेत.

एनसीएलचा फायनल वीकेंड हा केवळ क्रिकेट स्पर्धेपेक्षा जास्त आनंददायी आहे. यात सचिन तेंडुलकरची उपस्थिती ही प्रेरणादायी स्वप्नासारखी आहे. मुलांना मार्गदर्शन करण्यासाठी सचिनसारखा क्षमतापूर्ण खेळाडू असणे महत्त्वाचे आहे, असे एनसीएलचे अध्यक्ष अरुण अग्रवाल म्हणाले.

चाहत्यांना सामन्यांसोबतच सांस्कृतिक उत्सव, थेट बॉलिवूड परफॉर्मन्स व थीमचा आनंद लुटता येईल,असेही ते म्हणाले. १४ ऑक्टोबर रोजी यूटी डॅलस येथे एनसीएल स्पर्धेचा समारोप होईल.


अमेरिकेतील क्रिकेटच्या वाढत्या लोकप्रियतेमुळे एनसीएलकडे सुनील गावसकर, वसीम अक्रम व सर व्हिव्हियन रिचर्ड्स सारख्या प्रतिभांना आकर्षित केले आहे.

या हंगामात शाहिद आफ्रिदी, सुरेश रैना, शाकिब अल हसन आणि ख्रिस लिन सारखे स्टार खेळाडूसुद्धा सहभागी झाले आहेत, ज्यामुळे एनसीएल जागतिक क्रिकेट मंचावर एक प्रमुख कार्यक्रम झाला आहे. (वृत्तसंस्था)

### तनुष कोटियनचे ५ बळी बडोद्याविरुद्ध मुंबईची मुसंडी

◆ **वडोदरा, १३ ऑक्टोबर**

रविवारी येथे रणजी करंडक अ गटातील सामन्याचा तिसरा दिवशी उजव्या हाताचा ऑफस्पिनर तनुष कोटियनने शानदार गोलंदाजी दाखवत पाच गडी बाद केले. गतविजेत्या मुंबईने बडोदा संघाला दुसऱ्या डावात १८५ धावांत गुंडाळले. आता मुंबईसमोर विजयासाठी २६२ धावा काढण्याचे लक्ष्य असून दिवसअखेर मुंबईने २ बाद ४२ धावा केल्या आहे. त्यांना अजून २२० धावा काढण्याची गरज आहे. मुंबईच्या २५ वर्षीय तनुषने ६१ धावांत ५ बळी टिपताना बडोद्याच्या अव्वल फळीतील तीन आणि तळाच्या फळीतील दोन फलंदाजांना बाद केले. तनुषला ऑफ-स्पिनर हिमांशू सिंग (३-५०) याने समर्थपणे साथ दिली. (वृत्तसंस्था)





### इंडियन मॉडेल स्कूलच्या पांढरे, जाधव यांची राज्य स्पर्धेसाठी निवड

**सोलापूर, दि. १३ ऑक्टोबर-**

इंडियन मॉडेल स्कूल स्टेट बोर्डाच्या अनुजा पांढरे व देवांश जाधव या दोघांची विभागीय शालेय मैदानी स्पर्धेसाठी निवड झाली. शालेय शहर मैदानी स्पर्धा एस आर पी कॅम्प सोरेगाव येथे झाल्या. १७ वर्षाखालील मुलींच्या गटात थाळीफेक व गोळाफेक प्रकारात अनुजा पांढरे हिने द्वितीय क्रमांक मिळविला. १४ वर्षाखालील मुलांच्या गटात देवांश जाधव याने १०० मीटर धावणेमध्ये द्वितीय क्रमांक मिळविला. या कामगिरीवर दोघांची विभागीय स्पर्धे साठी निवड झाली आहे. त्यांना क्रीडा शिक्षक अक्षय माने यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे संस्थापक अध्यक्ष ए. डी. जोशी, सचिव अमोल जोशी, श्री साई महिला प्रतिष्ठानच्या सचिवा सायली जोशी, मुख्याध्यापिका सुजाता बुट्टे, ममता बसवंती यांनी अभिनंदन केले.



### सिद्धेश्वर कन्या प्रशालेची निर्मला मल्लापुरे हिची राज्य तलवारबाजी स्पर्धेसाठी निवड

**सोलापूर, दि. १३ ऑक्टोबर**

विभागीय तलवारबाजी स्पर्धेत सिद्धेश्वर कन्या प्रशालेच्या निर्मला उमेश मल्लापुरे हिची राज्य तलवारबाजी स्पर्धेसाठी निवड झाली आहे. विभागीय स्पर्धेत १९ वर्षाखालील गटात निर्मलाने सेबर या प्रकारात तृतीय क्रमांक प्राप्त केला. या कामगिरीवर तिची निवड झाली. तिला क्रीडा शिक्षक गुरुसिद्ध होर्तीकर यांचे मार्गदर्शन लाभले. तिचे शालेय शिक्षण समितीचे चेअरमन धर्मराज काडादी, भीमाशंकरजी पटणे, गुरुराज माळगे, डॉ. राजशेखर येळीकर, श्री नाडगौडा, समन्वयक संतोष पाटील, मुख्याध्यापिका संगीता गोटे, पर्यवेक्षिका सुनिता वाले यांनी अभिनंदन केले.

# राज्य शालेय तलवारबाजी स्पर्धेसाठी सिद्धेश्वर स्कूलचे ५ खेळाडू

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ ऑक्टोबर-**

श्री सिद्धेश्वर इंग्लिश मीडियम स्कूलच्या पाच खेळाडूंची राज्य शालेय तलवारबाजी स्पर्धेसाठी निवड झाली. विभागीय स्पर्धेतील कामगिरीवर त्यांची निवड झाली. त्या खेळाडूंना क्रीडाशिक्षक पवन भोसले यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे श्री सिद्धेश्वर देवस्थान शिक्षण संकुलाचे चेअरमन धर्मराज काडादी, श्री सिद्धेश्वर देवस्थान शिक्षण समितीचे सदस्य डॉ. राजशेखर येळीकर, भीमाशंकर पटणे, गुरुराज माळगे, मल्लिकार्जुन कळके व समन्वयक संतोष पाटील, मुख्याध्यापक योगेश राऊत, पर्यवेक्षिका नीता तमशेट्टी, सांस्कृतिक विभाग प्रमुख विजयालक्ष्मी बिराजदार, श्रुती कुलकर्णी, विजयालक्ष्मी नष्टे आदींनी अभिनंदन केले.



**विभागीय शालेय स्पर्धेची कामगिरी :** अमृता शृंगारपुरे (सुवर्ण), यज्ञेश्वर पाटील (रौप्य), नंदिता नांदुरकर (रौप्य), आर्या तानवडे (रौप्य), विराज लोणारी (कांस्य).



### सॉफ्टबॉल स्पर्धेत आसावा प्रशालेस विजेतेपद

**सोलापूर, दि. १३ ऑक्टोबर-**

मल्लिकार्जुन प्रशालेच्या मैदानावर झालेल्या शालेय शहर सॉफ्टवेअर स्पर्धेत दयानंद काशिनाथ असावा प्रशालेच्या १४ वर्षाखालील मुलींच्या संघाने विजेतेपद पटकावले. सलामीचा सामन्यात त्यांनी एसव्हीसीएस प्रशालेचा एक डाव व ११ गुणांनी विजय मिळविला. अंतिम सामन्यात त्यांनी मल्लिकार्जुन प्रशालेचा १० धावेच्या फरकाने मात केली. यात संध्या भोपळे, वैभवी भोजरंगे, श्रद्धा तोडकरी यांनी उल्लेखनीय खेळी केली. संघास क्रीडाशिक्षका मनीषा पाटील व क्रीडाशिक्षक प्रमोद कुनगुलवार यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे संस्थेचे सचिव महेश चोपडा, प्रशासक व्ही. बी. उबाळे, मुख्याध्यापक जितेंद्र पवार, पर्यवेक्षक संतोष हंपे यांनी अभिनंदन केले.

## संक्षिप्त वृत्त



### मार्डीत विजयादशमीनिमित्त पथसंचलन

**सोलापूर, दि. १३ ऑक्टोबर-**

शंभर वर्षांपूर्वी स्थापन केलेल्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने आतापर्यंत कोट्यवधी स्वयंसेवक निर्माण केले असून, भारतीय संस्कृती, धर्म आणि समाजाच्या रक्षणासाठी सदैव कटिबद्ध असलेल्या आर.एस.एस.चे २०२४-२५ हे शताब्दी वर्ष असून, त्यानिमित्त कुटुंब प्रबोधन, समरसता व पर्यावरण संतुलन हा त्रिसूत्री कार्यक्रम राबविण्यात येणार असल्याचे पश्चिम महाराष्ट्राचे प्रांत सह तरुण व्यवसायिक प्रमुख चंद्रशेखर पाठक यांनी सांगितले. विजया दशमीनिमित्त उत्तर सोलापूर तालुक्याचे पथसंचलन रविवारी मार्डी येथे झाले. त्यावेळी ते बोलत होते. स्थापत्य अभियंता संभाजी पाटील, तालुका संघचालक चंद्रकांत गडेकर उपस्थित होते. मार्डी गावातून संघाच्या स्वयंसेवकांचे शानदार शिस्तबद्ध पथसंचलन करण्यात आले. त्यानंतर झालेल्या बौद्धिक कार्यक्रमात ते बोलत होते. मार्डी शाखा प्रमुख सूरज इनामदार यांनी पद्य म्हटले. रुपेश मठे यांनी संस्कृत सुभाषित म्हटले. उदय काळे यांनी अमृतवचन म्हटले. प्रमोद इनामदार याने प्रार्थना म्हटली. मार्डीसह डोणगाव, कारंबा, वडाळा, बाणेगाव, सोलापूर शहरातील स्वयंसेवक उपस्थित होते.

### अतिरिक्त शिक्षकांना मिळाली पदस्थापना

**सोलापूर, दि. १३ ऑक्टोबर-**

सन २०१९ ते २०20 च्या दरम्यान अनेक शिक्षक अतिरिक्त झाल्यामुळे त्यांना पदस्थापना गिळाली नव्हती. परंतु माध्यमिक शिक्षणाधिकारी सचिन जगताप यांनी आपल्या कामाचा धडाका दाखवित शिक्षकांचे समायोजन करून हातात आर्डरही दिल्याने शिक्षकांच्यामध्ये समाधान व्यक्त करण्यात येत आहे.



जिल्ह्यातील माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागाकडील अल्पसंख्याक, विगर अल्पसंख्याक, २० टके, ४० टक्के व ६० टक्के अनुदान असलेले बरेच शिक्षक अतिरिक्त झाले होते. या शिक्षकांना तत्कालीन शिक्षणाधिकाऱ्यांनी समायोजन केले होते. परंतु त्यांना हजर करून घेतले नाहीत. त्यामुळे पदस्थापना मिळावी यासाठी गेल्या अनेक वर्षांपासून शिक्षक माध्यमिक शिक्षण विभागाकडे हेलपाटे मारत होते. मात्र शिक्षणाधिकारी जगताप यांनी या शिक्षकांच्या समायोजनासाठी सुरूवातीला संच मान्यता पूर्ण केली. संच मान्यता झाल्यानंतर या शिक्षकांचे समायोजन केले.



### मोहोळमध्ये राष्ट्रसेविका समितीचे पथसंचलन

**मोहोळ, दि. १३ ऑक्टोबर-**

राष्ट्रसेविका समिती मोहोळ शाखेच्या वतीने रविवारी सघोष पथसंचलन पार पडले. मोहोळ तालुक्याच्या इतिहासात पहिल्यांदाच अशा प्रकारचे महिलांचे संचलन पार पडले. जिल्ह्यातील अकलूज, दहिगाव माळशिरस, वेळापूर, पंढरपूर, बार्शी, सोनंद, सांगोला, मंगळवेढा, सोलापूर शहर, कुर्डूवाडी, करमाळा, माढा आणि मोहोळ आदी गावांतून समितीच्या ३८० ते ४०० स्वयंसेविका संचलनामध्ये सहभागी झाल्या होत्या. सुरुवातीला शस्त्र पूजन आणि ध्वजारोहण झाले. त्यानंतर प्रतिमापूजन होऊन प्रार्थना झाली. त्यानंतर जिल्हा बौद्धिक प्रमुख सविता लळीत यांनी संचलन आणि राष्ट्रसेविका समितीचे कार्य याविषयी मार्गदर्शन केले. त्यानंतर संचलनाला सुरुवात झाली. ठिकठिकाणी नागरिकांनी पुष्पदृष्टी करून स्वागत केले. या संचलनामध्ये विभाग कार्यवाहिका गायत्रीताई सुमंत, जिल्हा कार्यवाहिका देवयानी देशमुख, जिल्हा सहकार्यवाहिका अनुजाताई जोशी, जिल्हा निधी प्रमुख रोहिणी गोरे, सोलापूर शहर कार्यवाहिका माधवी पटवर्धन, शहरबौद्धिक प्रमुख शैलाताई भट या अधिकारी म्हणून उपस्थित होत्या. संचलन यशस्वी होण्यासाठी अनिता पांढरे, डॉ. स्वाती हराळे, विनया देशपांडे, मानसी सोवनी आदिंनी परिश्रम घेतले.

# विधानसभेसाठी जिल्हा प्रशासन सुसज्ज

**• जिल्हा प्रशासनाचे लक्ष आचारसंहितेकडे**

## अंतिम मतदार यादी, ईव्हीएम जनजागृती अन् प्रशिक्षण पूर्ण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ ऑक्टोबर-**

जिल्ह्यातील ११ विधानसभा मतदारसंघातील मतदार यादीचे ३० ऑगस्ट २०२४ अंतिम प्रसिध्दीकरण झाले आहे. शहर आणि जिल्हाभरात ईव्हीएम मशीन जनजागृती झाली अन् पुण्याच्या विभागीय कार्यालयात निवडणूक अधिकारी अन् कर्मचाऱ्यांना प्रशिक्षणही दिले असून, आता वाट पाहायची ती आचारसंहितेची. आता केव्हाही विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागली तरी जिल्हा प्रशासनातील अधिकारी-कर्मचारी जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या मार्गदर्शनाखाली विधानसभा निवडणूक घेण्यासाठी सज्ज असल्याची माहिती उपजिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी गणेश निऱ्हाळी यांनी आज (दि. १३) दिली.

आगामी विधानसभा निवडणुकीची अंतिम मतदार यादी नुकतीच प्रसिध्द झाली आहे. ६ ऑगस्टच्या प्रारूप मतदार यादीमध्ये ३६ लाख ९२ हजार ४०९ इतकी असून, यामध्ये पुरूष १९ लाख ८ हजार १४६, महिला १७ लाख ८३ हजार ९६६ व इतर २९७ मतदारांचा समावेश होता. ३० ऑगस्टच्या अंतिम मतदार यादीमध्ये ३७ लाख ६३ हजार ७८९ इतकी मतदार संख्या असून यामध्ये पुरूष १९ लाख ३५ हजार ९७९, महिला-१८ लाख २७ हजार ५०८ व इतर ३०२ मतदारांचा समावेश आहे. जिल्ह्यातील ११ विधानसभा मतदारसंघात ३७२३ मतदान केंद्र असून, ३७ लाख ६३ हजार ७८९ मतदार संख्या आहे. ६ ते ३० ऑगस्ट दरम्यान ७५ हजार ८२४ इतक्या मतदाराची नोंदणी झालेली आहे. लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ मध्ये ३६१७ मतदार केंद्र होती. यामध्ये मतदान केंद्राचे सुसूत्रीकरण करून १२४ मतदान केंद्राची नव्याने वाढ होऊन मतदान केंद्राची संख्या ३७२३ झालेली आहे. या मतदान केंद्रापैकी शहरी ११७७ व ग्रामीण भागामध्ये २५४६ मतदान केंद्राचा समावेश आहे.




लोकसभा निवडणुकीच्या धर्तीवरच आगामी विधानसभा निवडणुकीपूर्वी ईव्हीएम प्रणालीबाबत जिल्ह्यातील नागरिक आणि लोकप्रतिनिधींचे असलेले गैरसमज दूर करण्यासाठी केंद्र आणि राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशान्वये त्या ईव्हीएम मशीन्सची जनजागृती, प्रसार आणि प्रसिध्दीसाठी दि. १० सप्टेंबर ते ९ ऑक्टोंबर २०२४ पर्यंत महिनाभर जिल्ह्यात जनजागृती मोहीम राबविण्यात आली. या जनजागृती मोहिमेत १८ हजार ०६९ जणांनी या मशीनचे प्रात्यक्षिक घेवून समाधान व्यक्त केल्याची माहिती उपजिल्हा निवडणूक अधिकारी कार्यालयाकडून मिळाली. तर पुणे येथील विभागीय कार्यालयात सोलापूरचे निवडणूक अधिकारी, कर्मचाऱ्यांनी प्रशिक्षण पूर्ण केले आहे. यामुळे आगामी विधानसभा निवडणूक कधीही लागली तरी आमची यंत्रणा जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या मार्गदर्शनाखाली तयार असल्याचाही निर्वाळा निऱ्हाळी यांनी शेवटी दिला.

**६ ते ३० ऑगस्ट २०२४ च्या दरम्यान ७५ हजार ८२४ मतदारांची वाढ**



अंतिम मतदार यादीत एकूण ३७ लाख ६३ हजार ७८९ मतदार आहेत. ६ ऑगस्ट ते ३० ऑगस्ट या दरम्यान एकूण ७५ हजार ८२४ मतदारांची वाढ झालेली आहे. दि. ६ ऑगस्ट २०२४ च्या प्रारूप मतदार यादीमध्ये एकुण ३६ लाख ९२ हजार ४०९ इतकी असून, यामध्ये पुरूष १९ लाख ८ हजार १४६, महिला १७ लाख ८३ हजार ९६६ व इतर-२९७ मतदारांचा समावेश होता. दि. ३० ऑगस्ट २०२४ च्या अंतिम मतदार यादीमध्ये एकुण ३७ लाख ६३ हजार ७८९ इतकी मतदार संख्या असून, यामध्ये पुरूष-१९ लाख ३५ हजार ९७९, महिला- १८ लाख २७ हजार ५०८ व इतर ३०२ मतदारांचा समावेश आहे. अंतिम मतदार यादीमध्ये आपले नाव आहे किंवा नाही याची मतदारांनी खात्री करावी.

**- कुमार आशीर्वाद, जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी**

**जिल्ह्यासाठी ४ हजार ९०० ईव्हीएम मशीन तयार**

मतदारांमध्ये ईव्हीएम मशीनच्या वापराबाबत जनजागृती करण्यासाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन केले होते. आमच्या कर्मचाऱ्यांनी जिल्हाभरात फिरून मतदार बांधवांना ईव्हीएम मशीनची प्रात्यक्षिके सर्व ११ तालुक्यात दाखविली. यामुळे आचारसंहिता लागल्यावर पुढील प्रक्रिया चालू होणार आहेत. या निवडणुकीसाठी ४ हजार ९०० ईव्हीएम मशीन तयार करून ठेवल्या आहेत. आता आचारसंहिता लागल्यावर एकेक निवडणूक प्रक्रिया चालू होतील.

**- गणेश निऱ्हाळी,**
उपजिल्हा निवडणूक अधिकारी

# गरब्याच्या ठेक्यावर थिरकले सोलापूरकर

**• दिलीप माने विचार मंचचा दांडिया फेस्टिव्हल उत्साहात**

**तभा वृत्तसेवा,**
**मंद्रुप, दि. १३ ऑक्टोबर-**

नवरात्रीच्या मंगल पर्वाच्या निमित्ताने दिलीप माने विचारमंच आणि आदिती फाऊंडेशनच्या वतीने जुळे सोलापूरमध्ये दांडिया महोत्सव मोठ्या उत्साहात पार पडला. माजी आमदार दिलीप माने यांच्या हस्ते तुळजाभवानीच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी सोलापूरकरांनी गरब्याच्या ठेक्यावर ताल धरत दांडिया फेस्टिव्हल रंगतदार बनवला.

यावेळी माजी आ. दिलीप माने, युवा नेते पृथ्वीराज माने, अश्विनी हॉस्पिटल व मेडिकल कॉलेजचे डायरेक्टर अमितभाई पटेल, गांगजी मिल्स शोरूमचे अमित गांगजी, डॉ. दामा, डॉ सचिन तावसे, डॉ. अभिषेक शाह, डॉ. स्वाती चिट्टे, डॉ. गोळवलकर, डॉ. प्रिया मेंगजी, इन्स्पायर अकॅडमीचे मलाड, शैलजा राठोड, प्रा. रोकडे, शहा, श्रीकांत मेलगे-पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.नवरात्रीच्या निमित्ताने जुळे सोलापूरमध्ये पहिल्यांदाच भव्य स्वरूपात दांडिया फेस्टिव्हलचे आयोजन करण्यात आले होते. शहर आणि ग्रामीण भागातील युवक-युवती आणि महिला भगिनींनी मोठ्या प्रमाणात सहभाग घेतल्याचे दिसून आले. या दांडिया फेस्टिव्हलमध्ये उत्कृष्ट दांडिया सादरीकरण करणाऱ्या सहभागींचा विशेष सन्मान करण्यात आला. विजेत्यांना पृथ्वीराज माने यांच्या हस्ते उत्कृष्ट दांडिया पुरस्कार वितरित करण्यात आले. या पुरस्कारामुळे सहभागींच्या आनंदात अधिक भर पडली, आणि त्यांच्या कलेला प्रोत्साहन मिळाले.




**दांडिया फेस्टिव्हलचे विजेते**

१५ वर्षाखालील विजेते : दुर्गा सागर साळुंखे, प्रिया उटगी, सोनिया जक्कन, स्वरांजली जगदाळे, प्रतिभा म्हमाणे, स्वरा कोठारी. वैयक्तिक दांडिया-गरबा विजेते : एकता कांबळे, सफा शेख, रोशनी हुंडारे, अमृता वर्मा, वयोगट ४० वर्षा पुढील विजेते : शैला सावने, गीता हुंडारे, नीलफर बागवान, सारिका मदने. : विजेते ग्रुप : मॉडेल कॉलनी ग्रुप, राजमाता ग्रुप, वुमन्स पॉवर ग्रुप, जागृत ग्रुप सैफुल, हिरकणी ग्रुप.



# सोलापूर जिल्ह्यातील आट्यापाट्या संघाची निवड

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. १३ ऑक्टोबर**

राज्य आट्यापाट्या संघटना व बुलढाणा जिल्हा आट्यापाट्या असोसिएशनतर्फे शेगाव (जि. बुलढाणा) येथे १८ ते २० ऑक्टोबर रोजी १७ वर्षीय मुले व मुली यांच्या राज्यस्तरीय आट्यापाट्या स्पर्धा घेण्यात येणार आहेत. यासाठी जिजाऊ गुरुकुल खांडवी येथे चाचणी घेण्यात आली. यात ७० मुले व ३० मुलींनी आपला सहभाग घेतला. याच्यातून अंतिम १६ मुले व १४ मुलींची निवड करण्यात आली.

पुरुष व महिला सिनिअर राज्यस्तरीय आट्यापाट्या अजिंक्यपद स्पर्धा खडवली (जि. ठाणे) येथे ४ ते ६ नोव्हेंबरदरम्यान होणार आहेत. यासाठी झालेल्या चाचणीत ४० मधून १२ मुले, सिनियरसाठी ३५ मुलींमधून १२ मुलींची निवड झाली. जिल्हा आट्यापाट्या असोसिएशनचे अध्यक्ष बाबासाहेब कापसे व उपाध्यक्ष राजकुमार मुंबरे यांनी केली. यावेळी जिजाऊ गुरुकुलचे संस्थापक अध्यक्ष संभाजी घाडगे, प्रिन्सिपल कदम, मेजर शिंदे हे उपस्थित होते. कोच दत्ता झांबरे, मल्हारी भुसणर तसेच राष्ट्रीय खेळाडू रावसाहेब माने, रोहन भूसणर, शेखर साळुंखे यांनी पंचाची भूमिका बजावली.

# सहकार्यामुळे पालिका शाळांचा पटवाढ : जावीर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ ऑक्टोबर-**

महापालिका शिक्षण मंडळात जवळपास १९ महिने प्रभारी प्रशासनाधिकारी कार्यरत असताना सर्वांच्या सहकार्यामुळे महापालिका शाळेतील विद्यार्थ्यांचा पट वाढविण्यात यश आले, असे प्रतिपादन नूतन शिक्षण निरीक्षक (बृहन्मुंबई) संजय जावीर यांनी येथे केले.

प्रभारी प्रशासन अधिकारी संजय जावीर यांची शिक्षण निरीक्षकपदी पदोन्नतीने बदली झाल्याबद्दल आणि पत्रकारिता भूषण पुरस्कार मिळाल्याबद्दल किरण बनसोडे यांचा सत्कार करण्यात आला, त्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी शिक्षण मंडळाचे मुख्य लिपिक माहेजबीन शेख, पर्यवेक्षक मनीष बांगर, पर्यवेक्षक भगवान मुंडे, सुरेश कासार, निलोपर सय्यद उपस्थित होते. शिक्षण निरीक्षक संजय जावीर पुढे म्हणाले, स्वातंत्र्य लढ्यातील क्रांतिकारी, ऐतिहासिक हेरिटेज इमारत असलेल्या कार्यालयातून कामकाज करण्याचे भाग्य मिळाले. अनेक चांगल्या गोष्टी करता आल्या. शाळेचा पट वाढविल्याचे सांगितले. याप्रसंगी लिपिक महेश वालावलकर, सारंग अंजीखाने, रियाज आतार, सचिन जाधवर, जाकीर सय्यद, शिक्षक संघटनेचे अध्यक्ष नागेश गोसावी, सरचिटणीस अमोल भोसले, रतन साळवे, आशिकेष लोखंडे, भालचंद्र साखरे, नर्सिंग चिप्पा, नासिर खान, सचिन साखरे, सायली ढोले उपस्थित होते.



# अन्नछत्र मंडळात सीमोल्लंघन भक्तिभावात

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट,दि.१३ ऑक्टोबर-**

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ परिसरातील श्री तुळजाभवानी माता मंदिरात नवरात्र महोत्सवानिमित्त शनिवारी विजया दशमीनिमित्त सायंकाळी श्री तुळजाभवानी देवीची महापूजा व आरती मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या हस्ते करण्यात आली. याबरोबरच सीमोल्लंघन पार पडले.

दरम्यान न्यासाचे मुख्य पुरोहित अप्पू पुजारी, विश्वंभर पुजारी, संजय कुलकर्णी व सोमकांत कुलकर्णी यांच्या मंत्र पठणाने महापूजा संपन्न झाले. याप्रसंगी जाणता राजा युग प्रवर्तक छत्रपती शिवाजी महाराजांचा शिवराज्याभिषेक सोहळा प्रसंगाच देखावा पाहण्यासाठी गर्दी झाली होती. यावेळी न्यासाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जन्मेजयराजे भोसले, विश्वस्त संतोष भोसले, मनोज निकम, अरविंद शिंदे, सौरभ मोरे, रोहित खोबरे, अप्पा हंचाटे, गणेश भोसले, बाळासाहेब कुलकर्णी, अशापक काझी, पिंटू साठे, निखिल पाटील, अतिश पवार, प्रवीण घाडगे, गोटू माने, वैभव मोरे, बाळासाहेब पोळ, शहाजीबापू यादव, नामा भोसले, सतिश महिंद्रकर, रोहन शिर्के, पप्पू वाकडे, राजेंद्र काटकर, बाबुशा महिंद्रकर, राजू पवार, प्रसाद हुल्ले, कल्याणी देशमुख, श्रीनिवास गवंडी, स्वामींनाथ बाबर, योगेश पवार, लक्ष्मण बिराजदार, रमेश हेगडे, अनिल बिराजदार, शरद भोसले, विशाल कलबुर्गी, सुमित कल्याणी, तानाजी पाटील, राहुल इंडे, महांतेश स्वामी, चंद्रकांत हिबारे, मल्लिनाथ कोगनुरे, शावरेप्पा माणकोजी, शिवु स्वामी, विशाल घाटगे, धनंजय निंबाळकर, विठ्ठल रेड्डी उपस्थित होते.



# राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सघोष पथसंचलन

**• संघाचा शताब्दी वर्षात प्रवेश; १२ हजार स्वयंसेवकांचा सहभाग, सोसायट्या, वस्त्यांमधून संचलनांचे उत्साहात स्वागत**

**तभा वृत्तसेवा,**
**पुणे, दि.१३ ऑक्टोबर-**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा स्थापना दिन असलेल्या विजयादशमीच्या निमित्ताने शनिवारी (१२ ऑक्टोबर) रा.स्व. संघाच्या पुणे महानगर रचनेतील ५८ ठिकाणी सघोष संचलने काढण्यात आली. पुणे महानगरात नऊ भागातील विविध ५५ नगरांमध्ये काढण्यात आलेल्या संचलनांमध्ये एकूण बारा हजारांहून अधिक पूर्ण गणवेशातील स्वयंसेवकांनी सहभाग घेतला.

महानगरात सर्व उपनगर व वस्त्यांमध्ये (झोपडपट्टी) सर्व स्तरातील नागरिकांनी पथसंचलनाचे जोरदार स्वागत केले. विजयादशमीच्याच दिवशी नागपूरामध्ये मोहिते वाड्यात १९२५ मध्ये संघाची स्थापना झाली होती. यंदा संघ शताब्दी वर्षात प्रवेश करत असल्याने सघोष पथ संचलनांना एक वेगळे महत्त्व प्राप्त झाले होते. या वेळेच्या संचलनाचे वैशिष्ट्य सांगायचे तर शहरातील विविध वस्त्या (झोपडपट्टी) व छोट्या- मोठ्या सोसायट्यांमधून संचलन मार्गाचे प्रकारचे नियोजन करण्यात आले होते. तसेच विद्यापीठ नगराचा भाग असलेल्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात यंदा प्रथमच सघोष संचलन काढण्यात आले. त्यात विद्यार्थी स्वयंसेवक लक्षणीय संख्येने सहभागी झाले. दरम्यान काही ठिकाणी संचलनासमवेत शस्त्र पूजन उत्सवांचे आयोजन देखील करण्यात आले होते. विशेष म्हणजे हे संचलन वस्तीतून विविध मार्गस्थ होताना सर्व स्तरातील नागरिकांनी भव्य असे स्वागत केले. यावरून समाजात संघाविषयी स्वीकारार्हता वाढल्याचे दिसून येते आहे.

विजयादशमी निमित्ताने विविध नगरांमध्ये सकाळी ७.३० वाजता सघोष संचलनांचे आयोजन करण्यात आले होते. संचलनाच्या मार्गावरून नागरिकांनी आकर्षक रांगोळी आणि विविध फुलांच्या व पाकळ्यांच्या सड्यांनी भरून गेलेले दिसत होते. दरम्यान संचलनातील स्वयंसेवकांवर व भगव्या ध्वजावर पुष्पवृष्टी करून स्वागत करण्यात आले. विशेष म्हणजे विविध नगरांमध्ये सर्व विविध पक्षांच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी देखील संचलनाचे स्वागत केले. तर पुणे महानगराच्या विविध नगरांमध्ये प्रतिष्ठित व मान्यवर नागरिकांनी प्रमुख पाहुणे यावेळी उपस्थित राहून संचलनाची पाहणी केली.

प्रथेप्रमाणे सकाळी रा.स्व. संघाच्या वैशिष्ट्यपूर्ण घोषातर्फे शिवाजीनगर भागातील एसएसपीएमएस संस्थेच्या प्रांगणातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला सघोष मानवंदना देण्यात आली. यावेळी व केंद्रीय हवाई वाहतूक व सहकार विभागाचे राज्यमंत्री खासदार मुरलीधर मोहोळ, खासदार मेधा कुलकर्णी, पुणे महानगर संघचालक रवींद्र वंजारवाडकर व कसबा भागाचे संघचालक ॲड. प्रशांत यादव यांनी शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. त्याआधी पुणे महानगर संघचालक श्री. वंजारवाडकर व कसबा भागाचे संघचालक प्रशांत यादव यांच्या हस्ते मोतीबाग कार्यालयात शंख व भगव्या ध्वजाचे पूजन व ध्वजारोहण करण्यात आले. याप्रसंगी संघाचे पुणे महानगर कार्यवाह सचिन भोसले आदी मान्यवरांची उपस्थिती होती. संघ कामात अधिकाधिक लोकांचा सहभाग वाढताना दिसतो आहे. अनेक तरूणांनी संघ कार्यात सहभाग वाढवित व संचलनात संपूर्ण गणवेशात सहभागी झालेले दिसून आले. तरूणांसोबत अनेक स्वयंसेवक देखील गणवेशासह संचलनात सहभाग नोंदविला.



**शस्त्र पूजन उत्सवात तरूणांचा सहभाग अधिक**

विजयादशमीपूर्वी पुणे शहरामधे एकूण ३७ ठिकाणी तरूण विभागाचे शस्त्रपूजन उत्सव झाले तसेच ४० ठिकाणी बाल विभागाचे शस्त्रपूजन उत्सव झाले. या उत्सवांना देखील ७००० पेक्षा अधिक तरूण आणि ३००० पेक्षा अधिक बाल उपस्थित होते.

**मध्य रेल्वे**

**सोलापूर विभाग**
**ई-निविदा सूचना**

वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता, जनरल, मध्य रेल्वे, सोलापूर, भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने आणि त्यांच्या वतीने Rallways e-procurement वेबसाइट www.Ireps.gov.in वर प्रतिष्ठित, अनुभवी आणि परवानाधारक इलेक्ट्रिकल कंत्राटदारांकडून ऑनलाइन ई-निविदा मागवतात. खालील कामे. निविदा क्रमांक SUR/L/T/2024/15R. कामाचे नाव :- प्रोच रोड, प्लॅटफॉर्म रुंदीकरण (400m x 5.5m), परिभ्रमण क्षेत्राचा विकास (250m x 10m), HL प्लॅटफॉर्म, गोडाऊनचे बांधकाम, हमाल रूम, CGS ऑफिस रूमच्या तरतुदीसंदर्भात कामाचा इलेक्ट्रिकल सामान्य भाग, एसएम रूम, रिले रूम, आयपीएस रूम, गुड्स पीएफसाठी शेड, लातूर येथे पिट लाइन. (पुन्हा आमंत्रण) अंदाजे किंमत: 92,50,212.67/- इश्रव सुरक्षा :- 1,85,000/- पूर्ण कालावधी :- ऑफरची 18 महिने वैधता :- 60 दिवस निविदा क्रमांक SUR/L/T/2024/22R. कामाचे नाव :- केंद्रीकृत वातानुकूलन आणि रूफटॉप सोलर सिस्टीमच्या तरतुदीच्या संबंधात कामाचा विद्युतीय सामान्य सेवा भाग नवीन इंजिन. सोलापूर रेल्वे स्थानकावर कार्यालय आणि DETC इमारत. (पुन्हा आमंत्रण) अंदाजे खर्च :- 1,48,00,716.68/- BldSecurity :- रु. 2,24,000.00/- पूर्ण होण्याचा कालावधी :- ऑफरची 6 महिन्यांची वैधता:- वेबसाइटवर निविदा बंद होण्याची 60 दिवसांची तारीख आणि वेळ:- 05/11/2024 15.00 वाजता. बिड सुरक्षा खर्च www.Ireps.gov.In वेबसाइटवर ई-पेमेंटद्वारे भरला जाईल.

DRM(C), सोलापूर 33 | 33

रेल्वे फाटक को बंद स्थिति में पार करना मना है

**राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर**

विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागाकरिता Flat Interactive Display Panel व विद्यापीठाचे मुद्रण व प्रकाशन विभागाकरिता कागद खरेदी व दर करार करण्याकरिता वार्षिक दर करार (Rate Contract) तसेच 1 GBPS Internet Lease Line (Uncompresesed and unshared on optical fiber for an uncompressed and unshared connectivity at all time (24x7x365) Provider) स्थापित करण्यास्तव प्रस्ताव सादर करण्यासंबंधी ई-निविदा सूचनापत्र

निविदा सूचना क्र. रातुमनावि/भांडार/२०२४/३५७ — दिनांक : १३/१०/२०२४

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागाकरिता Flat Interactive Display Panel व विद्यापीठाचे मुद्रण व प्रकाशन विभागाकरिता कागद खरेदी व दर करार करण्याकरिता नामांकित उत्पादक कंपनी व अधिकृत डिलरकडून ई-निविदा मागविण्यात येत आहेत. ई-निविदा प्रपत्र/अर्ज व सविस्तर माहिती महाराष्ट्र शासनाचे अधिकृत संकेतस्थळ www.mahatenders.gov.in येथे उपलब्ध आहे. ई-निविदा सादर करण्याची शेवटची तारीख २८/१०/२०२४ वेळ सायंकाळी ५.०० पर्यंत व उघडण्याची तारीख २९/१०/२०२४ वेळ दुपारी ०५.०० वाजता राहील. तसेच 1 GBPS Internet Lease Line (Uncompresesed and unshared on optical fiber for an uncompressed and unshared connectivity at all time (24x7x365) Provider) ई-निविदा सादर करण्याची शेवटची तारीख ०३/११/२०२४ वेळ सायंकाळी ५.०० पर्यंत व उघडण्याची तारीख ०७/११/२०२४ वेळ दुपारी ३.०० वाजता राहील. ई-निविदा वित्त व लेखा विभाग, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, जमनालाल बजाज प्रशासकीय भवण, महात्मा ज्योतिबा फुले शैक्षणिक परिसर, नॉर्थ अंबाझरी रोड, नागपूर येथे उघडण्यात येतील.


क्र.ज.का.२४/५१ दि.१३/१०/२०२४ — (श्री. हरीश पालीवाल) वित्त व लेखा अधिकारी

**खरेदी पूर्व जाहीर नोटीस**

तमाम लोकांना विशेषतः बार्शी शहर व तालुक्यातील लोकांना या जाहीर नोटीसिने कळविण्यात येते की, डि. सोलापूर सब डि. तालुका बार्शी पैकी शहर बार्शी तालुका बार्शी येथील नगर परिषद हद्दीतील मूल्यांकन विभाग क्रमांक ३८ मधील मिळकत तपशील नवीन गट नंबर ९४१/२ बिनशेती यातील प्लॉट नंबर २२ याचे क्षेत्रफळ १५० चौरस मीटर यासी चतु:सीमा पूर्वेस प्लॉट नंबर २३, दक्षिणेस - नऊ मीटर रुंदीचा रस्ता, पश्चिमेस प्लॉट नंबर २१ व उत्तरेस सदर गटापैकी क्षेत्र आहे.

वर उल्लेख केलेला प्लॉट श्रीमती लतिका गुंडू अडसुळे, रा. अरणगाव ता. परंडा, जि. धाराशिव यांचे मालकी वहिवाटीचा तसेच स्वकष्टार्जित मिळकतीतून घेतलेला असल्याची हमी त्यांनी आमचे पक्षकारास दिलेली असून सदरचा प्लॉट आमचे पक्षकारास विक्री करण्याचे ठरविलेले आहे व विसार घेतलेला आहे. सदर मिळकतीबाबत कुणाचा कसलाही हक्क हितसंबंध असल्यास कागदपत्रासह ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ४ दिवसांच्या आत प्रत्यक्ष भेटून खात्री करून द्यावी. अन्यथा कुणाची कसली तक्रार नाही असे समजून आमचे पक्षकार सदर प्लॉटचे खरेदीखत करून घेतील. मग त्यानंतर कुणाचा कसलाही हक्क हितसंबंध किंवा तक्रार चालणार नाही. याची नोंद घ्यावी. ही खरेदी पूर्व जाहीर नोटीस दिली. ता. १३/१०/२०२४

आमच्या पक्षकारातर्फे ॲडव्होकेटस्
सही/-
ॲड. शिवाजी जगन्नाथ क्षीरसागर
बी.कॉम., एल.एल.एम. (फर्स्ट इन रँक)
सि.स.नं.६८४, हांडे गल्ली, बार्शी
मो.नं. ९८२२०५७०८२


ज्याला वाटे उद्धार व्हावा
त्याने बाळूमामा गुरु करावा..
बाळू
मामांच्या
नावानं
चांगभलं !
श्री संत
बाळूमामा
यांच्या जयंतीनिमित्त
साष्टांग दंडवत!
भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र

## दक्षिणच्या १४ गावांवरील निर्बंध उठवा : पूजा पाटील

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ ऑक्टोबर-**

अक्कलकोट विधानसभा निवडणुकीसाठी इच्छुक असलेल्या महिला उमेदवार पूजा राहुल पाटील यांच्याकडून आज जिल्हाधिकारी कार्यालय येथे अक्कलकोट विधानसभा मतदारसंघातील चौदा गावांना एकरुख उपसा सिंचन योजनेंतर्गत पाणी वापरण्यास असलेले निर्बंध काढून, पाणी वापरण्यास परवानगी देण्यासंबंधीचे निवेदन देण्यात आले. निवेदन तहसीलदार दिनेश पारगे यांनी स्वीकारले.

यावेळी पूजा पाटील यांच्यासमवेत संबंधित गावातील गावकरी उपस्थित होते. उळे, कासेगाव, गंगेवाडी, उळेवाडी, वडजी, बक्षीहिपपरगा, वरळेगांव, मुळेगाव तांडा, मुस्ती, तांदुळवाडी, धोत्री, दोड्डी, संगदरी, बोरामणी या गावांवरील निर्बंध उठविण्याची मागणी त्यांनी केली आहे.




दसरा, दिवाळी निमित्त
20% पर्यंत सूट
यल्लम्मा हॅण्डलूम
विविध कॉटन साड्या व ड्रेस मटेरियलचे एकमेव परिपूर्ण दालन
शाखा नं. १ : मार्कंडेय सहकारी रुग्णालय रोड, सोलापूर. मो. 9371289887
शाखा नं. २ : अंत्रोळीकर शॉपिंग सेंटर, दत्त चौक, सोलापूर. मो. 9372351860


## अकलूज येथे डिसेंबरमध्ये रयतेचा राजा शिवछत्रपती महानाट्य

### अडीच हजार स्थानिक कलाकारांना संधी

**तभा वृत्तसेवा । चंद्रकांत कुंभार**
**अकलूज, दि. १३ ऑक्टोबर-**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३५० व्या शिवराज्याभिषेक सोहळ्याचे औचित्य साधून महाराजांच्या जीवनातील महत्त्वांच्या ११ प्रसंगावर आधारित असे महानाट्य अकलूज येथे पुन्हा साकारत आहे. रयतेचा राजा: राजा शिवछत्रपती' या शीर्षकाखाली बसवण्यात आलेल्या या महानाट्यात २ हजार ५०० कलाकारांचा सहभाग असणार असून २ व ३ डिसेंबर रोजी अकलूजच्या विजयसिंह मोहिते-पाटील क्रीडा संकुलावर या महानाट्याचे प्रयोग होणार असल्याची माहिती शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते-पाटील व प्रताप क्रीडा मंडळाच्या अध्यक्षा स्वरूपाराणी मोहिते-पाटील यांनी दिली.



भव्यदिव्य कार्यक्रम आयोजित करण्याचा हातखंडा असलेले कलाप्रेमी जयसिंह मोहिते-पाटील यांच्या संकल्पनेतून, शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते-पाटील व प्रताप क्रीडा मंडळाच्या अध्यक्षा स्वरूपाराणी मोहिते-पाटील यांच्या नेतृत्वाखाली या महानाट्याची निर्मिती करण्यात आली आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३५० व्या शिवराज्याभिषेक सोहळ्याचे औचित्य साधून हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. २ व ३ डिसेंबर रोजी अकलूज येथील विजयसिंह मोहिते-पाटील क्रीडा संकुलवर या महानाट्याचे दोन प्रयोग होणार असून प्रत्येक प्रयोगात सुमारे पन्नास हजारांपेक्षा जास्त प्रेक्षक उपस्थित राहतील असा अंदाज मोहिते-पाटील यांनी व्यक्त केला. या पत्रकार परिषदेस जयंती समारंभ समितीचे संस्थापक जयसिंह मोहिते-पाटील, दीपक खराडे-पाटील, सचिव अभिजीत रणवरे, सहसचिव हर्षवर्धन खराडे, डॉ. विश्वनाथ आवड आदी उपस्थित होते.



### दादा, पप्पांनी साकारल्या होत्या भूमिका

२०१८ मध्ये साकारण्यात आलेल्या भव्य-दिव्य अशा महानाट्यामध्ये २००० कलाकारांनी सहभाग घेतला होता. यावर्षी सुमारे २ हजार ५०० कलाकारांचा समावेश या महानाट्यामध्ये करण्यात आला आहे. सहकार महर्षि शंकरराव मोहिते-पाटील हे शिवप्रेमी होते. त्यांनी १९७५-७६ मध्ये शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांचे सलग २ वर्षे सलग महिनाभर शिवचरित्रांच्या व्याख्यानाचे आयोजन केले होते. शिवराज्याभिषेक दिनी विजयसिंह मोहिते-पाटील यांनी शिवाजी महाराज तर प्रतापसिंह मोहिते-पाटील यांनी संभाजी महाराजांची भूमिका साकारली होती.

### छत्रपती शिवरायांच्या इतिहासाची साक्ष

शिवपार्वती मंदिरासमोरील शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळ्याची निर्मितीही सहकार महर्षिंनी केली होती. शिवचरित्र रूजविण्याचा प्रयत्न सहकार महर्षिंनी केला. जयसिंह मोहिते-पाटील हे सरपंच असताना भुईकोट किल्ल्याचा जिर्णोद्धार करण्यात आला. त्यानंतर विजयदादा पर्यटनमंत्री असताना दादांनी शिल्पसृष्टीची निर्मिती केली. जाणता राजा, शिवराज्याभिषेक सोहळा, रयतेचा राजा : राजा शिवछत्रपती, गड आला, पण सिंह गेला, स्वातंत्र्यदिन, प्रजासत्ताकदिन या व अशा विविध कार्यक्रमांचे यशस्वी आयोजन जयसिंह मोहिते-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली केले आहे. यंदा ३५० वा शिवराज्याभिषेक सोहळ्याचे वर्ष असून सर्वात मोठा हा सोहळा असणार आहे.

## ई-केवायसी न केल्यास धान्य होणार बंद!

### मयत अन् स्थलांतरित 'युनिट' बंद करण्यासाठी मोहीम


### शहर आणि जिल्ह्यातील रेशन दुकानातून ई-केवायसी सुरू

**तभा वृत्तसेवा । अविनाश गायकवाड**
**सोलापूर, दि. १३ ऑक्टोबर-**

गेल्या १२ वर्षांपासून तेच ते युनिट दुकानदारांकडे आहेत; यातील मयत आणि स्थलांतरीय युनिट कमी झाले नसल्याने आलेला कोटा मोठ्या प्रमाणात शिल्लक राहत आहे. यामुळे शहर आणि जिल्ह्यातील सर्वच राशन दुकानातून ईकेवायसी सुरू करण्यात आली आहे. यामुळे येत्या ऑक्टोंबर अखेर सर्व युनिटधारकांनी स्वत: दुकानातून जावून आपली ई-केवायसी करावी; अन्यथा आपल्याला स्वस्त धान्य दुकानातून येणारा धान्य मिळणार नाही, असा इशारा जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे यांनी दिला आहे.

सोलापूर ग्रामीणसाठी १ हजार ५५६ रास्त भाव धान्य दुकानातील १८ लाख १८ हजार ९८५ इतक्या ग्राहकांचे ईकेवायसी करायची आहे. यापैकी ५ लाख ७० हजार ४१२ ग्राहकांची ईकेवायसी झाली असून, तर १२ लाख ४८ हजार ५७३ जणांची करायची आहे. सध्या जिल्ह्यातील ११ तहसीलदारांकडे ४ लाख ५६ हजार ०८८ इतके ग्राहक मंजुरीविना प्रलंबित आहेत. तर सोलापूर शहरातील ३१४ दुकानातून ही ई-केवायसी सुरू केली आहे. शहरात सध्या ६ हजार १५४ कार्डधारक आहेत. या कार्डवरील प्रत्येक युनीटची ई-केवायसी करणे आवश्यक आहे. शहर-जिल्ह्यातील सर्व दुकानदारांनीही हे काम युध्द पातळीवर करावे.





### जनजागृती करा

जिल्ह्यातील प्रत्येक गावात दवंड देवून सर्व ग्राहकांना केवायसी करून घेण्याबाबत आवाहन करावे. राशन दुकानात येवून मयत, स्थलांतरीत किंवा विवाह होवून गेलेल्या मुलींची नावे सर्वांनी कमी करून घ्यावीत. दुकानदारांचा संपर्क नाही झाला तरी आपल्या तहसील कार्यालयात जावून वरील नावे कार्डवरून कमी करून घ्यावीत.

**- संतोष सरडे,**
**जिल्हा पुरवठा अधिकारी**

### धान्याचा येणार एसएमएस

सध्या स्वस्त धान्य दुकानदारांनी अंगठा घेवून दिलेला माल किती आहे? हे अनेक अशिक्षित, अल्पशिक्षित नागरिकांना समजत नाही. इतकेच कायतर एका युनीटला किती धान्यअसतो, याबाबत ग्रामीण भागातील बहुतांश नागरिकांनाही माहिती नसते; फुकट धान्य मिळत आहे ना; घ्या अंगठा लावून. असा विषय चालू आहे. यामुळे रेशन दुकानातही आता पॉस मशीनला मोबाईल लिंकिंग प्रक्रिया लवकरच चालू होणार आहे. यानंतर शहर-जिल्ह्यातील सर्व ग्राहकांना आपल्या मोबाईलवर किती माल मिळाला याबाबत एसएमएस येवून अधिकृत माहिती मिळणार आहे.

### दिवाळीपूर्वी धान्य दुकानदारांचे कमिशन निघणार

जिल्ह्यातील सर्व दुकानदारांना इतर क्षेत्रातील नागरिकांप्रमाणे दिवाळी सणाचा आनंद लुटता यावा यासाठी त्यांचे ३ महिन्याचे थकीत कमिशन आता लवकरच देण्यात येणार आहे. यासाठी जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांकडे सोलापूर शहर-जिल्हा रास्त भाव दुकानदार संघाच्या वतीने एक निवेदन दिले आणि तातडीची बैठकही झाली. यामुळे दुकानदारांनी कमिशन बाबत निश्चिंत राहून ईकेवायसीचे काम हाती घ्यावे.

**- सुनील पेंटर, अध्यक्ष, सोलापूर शहर-जिल्हा रास्त भाव दुकानदार संघ**

### लहान मुले अन् वृद्धांची ई-केवायसी होत नसल्याची तक्रारी

ईकेवायसी करताना लहान मुले आणि विशेषत: वृध्द नागरिकांचे हाताचे ठसे नीटपणे उमटत नसल्याने ईकेवायसी करताना अडचणी निर्माण होत आहेत. दरम्यान, जर अशी अडचण येत असेल तर राशन दुकानदारांनी लहान मुले आणि वृध्द नागरिकांची ईकेवायसी सोडून इतर युनिटची गतीने ई-केवायसी करावी, असे आवाहन सरडे यांनी केले आहे.

### दिवाळी सणात 'आनंदाचा शिधा' मिळणार का?

दिवाळी सणासाठी देण्यात येणारा आनंदाचा शिधा यंदा विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागल्यावर मिळणार की नाही? याबाबत साशंक वातावरण आहे. यामुळे गोरगरिबांचा दिवाळीसण यंदा गोड होतो की नाही? असा सवाल सर्वसामान्य नागरिकांतून उठत आहे.

### म्हशी आडव्या आल्याने मालट्रकची कारला धडक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ ऑक्टोबर-**

म्हशी आडव्या आल्याने मालट्रक चालकाने कारला धडक देऊन ८० हजारांचे नुकसान केल्याप्रकरणी एकाविरुद्ध फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हि घटना ११ ऑक्टोंबर दरम्यान ३.५० वाजण्याच्या सुमारास जुना पुणे नाका येथे घडली.याप्रकरणी राकेश रामकृष्ण माकोडे (वय-४४, रा. समता कॉलनी, पीडब्ल्यूडी ऑफिस शेजारी, धाराशिव) यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून गोपाळ नागप्पा क्यासे (वय-५७, रा. कवडयाळ, ता.बसवकल्याण, जिल्हा बिदर) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. फिर्यादी हे गांधी शोरूम पुणे रोड येथून धाराशिवला जात असताना अचानक फिर्यादी यांच्या कारच्या समोर म्हशी आल्याने फिर्यादी यांनी ब्रेक लावून त्यांची कार थांबवली. मालट्रक क्रमांक केए. ५६.२५०४ यातील ट्रकचालकाने त्याच्या ताब्यातील ट्रक निष्काळजीपणाने चालून कारला धडक दिल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. पुढील तपास पोलीस हवालदार घुगे हे करीत आहेत.



## विधानसभेला पक्ष सांगेल त्या उमेदवारास निवडून आणणार

### भाजपाच्या मेळाव्यात कार्यकर्त्यांनी दिला विश्वास

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ ऑक्टोबर-**

आगामी विधानसभा निवडणुकीत कोणालाही तिकीट मिळो, शहरातील तीनही मतदारसंघात पक्ष सांगेल त्या उमेदवारास निवडून आणण्यासाठी आम्ही प्रयत्न करणार असा निर्धार भारतीय जनता पार्टीच्या ज्येष्ठ कार्यकर्त्यांनी व्यक्त केला. रविवारी श्रीकृष्ण मंगल कार्यालयात भाजपच्या ज्येष्ठ कार्यकर्त्यांचा मेळावा उत्साहात झाला.

यावेळी व्यासपीठावर माजी पालकमंत्री आ. विजयकुमार देशमुख, भाजपाचे शहर अध्यक्ष नरेंद्र काळे, माजी महापौर किशोर देशपांडे, माजी आमदार नरसिंग मेंगजी, सरचिटणीस रोहिणी तळवळकर, पांडुरंग दिड्डी, माजी शहराध्यक्ष रामचंद्र जन्नू, राम तडवळकर उपस्थित होते. या मेळाव्याचा समारोप माजी महापौर किशोर देशपांडे यांनी केला. किशोर देशपांडे म्हणाले, भारतीय जनता पार्टीच्या जेष्ठ कार्यकर्त्यांना पक्षाचे कार्य पूर्वीप्रमाणे त्याच जोमाने करायचे आहे. उमेदवारांची घोषणा झाली की पक्षाचे जेष्ठ कार्यकर्ते प्रचार सुरु करतील. पक्षाचे ज्येष्ठ कार्यकर्ते हे शिस्तीचे आणि पक्षनिष्ठ आहेत. पक्षात जेष्ठ कार्यकर्त्यांना सन्मानाची वागणूक मिळते, असेही माजी महापौर किशोर देशपांडे यावेळी म्हणाले. तत्पूर्वी अध्यक्षीय मनोगत शहराध्यक्ष नरेंद्र काळे यांनी मांडले. भाजपाच्या सरचिटणीस रोहिणी तडवळकर यांनी सूत्रसंचालन आणि प्रास्ताविक तर आभार पांडुरंग दिड्डी यांनी मानले.






---

▶▶ संक्षिप्त वृत्त...

### लग्नात मानपान केला नाही म्हणून विवाहितेचा छळ

**सोलापूर, दि. १३ ऑक्टोबर-**

सासरकडच्या मंडळींनी संगणमत करून विवाहितेला तुझ्या आई-वडिलांनी आम्हाला लग्नात काही मान केला नाही, तु पतीस घटस्फोट दे व आम्हास मोकळे कर, तू येथून निघून जा, जर तू नांदण्यास आली तर आम्ही तुला त्रास देऊन नांदवणार नाही असे म्हणून शारीरिक व मानसिक त्रास दिला. तसेच पतीने हाताने व लाथा बुक्क्यांनी मारहाण केली. अशा आशयाची फिर्याद कविता संजीवकुमार पवार (वय-२३, रा. हनुमान मंदिर जवळ दंडोती, ता. चितापूर, जि. कलबुर्गी) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात दिली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून पती संजीवकुमार भारत पवार, सासू रमिता भारत पवार,सासरे भारत अर्जुन पवार, दीर राजकुमार भारत पवार, जाऊ अनुषा राजकुमार पवार (रा. सर्व. हनुमान मंदिर जवळ दंडोती तालुका चितापूर जिल्हा कलबुर्गी) व नणंद इंदिरा अनिल सुर्यवंशी (रा. हैदराबाद) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. ही घटना १२ मे २०१९ ते २७ सप्टेंबर २०२४ दरम्यान फिर्यादी यांच्या सासरी घडली. या घटनेचा पुढील तपास पोलीस हवालदार गायकवाड हे करीत आहेत.

### पत्नीच्या गळ्यातील मंगळसूत्र घेऊन जिवे मारण्याची धमकी

**सोलापूर, दि. १३ ऑक्टोबर**

खर्चासाठी पैसे नसल्याने पत्नीच्या गळ्यातील मंगळसूत्र व वडिलांच्या खिशातील रोख रक्कम बळजबरीने काढून मारहाण करून तुम्ही पोलिसात तक्रार दिला तर तुम्हाला खल्लास करून टाकतो अशी जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी वडिल मारुती यंकप्पा श्रीराम (वय-४८,रा.मौलाली चौक,कोंची कोरवे नगर) यांनी मुलगा सचिन मारूती श्रीराम याच्याविरूध्द सदर बझार पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.ही घटना १२ ऑक्टोंबर रोजी सायंकाळी साडेपाच वाजण्याच्या दरम्यान मौलाली चौक येथे घडली.या घटनेचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक काटे हे करीत आहेत.

### बसमध्ये चढताना अज्ञात चोरट्याने पळवला मोबाईल

**सोलापूर, दि. १३ ऑक्टोबर-**

रेल्वे स्टेशन येथील महात्मा गांधी पुतळ्या सर्कल समोर गाणगापूर बसमध्ये चढत असताना अज्ञात चोरट्याने गर्दीचा फायदा घेऊन फिर्यादी सुनील रमेश पवार (वय-४१,रा.इंद्रायणी नगर,भोसरी,पुणे) यांच्या खिशातील १४ हजार रुपये किमतीचा मोबाईल चोरून नेला आहे. ही घटना १५ सप्टेंबर रोजी दुपारी दोन वाजण्याच्या सुमारास घडली.याप्रकरणी सुनील पवार यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून,त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास पोलीस हवालदार चव्हाण हे करीत आहेत.

### शिवाजी शिंदे यांची उपविभागीय कृषी अधिकारीपदी नियुक्ती

**सांगोला,दि.१३ ऑक्टोबर-**

सांगोला तालुक्यात चार वर्ष तालुका कृषी अधिकारी म्हणून कामकाज केलेल्या शिवाजी शिंदे यांची उपविभागीय कृषी अधिकारी म्हणून चिपळूण येथे नियुक्ती झाली आहे. ते २ सप्टेंबर २०२१ रोजी तालुका कृषि आधिकारी सांगोला येथे रूजू झाले होते. सांगोला तालुक्यात चार वर्ष उत्तम प्रकारची सेवा देत शेतकऱ्यांच्या बांधापर्यंत पोहचत खरीप अन् रब्बी हंगामातील



सुयोग्य नियोजन, फळबाग लागवड,कृषी विभागाच्या विविध योजना, पी. एम. किसान योजना, दुष्काळी व अतिवृष्टीचा पंचनामे आधीसह दणकेबाज कामगिरी केली. तालुक्यात विविध खते व बी बियाणे दुकानावर ही त्यांची करडी नजर होती. त्यामुळे कोठे ही काळाबाजार पहावयास मिळाला नाही. त्यामुळे शेतकरी बांधवांना याचा चांगला फायदा झाला. शिवाजी शिंदे यांनी तालुक्यात उत्तम दर्जाची सेवा देत शेतकऱ्यांचे साहेब अशीच ओळख निर्माण केली.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## ज्ञानामृत आनंदलहरी - ९१४

**स्वधर्मु जो बापा । तोचि नित्य यज्ञु जाण पां ।**
**म्हणोनि वर्ततां तेथ पापा । संचारु नाहीं ॥**

अर्जुन अगोदरच युध्द करण्याच्या मनस्थितीत नाही. त्यात पुन्हा श्रीकृष्णांनी आत्मज्ञान, स्थिर बुध्दी, स्थितप्रज्ञता इत्यादी गहण विषय सांगीतले. या सर्वाचा सार अर्जुनाने आपण कर्म करण्याची गरजच नाही असा घेतला. अर्थात, आपल्याला युध्द करण्याची गरजच नाही या विचाराला श्रीकृष्णाच्या विचाराची पुष्टी आहे असे अर्जुनाला वाटले. पण श्रीकृष्ण, अर्जुनाने स्थितप्रज्ञ होऊन युध्द, कर्म करावे असे म्हणू लागले. तेव्हा मात्र अर्जुन द्विधा अवस्थेत सापडला. त्याला द्विधा अवस्थतेतून बाहेर काढण्यासाठी परमात्म्याने ज्ञानयोग व कर्मयोग सविस्तर समजावून सांगीतला. प्रत्येकाला कांही कर्म ही करावीच लागतात. शास्त्रविहीत कर्माचा त्याग करेन म्हटले तर चालणार नाही, असेही भगवंत म्हणाले. स्वधर्माचे पालन करणे किती महत्वाचे आहे, हे पण भगवतांनी सांगीतले. ते म्हणाले, स्वधर्माचे (स्व- स्वभाव, धर्म- नितीनियमाला अनुकुल असे वर्तन ) पालन करण्यालाच नित्ययज्ञ म्हणतात. हे नित्ययज्ञ करण्याने पापाचा प्रवेश होत नाही. स्वधर्माचा जेव्हा त्याग केला जातो, तेव्हा परधर्माची प्रीती, आवड वाटू लाग-ते. तेव्हा मात्र वाईट, चुकीच्या पध्दतीची कर्मे करणा-या पुरुषाला संसारबंधन पडते.



**स्वधर्मु जो बापा । तोचि नित्य यज्ञु जाण पां । म्हणोनि वर्ततां तेथ पापा । संचारु नाहीं ॥** असे भगवान म्हणाले.

स्वधर्माचे जो पालन करतो, स्वधर्माप्रमाणे जो वागतो त्याला संसार बंधन पडत नाही. स्वधर्माचे पालन म्हणजेच नित्ययज्ञ होय हा अतिशय मोठा व महत्वाचा विचार येथे भगवंतानी सांगीतला आहे. आपण मनुष्यप्राणी प्रकृतीच्या आधीन आहोत. त्यामुळे आपल्याकडून कर्माचा त्याग घडूच शकत नाही. आम्ही कर्मच करणार नाही किंवा नित्य यज्ञच करणार नाही असे आपणाला म्हणता येणार नाही. अर्थात, अर्जुनाच्या वाटयाला अन्यायाविरुध्द लढण्याचे कर्म आले आहे, त्याने ते पार पाडलेच पाहिजे. आपल्या मुलांचे संगोपन करणे, त्यांना लह-ानाचे मोठे करणे, त्यांना शिकविणे, सज्ञान बनविणे, हे आपले कर्तव्य आहे. त्याचबरोबर मुलांनी आई-वडीलांच्या आज्ञेचे पालन करणे, आई वडीलांची सेवा करणे हे मुलांचे कर्तव्य आहे. भारत देशाचे नागरिक म्हणून भारत मातेवर प्रेम करणे, भारतीय संस्कृतीचे जतन करणे, नागरीकांवर, समजावर प्रेम करणे, भूतमात्रांवर दया करणे, आपसांत प्रेम, आपुलकी वाढेल असे वर्तन ठेवणे ईत्यादी सर्व आपले कर्तव्य आहे. या कर्तव्यापासून आपणाला पलायन करता येणार नाही. केवळ संन्यास घेतला म्हणजे कर्मातून मुक्ती झाली असे होत नाही. कारण संन्याशाला सुध्दा कांही विहीतकर्म करावीच लागतात. संसारात असून सुध्दा संसार बंधनात अडकू नये, असे वर्तन असावे. संसारात तर पावलो-पावली मोह, स्वार्थ, द्वेष, मत्सर, दडलेला आहे. कर्मयोग जर लक्षात आला असेल तर मोह, दु:ख, चिंता, स्वार्थ हे अजातशत्रू आपले कांहीच बिघडू शकत नाहीत. संसारी माणसाला मोक्ष प्राप्ती पर्यन्त नेऊन पोहचविण्यासाठी संत वचनांवरिल हे सदर, हे लिखाण निश्चितच मदतीला येईल. म्हणून आपण या संत वचनांच्या सहवासात राहू या. सतत आपली पडताळणी या वचनांतील अर्थ व सदंर्भा सोबत करीत राहू या. आपली आपण चाचपणी करीत राहणे म्हणजे चुका टाळणे, योग्य मार्गावर मार्गक्रमण करणे होय. यातून आनंदात वाढ होते हे निश्चित आहे. आपले सर्वांचे जीवन आनंदासाठीच असल्याने आपण आपली चाचपणी करीत राहायला हवी.

**जय जय राम कृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

**वार : सोमवार**
**दि. १४ ऑक्टोबर २०२४**
**विक्रम संवत् २०८०,**
**शके - १९४६**
**संवत्सर - क्रोधी नाम**
**मास - अश्विन**
**शु. एकादशी (०६.४१)**
**ऋतु - वसंत**
**नक्षत्र - शततारका (२४.४२)**
**योग - गंड (१८.००)**
**करण - बव (१७.१५)**

**दिनविशेष -भागवत एकादशी**
**संत बाळूमामा जन्मोत्सव**

**....राहू काल....**
**रविवार : दु.४.३० ते ६.००**
**सोमवार : स. ७.३० ते ९.००**
**मंगळवार : दु. ३ ते ४.३०**
**बुधवार : दु. १२ ते १.३०**
**गुरुवार : दु. १.३० ते ३.००**
**शुक्रवार : स.१०.३० ते १२**
**शनिवार : स. ९ ते १०.३०**

### राशीभविष्य

**मेष** : व्यापारीक वाद, मतभेद होण्याची शक्यता, जबाबदारीचे काम सांभाळून करा, आर्थिक योग मध्यम, कौटुंबिक जीवन सुखी राहील.

**वृषभ** : राजकीय व्यक्तींपासून फायदा होईल. वहान चालविताना सावधानीने चालवा. नवीन योजनांची सुरूवात कराल.म ुलांची काळजी घ्यावी.

**मिथुन**: आरोग्याची काळजी घ्या. रोजगारात यश व फायदा मिळण्याची शक्यता. वाचनाची गोडी वाढेल.

**कर्क**: अनावश्यक चिंतापासून दूर रहा. देणे - घेणे पासून सावधानता बाळगा. लोभ - लालचे पासून दूर रहा. धंदा मध्यम राहील.

**सिंह** : विद्यार्थ्यांना आपल्या प्रगतीत वाढ होईल. प्रतिस्पर्धाम ुळे लाभ होण्याची शक्यता.

**कन्या** : व्यापारासाठी प्रवास होण्याचा योग आहे. कामकाजात गुप्तता बाळगा. जीवनात यशस्वी व्हाल.

**तुळ** : आर्थिक योग चांगला. नोकरीमध्ये उत्साह वाढेल. प्रवास जपून करा. वाचनाची आवड लागेल. जिवनात यशस्वी व्हाल.
आनंदाने संकटावर मात कराल.

**वृश्चिक** : कामकाजाचा विस्तार होईल. अनावश्यक कामासाठी वेळ वाया घालू नका. प्रयत्न केल्यास थांबलेला पैसा निघून येईल.

**धनु** : व्यावसायिक चिंता राहील. मुलांच्या व्यवहारामुळे दु:खी व्हाल. सहयोगी मदत करणार नाहीत. खर्च कमी करण्याचा प्रयत्न करा.

**मकर** : सामाजिक किंवा राजकीय प्रसिद्धी मिळेल. व्यापार चांगला चालेल. घरासंबंधी सम स्या दूर होतील.

**कुंभ** : मागे केलेल्या कामाचे फळ मिळेल. धंद्यात स्वत: निर्णय घेतल्यास निश्चित फायदा. दुसऱ्यांवर विश्वास ठेवू नका.

**मीन**: बुद्धी व तर्काने कार्यामध्ये सफलता मिळण्याचे योग आहेत. व्यापारात नवीन योजनेमुळे लाभ होईल.

# महात्मा बसवेश्वरांचे स्मारक कधी होणार?

## लिंगायत संघर्ष यात्रेचे संयोजक अ‍ॅड. ताकबीडकर यांचा सवाल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ ऑक्टोबर-**

मंगळवेढा येथे महात्मा बसवेश्वर महाराज यांचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक उभारण्यात यावे ही मागणी प्रलंबित आहे. दहा वर्षांपूर्वी निधीची घोषणा करण्यात आली मात्र स्मारकाच्या नावाने एक वीटही उभारली नाही. हे स्मारक कधी उभारणार असा सवाल लिंगायत संघर्ष यात्रा संयोजन समितीचे प्रमुख अ‍ॅड. नीळकंठ ताकबीडकर यांनी पत्रकार परिषदेत उपस्थित केला आहे.

राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अ‍ॅड. नीळकंठ ताकबीडकर यांच्या नेतृत्वाखाली दि. १० ते १३ ऑक्टोबर दरम्यान भक्ती स्थळ (अहमदपूर) ते शक्ती स्थळ (मंगळवेढा) ही यात्रा निघाली आहे. ही यात्रा सोलापुरात आली असताना आयोजित पत्रकार परिषदेत

अ‍ॅड. निळकंठ ताकबीडकर यांनी आपली भूमिका स्पष्ट केली. या यात्रेचा उद्देश सांगितला.




### मंगळवेढा कर्नाटकात असते तर भव्य स्मारक उभे राहिले असते

महात्मा बसवेश्वर महाराज यांचा समतेचा वैश्विक असा विचार आहे. जगभरात त्यांचे विचार सांगितले जातात. मंगळवेढा येथे महात्मा बसवेश्वर यांच्या कार्याचा इतिहास आहे. महाराष्ट्रात त्यांच्या स्मारकाची मागणी प्रलंबित आहे. मंगळवेढा जर कर्नाटकात असते तर सुमारे पाच हजार कोटींचे स्मारक उभारले असते, असेही अ‍ॅड. नीळकंठ ताकबीडकर म्हणाले.

महात्मा बसवेश्वर आणि शरणांच्या वास्तव्याने पावन झालेल्या मंगळवेढा येथे महात्मा बसवेश्वर यांचे राष्ट्रीय स्मारक व्हावे, ही शाहू -फुले -आंबेडकर विचारांचा वारसा सांगणाऱ्या सर्वांची मागणी आहे मात्र गेल्या अनेक वर्षांपासून केवळ राजकीय लाभासाठी आश्वासन दिली जात आहेत असा आरोप करत विविध मागण्यांकडे लक्ष वेधण्यासाठी तसेच जनजागृती करण्यासाठी ही लिंगायत संघर्ष यात्रा काढण्यात आली आहे, असे अ‍ॅड. ताकबीडकर यांनी स्पष्ट केले. लिंगायत समाजातील विद्यार्थ्यांसाठी बार्टी, सारथी, महाज्योतीप्रमाणे संस्था उभारून योजनांची अंमलबजावणी करावी. महात्मा बसवेश्वर महाराज यांचे वचन साहित्य मराठी भाषेत महाराष्ट्र शासनाच्या वतीने प्रकाशित व वितरित करण्यात यावे. समाधी संस्कारासाठी प्रत्येक गावात स्मशानभूमी निर्माण करावी यासह अन्य मागण्यांकडे या यात्रेच्या माध्यमातून लक्ष वेधण्यात येत आहे, असेही अ‍ॅड. निळकंठ ताकबीडकर यांनी सांगितले. यावेळी प्रा. उद्धव बांगर, वीरभद्र चिद्रे, विक्रम पटणे, धोंडीबा उपरे आदी उपस्थित होते.



# नेताजी प्रशालेत भोंडला कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ ऑक्टोबर-**

तारा विना श्याम.., मै तो पायल है छनकाई..., मेरी चुनर उड उड जाये......, खेल खेल रे भवानी माँ....., ढोलीडा ढोल ढिमो...., ढोली तारो.... आदी गाण्यावर नीलम नगर येथील नेताजी सुभाषचंद्र बोस प्रशा- लेतील ४८५ मुली व २५० मुलांनी धम्माल नृत्य सादर केल्या. अतिशय शिस्तबद्ध पद्धतीने दोन मोठ्या रिंगणात विविध पारंपरिक गीतांवर नृत्य सादर केले.

या भोंडला कार्यक्रमात समृद्धीचे प्रतीक असलेल्या ऐरावतच्या प्रतिकृतीचे पूजन प्रशालेचे प्राचार्य रविशंकर कुंभार, पर्यवेक्षक गौरीशंकर आळंगे, सांस्कृतिक प्रमुख शिवानंद पुजारी, सांस्कृतिक उप प्रमुख जयश्री बिराजदार व विश्वराध्य मठपती यांच्या हस्ते करण्यात आला. त्यानंतर तारा विना श्याम, मै तो पायल है छनकाई, मेरी चुनर उड उड जाये, खेल खेल रे भवानी माँ, ढोलीडा ढोल ढिमो, ढोली तारो या गाण्यावर विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट प्रकारे ठेका धरुन गरबा दांडिया हा नवरात्र उत्सवातील सांस्कृतिक कार्यक्रम सादर केला. यावेळी विजयालक्ष्मी माळवदकर, भाग्यश्री महाजन, उमादेवी कुंभार, मीनाक्षी वांगीकर, वैशाली इंडे, सविता रामशेट्टी, शिवानंद मेणसंगी, षडाक्षरी हिरेमठ, प्रकाश कोरे, सूर्यकांत बिराजदार आदी उपस्थित होते. सहशिक्षिका जयश्री बिराजदार यांनी भोंडला कार्यक्रमाचे महत्त्व सांगितले. प्राचार्य रविशंकर कुंभार यांनी सर्व विद्यार्थिनींचे अभिनंदन केले.

# रब्बी हंगामासाठी शेतकऱ्यांनी प्रमाणित बियाणे घटकाचा लाभ घ्यावा

### जिल्हा कृषी विभागाचे आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ ऑक्टोबर-**

अन्न आणि पोषण सुरक्षा अभियान-अन्नधान्य पिके सन २०२४-२५ अंतर्गत रब्बी हंगामात प्रमाणित बियाणे वितरण या बाबींचे नियोजन करण्यात आलेले आहे. या करीता चालू वर्षी ज्वारी पिकाचे १० वर्षाच्यावरील प्रमाणीत बियाणे घटकाचे लक्षांक प्राप्त आहे.

प्रमाणीत बियाणे वितरणासाठी एका शेतकऱ्याला आवश्यक असणाऱ्या बियाण्यांचा २ हेक्टर मर्यादेत लाभ देय असणार आहे. प्रमाणीत बियाणे वितरण तालुक्यातील महाबीज यांचे अधिकृत वितरकाकडे उपलब्ध करून देण्यात आलेले आहेत. संबधित शेतकऱ्यांनी तालुका कृषि अधिकारी, कृषि सहाय्यक यांच्याशी संपर्क साधून बियाणे परमिट उपलब्ध करून घ्यावे. सदरचे परमिट अधिकृत वितरकाकडे जमा करून अनुदानाची रक्कम वजा जाता उर्वरीत रक्कम अदा केल्याची पावती घेऊन बियाणे ताब्यात घ्यावे.

ज्वारी पिकासाठी १० वर्षाच्याआतील बियाणे ४ किलो बॅगसाठी रू.१२० अनुदान मर्यादा असून यामध्ये फुले सुचित्रा, परभणी शक्ती व परभणी सुपर मोती या वाणांचा समावेश आहे. १० वर्षाच्यावरील बियाणे ४ किलो बॅगसाठी रू. ६० अनुदान मर्यादा असुन यामध्ये मालदांडी-३५-१, परभणी मोती, फुले वसुधा, परभणी ज्योती व पीकेव्ही क्रांती या वाणांचा समावेश आहे. तरी जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी प्रमाणीत बियाणे घटकाचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकाऱ्यांनी केले आहे.

# कर्ज योजनांसाठी ऑनलाईन अर्ज करण्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ ऑक्टोबर-**

महाराष्ट्र राज्य इतर मागासवींय वित्त आणि विकास महामंडळ मर्यादित हे शासनाच्या इतर मागास बहुजन कल्याण विभागांतर्गत कार्यरत असून या महामंडळाकडून इतर मागासवर्ग प्रवर्गातील व्यक्तींना स्वयंरोजगाराकरीता अर्थसहाय्य उपलब्ध करून देते.

महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ अंतर्गत गुरव समाजाच्या सर्वांगीण विकास व आर्थिक उन्नतीसाठी संत काशिबा गुरव युवा आर्थिक विकास महामंडळ, विरशैव लिंगायत समाजाच्या आर्थिक उन्नतीसाठी जगद्ज्योती महात्मा बसवेश्वर आर्थिक विकास महामंडळ तसेच नाभिक समाजाच्या विकासासाठी संत सेनाजी केशशिल्पी महामंडळ शासनाने स्थापन केलेली असून, जिल्हा सोलापूर स्तरावरील कामकाज कार्यान्वित करण्यात आले आहे.

महामंडळाच्या कर्ज योजनांचे सन २०२४-२५ चे भौतिक व आर्थिक उद्दीष्टाबाबतची माहिती योजना, वैयक्तीक कर्ज व्याज परतावा-, शैक्षणिक कर्ज व्याज परतावा योजना, गट कर्ज व्याज परतावा योजना- महिला स्वयंसिध्दी कर्ज व्याज परतावा योजनेचा लाभा घेण्यासाठी महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, ३ रा मजला, सात रस्ता, सोलापूर-४१३००३. दुरध्वनी क्रमांक ०२१७-२३१२५९५ येथे संपर्क साधावा तसेच इतर मागास प्रवर्गामधील गरजू व्यक्तींनी वरील कर्ज योजनांसाठी ऑन लाईन कर्ज अर्ज संकेत स्थळावर दाखल करावेत असे आवाहन महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळाचे जिल्हा व्यवस्थापक आनंद मालुसरे यांनी केले आहे.

# स्टेट बँकेने जपली सामाजिक बांधिलकी : सीईओ जंगम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ ऑक्टोबर-**

स्टेट बँक ऑफ इंडिया येथील ट्रेझरी शाखेच्या माध्यमातून सामाजिक बांधिलकी जपली आहे. ज्या समाजात आपण जन्मलो त्याचे काहीतरी देणे लागतो याचे उत्तम उदाहरण स्टेट बँक अगदी लोकांसमोर ठेवले असल्याचे कौतुक उद्गार जिल्हा परिषदेचे सीईओ कुलदीप जंगम यांनी काढले.



जिल्हा परिषद कंपाउंड मधील ग्रामिण विकास कार्यालयात संपन्न झालेल्या या सामाजिक सोहळ्याचे ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. त्यांच्यासोबत निशांत जयस्वाल क्षेत्रीय प्रबंधक , डॉक्टर सुधीर ठोंबरे, प्रकल्प संचालक जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, मीनाक्षी वाकडे -मुख्य लेखा व वित्त अधिकारी, सरस्वती उंबरजे - ट्रेझरी शाखेचे मॅनेजर, संतोष चौधरी , आशुतोष भिडे, सहाय्यक मुख्य प्रबंधक यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रम संपन्न झाला.

स्टेट बँकेची सामाजिक बांधिलकी म्हणून गरजू महिलांना अकरा शिलाई मशीन व पायाने अधू असलेल्या अशा पाच दिव्यांग नागरिकांना व्हीलचेयर वाटप करण्यात आले. महिला सक्षम व्हावे म्हणून शिलाई मशीन आणि त्यांचे उत्पन्न वाढले तर घर कामात मदत होईल आणि त्यांचे मोठे स्वप्न साकार होतील अशी यामागे स्टेट बँकेची भूमिका असल्याचे क्षेत्रीय प्रबंधक निशांत जयस्वाल यांनी सांगितले.

प्रस्ताविक व्यवस्थापक सरस्वती उंबरजे यांनी केले. सूत्रसंचालन विकास नायडू यांनी केले. डेप्युटी मॅनेजर अंबादास मिठ्ठा यांनी आभार मानले. कार्यक्रमास एस. बी.आय बँकेचे चे ग्राहक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

## तरूणास तलवारीने मारहाण

**सोलापूर, दि. १३ ऑक्टोबर-**

पूर्व वैमनस्यातून तरूणास तलवारीने मारहाण करून जखमी करण्यात आले. विशाल संजय राठोड (वय २१, रा. गणेश नगर, देगाव, सोलापूर) असे जखमी तरूणाचे नाव आहे. १२ ऑक्टोबर रोजी सकाळी ९ च्या सुमारास गणेश नगर तांडा येथील सेवालाल मंदीर येथे विशाल राठोड हा गेला होता. त्यावेळी रात्रीच्या भांडणाचा राग मनात धरून विकास पवार, राजू पवार, नामदेव पवार यांनी तलवारीने व लाथाबुक्क्याने मारहाण करून जखमी केले. विशाल यास उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

## सिद्धेश्वर तलावात एकाची आत्महत्या

**सोलापूर, दि. १३ ऑक्टोबर-**

शहरातील सिध्देश्वर तलावात पाण्यात पडून एकाने आत्महत्या केली. ही घटना शनिवारी सकाळी उघडकीस आली. मरण पावलेल्या व्यक्तीचे नाव समजू शकलेले नाही. शनिवारी सकाळी नऊच्या सुमारास सिध्देश्वर तलावातमध्ये एका अनोळखी पुरूष पाण्यावर तरंगताना मिळून आला. त्यामुळे फौजदार चावडी पोलिस ठाण्यातील हवालदार परीट यांनी त्यास बाहेर काढून शासकीय रुग्णालयात दाखल केले असता त्याचा उपचारापूर्वीच मृत्यू झाल्याचे डॉ. श्रीकृष्ण बागुल यांनी घोषित केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

# ग्राहक मनाचा अविष्कारमय चिंतनाची प्रज्वलित ज्योत

**सन १९०५ साली मुंबई मध्ये दत्तात्रय बावडेकर यांनी देशपातळी वरील पहिल्या वहिल्याजाहिरात एजन्सीचा पाया रचला. १४ ऑक्टोबर १९०५ हा राष्ट्रीय जाहिरात दिन म्हणून साजरा करायाचा संकल्प महाराष्ट्रातील ३६ जिल्हयातील वृत्तपत्रांशी संबंधित असलेल्या जाहिरात व्यवसायीकांनी आपण नव्याने स्थापन केलेल्या फेडरेशन ऑफ ऍड्व्हर्टायझीग ऍ़ड मार्केटींग इन्टरप्रुनर (फेम ) या संस्थेने आजचा दिवस हा राष्ट्रीय जाहीरात दिन म्हणून साजरा करण्याचे एक मुखी धोरण महाराष्ट्र राज्या तर्फे घोषित केले.**

लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी जाहलो खरेच धन्य ऐकतो मराठी धर्म, पंथ, जात एक जाणतो मराठी

या कवी स्व. सुरेश भट यांनी लिहीलेल्या मराठी भाषेचा खरा सन्मान केंद्र सरकार नविन दिलेल्यानी नुकताच मराठी भाषेला अभिजात दर्जा प्राप्त करुन दिलेला ही मराष्ट्रातील समस्त मराठी प्रेमी साहित्तीक, गायक, चित्रपट क्षेत्रातील दिग्दर्शक यांसह फेम या संस्थेच्या समस्त वृत्त पत्रांशी संलग्र असलेल्या जाहिरात व्यवसायीकांना रास्त अभिमानाची गौरव पूर्ण बाब आहे.

श्री.संत शिरोमणी ज्ञानेश्वर महाराजानीसंपुर्ण युगाला अद्यात्माचा मार्ग दाखवल, त्यांच्या उच्लचारलेल्या वाणीतून रेडया पशुच्या मुखाद्वारे मंत्र वदवीले, निर्जीव भिंत चालवून दाखवली हे अध्यात्मिक अपरत्व अमृतासम आहे.

हे ज्ञानेश्वरी ग्रंथाचे अध्यात्मकी व्यासंगी व्यासपिठ ग्राहक मनाचा विचार शक्तीला तेज्योमय प्रज्वलित करण्याचे अविरत कार्य महाराष्ट्राच्या ग्राहक चळवळीला वृत्तपत्र जाहीरातीच्या आचार व विचार माध्यमातून सन १९०५ पासून महाराष्ट्रातील जाहिरात व्यवसायीकांनी निष्ठेनेकृतीत आणण्याचे योगदान आज मिती यंज्ञकुंडा प्रमाणे अविरत सुरु ठेवले त्या बद्दल महाराष्ट्राच्या वृत्तपत्रेचे जनक रामशास्त्री जांभेकर यांच्या थोरस्मृतिला आजच्या १४ ऑक्टोबर या राष्ट्रीय जाहिरात दिना निमित्त अभिवादन व मानाचा मुजरा अर्पण करणे हे कर्तव्याची बाब मानली पाहिजे.

बुध्दीला चालना निर्णयाची निर्णयाला गती विचार शक्तीची आणि विचार शक्तीला प्रेरकखरेदीचीहे मूळ बाजारातील ग्राहकांच्या खरेदी व्यवहाराचे मुळ धोरण आणि आत्मा म्हणजे जाहिरातकायखरेदी करु व काय नाही याचाखरा रिमोटहाग्राहकांनी वाचलेल्या ऐकलेल्या पाहिलेल्या विचार शक्तीवर अवलंबून असतो.




बाजारात हजारोकंपन्यांचे लाखो प्रोडक विक्रीस उपलब्ध आहेत. पण योग्य कंपनी व योग्य वस्तू आणि विश्वासहरता या त्रिसूत्रांना योग्य मार्गाने योग्य निर्णयाने प्रेरक शक्ती बनवती हिचखरी जाहिरातकला आहे. या व्यवसायाची उपासना प्रमाणिकपणे वर्षानुवर्षे निरंतर योगदान आणि बुध्दीकौशल्याचा माध्यमातून व्यवसायिकपत सांभाळून अविरतपणे सुरुठेवण्याचे आणि ग्राहकांच्या ईच्छा शक्ती आणि आणि मनोबलाला खेरदीसाठी प्रवृत्त करणे या महानकार्य प्रणालितले फेम या संघटनेचे समस्त जाहिरात व्यवसायिक आहेतहे अभिमानाने व्यक्त करावेसे वाटते. हाची देही हाची डोळा संपूर्ण विश्व जरी दिवसा ढवळ्या प्रत्येक घडामोडी प्रत्यक्षात अनुभवले तरी रामप्रहरी घरा घरातहातात पडलेल्या वृत्तपत्र वाचना शिवाय घडलेल्या घटनेची आत्मतृप्ती पांढऱ्या कागदावरच्या काळया शाईनीप्रिंट केलेल्या वाचना शिवाय मनाची घालमेल आणि समाधान चेहऱ्यावर दिसत नाही. इतकी अफाट शक्तीशाली उज्वल परंपराप्रिंट माध्यमाला आहे.ते अविरत श्रध्देपुर्वक समाजा पूढे विविध आविष्काराच्या माध्यमातून सजवविण्याचे महान तपस्वी कार्य महाराष्ट्रातील फेम हि जाहिरातसंघटना तन्मयतेने भोईच्या रुपाने पेलवताना दिसत आहे.

विश्वव्यापी कोविडच्या प्रादुर्भावा नंतर देशातील प्रिंन्ट मिडीया आणि चॅनल प्रसारण माध्यमे यांच्या मध्ये बरिच चढाओढ दिसून येत असलीतरी प्रिंन्ट मिडीयाचे महात्म्य चंद्रसूर्य प्रमाणेतेजज्योमय न संपणारे आहे. आजच्या स्पर्धात्मक युगात वृत्तपत्रे विक्रेत्याना जाहिरात व्यवसायिका पेक्षा जास्त मशिन मानधन दिले जाते.पण बौध्दीक विचारांनी वृत्तपत्रात प्रसिध्द होणारी जाहिरात आणि त्या दिवशीच्या त्या पेपरची बाजारात होणारी चर्चा आणि वाढला जाणारा वृत्तपत्राचा दर्जा याचं गणित घातलं तर वृत्तपत्राचे मालक, संपादक व वार्ताहर यांच्या तुलनेत जाहिरात व्यवसायिंकांचा सदैव सिहांचा वाटा निर्णयक भूमिकेने सिध्द झालेला आहे.

हि बाब देशातीलकोणत्याहि वृत्तपत्राला नाकारता येणार नाही. बाजारातील उद्योग धंध्याचे शोरुम दुकानाचे आर्थिक बजेटचे किमयागार हे खऱ्या आर्थाने जाहिरात व्यवसायिक आहेत. शो-रुममध्ये अथवा दुकानात उपलब्ध असलेल्या पुरवठ्याला ग्राहकांच्या विक्रीची सांगडा हा प्रामुख्याने जाहिरात व्यवसायिकच सिध्द करुन दाखवू शकतो. त्यामुळे संपुर्ण विश्वात हजारो स्वरुपाचे व्यवसाय उद्योग धंदे आहेत. या सर्वांच्या व्यवसायायिकांचा किमयागार हा केवळ जाहिरात व्यवसायिकच आहे. हे नमूदकरताना फेम या संघटनेला किती अनंन्य साधारण महत्व आहेहेकळून येते.

केंद्र व राज्य शासनांनी आपली प्रशासकीय धोरणे ही खाजगी संस्थेच्या माध्यमातून ठरवल आहे आजच्या राष्टीय जाहिरात दिनानिमित्त समस्त राज्यातील हजारो फ ेम संघटनेच्या जाहिरातदारांच्या वतीने राज्य शासनाला विनंती करण्यात येते कि शासनाचा करोडोरुपयांच्या बजेटच्या जाहिराती जर फेम या राज्यस्तरीय संघटनेच्या माध्यमातून राबवीण्याचे धोरण ठरविले तर राष्ट्रीय जाहिरातदिन खऱ्या अर्थानेसमृध्द होवू शकेल.

वृत्तपत्रातील संपादक पत्रकार व वार्ताहर या वर्गाला देखिल अनेज सुविधा आणि मानधन व मानसन्मान मिळतो पण वृत्तपत्रांची जाहिरात सजावट करुन बाजारात आर्थिक लाभ उत्पन्न करुन देणाऱ्या जाहिरात व्यवसायिकाच्या पादरी सन १९०५ साला पासून ठरलेल्या कमिशन शिवाय कांहीच पदरी पडत नाही. हिखरी उणीव आहे. म्हणूनचग्राहक मनाच्या अविष्कारांने चिंतनमय होणाऱ्या प्रज्वलित (फेम) ज्योतीला भविष्यातील वाटचालित अनंन्य साधारण महत्व आहे.

**शब्दांकन-**
**मोहन वैद्य, सोलापूर**
**मो. नं. ९८५००४०४००**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त



### बार्शी हौशी कलाकारांतर्फे अमिताभ, रेखा यांचा वाढदिवस उत्साहात साजरा

**बार्शी, दि. १३ ऑक्टोबर-**

बार्शी फक्त हौशी कलाकार यांच्यातर्फे अमिताभ आणि रेखा यांचा वाढदिवस त्यांचीच गाणी गाऊन शुक्रवारी साजरा करण्यात आला. सदर कार्यक्रम राणा कॉम्प्लेक्स येथे पार पडला. या कार्यक्रमात मेजर अविनाश हिंगमिरे, सीए बालकिसन जाजू, अशोक डहाळे, अजय खंडेलवाल, लक्ष्मी तोरड, रुपाली पवार, सुजाता हिंगमिरे, नीलिमा कांबळे आणि सुनील फल्ले यांनी अमिताभ आणि रेखा यांची गीते सादर करुन वाढदिवस साजरा करण्यात आला. सदर कार्यक्रमांमध्ये परदेशी या सच है पिया, खाई के पान बनारस वाला, छुकर मेरे मन को, ओ साथी रे तेरे बिना भी क्या जीना, प्यार मे दिल पे मार दे गोली, अपनी तो जैसे तैसे, अंग्रेजी मे कहते है क्या आय लव यू, कभी कभी मेरे दिल में ख्याल आता है, गोरी है कलाई या, सारा जमाना हसीनो का दिवाना, अगर तुम न होते, तुम भी चलो, मार गई मुझे तेरी जुदाई ,छोरा गंगा किनारेवाला अशी गीते सादर करण्यात आली. सर्व सदस्यांनी गायन अत्यंत जोशपूर्ण केले. त्यामुळे वातावरण अमिताभ रेखा मय  होऊन गेले होते. त्याच दिवशी लक्ष्मी तोरड यांचा वाढदिवस होता. त्यांचाही वाढदिवस साजरा करण्यात आला. सदर कार्यक्रमास हॉल उपलब्ध करुन दिल्याबद्दल राणा कॉम्प्लेक्स चे मालक राणादादा देशमुख यांचे आभार सीए बालकिसन जाजू यांनी मानले. साऊंड सिस्टीमची व्यवस्था प्रदीप इंगोले यांनी केल्यामुळे अशोक डहाळे यांनी आभार व्यक्त केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सुनील फल्ले आणि अजय खंडेलवाल यांनी नियोजन केले होते.



### यमाई देवी मंदिर परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे

**श्रीपूर, दि. १३ ऑक्टोबर-**

महाळुंग (ता. माळशिरस) येथील ऐतिहासिक व प्रसिद्ध असलेल्या यमाई देवीच्या प्रांगणामध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविल्याने मंदिराच्या सुरक्षेत वाढ झाली आहे. हे मंदिर प्राचीन असून पुरातत्त्व खात्याच्या अखात्यरित आहे. सध्या मंदिराचे जीर्णोद्धाराचेही काम चालू आहे. ऐतिहासिक वारसा असलेल्या या देवीचा मोठा भक्तवर्ग आहे. नवरात्र, चैत्री पौर्णिमा, तसेच दीपावली, गुढी पाडवा अशा सणावारास  देवीस दागिन्यांनी नटवले जाते. याच्या सुरक्षिततेसाठी मंदिरात सीसीटीव्हीची नितांत आवश्यकता होती. याबाबत महाळुंग-श्रीपूर नगरपंचायतीचे उपनगराध्यक्ष भीमराव रेडे-पाटील यांनी खा. धैर्यशील मोहिते-पाटील, शिवतेजसिंह मोहिते-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली तातडीने अमलात आणून मंदिर परिसरात सीसीटीव्ही बसवले. याबरोबरच महाळुंग जिल्हा परिषद शाळेची सातवीपर्यंत शाळा आहे. मात्र सातवीनंतर विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी श्रीपूरला तीन ते साडेतीन किमी दूर जावे लागत होते. ही बाब महाळुंग-श्रीपूर नगरपंचायतीचे उपनगराध्यक्ष भीमराव रेडे-पाटील यांच्या निदर्शनास पालकांनी आणून देताच तातडीने या प्रश्नांचा पाठपुरावा करत जि. प. शाळेस आठवीचा वर्ग घेण्यास मान्यता मिळवून आणली आहे. यामुळे पालकवर्ग व विद्यार्थ्यांमध्ये समाधान  आहे. तसेच महाळुंग- श्रीपूर नगरपंचायत प्रभाग ५ मधील पाण्याची समस्या सोडवत नवीन बोअर घेत त्यावर मोटार बसविण्यात आली. त्यामुळे पाण्याची समस्या कमी होण्यास मदत झाली आहे. उपनगराध्यक्ष भीमराव रेडे-पाटील यांनी केलेल्या या कामासाठी नागरिकांमधून समाधान व्यक्त होत आहे.



### मेहता शाळेत भोंडल्याचा कार्यक्रम जल्लोषात

**सोलापूर, दि. १३ ऑक्टोबर-**

कै. वि. मो. मेहता माध्यमिक शाळेत विद्यार्थिनींसाठी नवरात्र उत्सवानिमित्त भोंडल्याचे आयोजन केले होते. कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून भगिनी समाज मंडळाच्या कार्यकारणी सदस्य पल्लवी वाले उपस्थित होत्या. तसेच माजी पर्यवेक्षिका सुस्मिता तडकासे, शाळेच्या मुख्याध्यापिका श्रुती बागेवाडी तसेच ज्येष्ठ शिक्षिका मीनाक्षी भाटवडेकर उपस्थित होत्या.प्रथम प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते हत्तीच्या मूर्तीची पूजा करण्यात आली. त्यानंतर मूर्तीच्या आजूबाजूला सर्व विद्यार्थिनींनी एकत्र येऊन फेर धरला. इयत्ता नववी व दहावीच्या विद्यार्थिनींनी गरबा नृत्य सादर केले.  फेर धरत असताना काही शिक्षिकांनी पारंपारिक , भोंडल्याची गाणी गायली. या गाण्यांमध्ये लोककथांपासून निसर्गाशी निगडित विषयांपर्यंत गाणी गायली. कार्यक्रमाची सांगता आरती व विद्यार्थिनींना खिरापत देऊन करण्यात आली.

### विठ्ठल-रुक्मिणी चरणी चांदीच्या पादुका अर्पण

**पंढरपूर, दि. १३ ऑक्टोबर-**

अश्विन शुद्ध दशमी विजयादशमी निमित्त मुंबई येथील भाविक नंदिनी अशोक मथुरे यांनी श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या चरणी चांदीच्या पादुका अर्पण केल्याची माहिती व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी दिली. या पादुकाचे वजन सुमारे ४ किलो ६७० ग्रॅम होत असून, रक्कम रू.चार लाख २५ हजार ६२४ इतकी किंमत होत आहे. त्याबद्दल त्यांचा मंदिरे समितीचे वतीने विभाग प्रमुख ज्ञानेश्वर कुलकर्णी यांच्या हस्ते श्रींचा फोटो व उपरणे देऊन यथोचित सन्मान करण्यात आला. त्यावेळी मंदिर समितीचे सराफ गणेश भणगे व देणगीदारांचे कुटुंबीय, मंदिराचे पदाधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

# पंढरपुरातील एक हजार वृक्ष लागवडीचा टप्पा पूर्ण

## हभप शिवाजीराव मोरे महाराज : ९९,९२३ वृक्ष लागवड लवकरच पूर्ण करणार

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १३ ऑक्टोबर-**

श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती, नगरपरिषद पंढरपूर वृक्षप्रेमी पंढरपूर नागरिक यांच्या संयुक्त सहभातून शहरातील रिद्धी सिद्धी गणपती मंदिर परिसरात श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या हस्ते वृक्षारोपण करुन एक हजार वृक्ष लागवडीचा टप्पा पूर्ण केला.

यावेळी मार्गदर्शन करताना विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी सांगितले की, वृक्षारोपण करणे ही काळाची गरज असून विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती सदैव आपल्या पाठीशी असून वृक्षलागवड चळवळीसाठी  काहीही कमी पडू दिलं जाणार नाही. भविष्यकाळात पालखी मार्ग व पंढरपूर शहर हिरवागार झाला पाहिजे. यासाठी सर्व पंढरपूरकरांनी पुढाकार घेतला असून त्यासाठी पंढरपूर नगरपरिषद ही अनमोल सहकार्य करत आहे याचाही आनंद असल्याचे सांगितले. यावेळी मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, सदस्या शकुंतला नडगिरे, उपमुख्याधिकारी ॲड. सुनिल वाळुजकर, प्रशांत आगावणे, रवी सर्वगोड, रविंद्र कोडग, ॲड. रामलिंग कोष्टी, देहू येथील वृक्षदायी संस्थेचे सदस्य विकास कंद, सचिन कुंभार, सचिन काळोखे, विजय मोरे, सागर मोरे, दिनेश साळुंखे, करकंब गावच्या लेकीचं झाड संकल्पक ज्ञानेश्वर दुधाणे, पंढरपूर वृक्षप्रेमी चळवळीचे सदस्य माऊली म्हेत्रे, मांगले काका, मोहन बोडके, विवेक बडवे, जितेंद्र वजरीनकर, सतीश खडके, जगन्नाथ मुळीक, शंकर पवार, शाम तापडिया, जुगल भाऊ बाहेती, स्वप्निल मोरे, राजाभाऊ तिवाटणे, वैभव येवनकर, संजय कपडेकर, दीपक इरकल, निसारभाई शेख, जयंत हरिदास, सुहास शिर्के, सारंग कुंभार आदी उपस्थित होते.



### विठुरायाची नगरी होणार हिरवीगार

तीर्थक्षेत्र पंढरपूर नगरीला जोडणारे प्रत्येक रस्ते त्यामध्ये पुणे रोड, कराड रोड, सोलापूर रोड, नगर रोड तसेच सातारा या प्रत्येक रस्त्यावर मिळून १० हजार वृक्षांची लागवड करीत प्रत्येक रस्ता हरित करण्याचे उद्दिष्ट असून पंढरपूर वृक्षप्रेमींच्या अथक परिश्रमातून हे उद्दिष्ट देखील साकारणार असून मंदिर समितीच्या वतीने भारतीय जातीचे देशी वृक्ष आणि त्याला संरक्षणासाठी ट्री गार्ड लागतील तेवढे देण्याचे सांगून विठुरायाची नगरी हिरवीगार करायची आहे असे मंदिर समितीचे सदस्य शिवाजी महाराज मोरे यांनी सांगितले. यावेळी पंढरपूर हिरवागार करण्यासाठी आम्ही कधीच कमी पडणार नाही असे सोमनाथ होरणे यांनी सांगितले.

# होटगी रोड ते इंगळगी रस्त्याला २२४ कोटी निधी

**● आ. सुभाष देशमुख यांच्या प्रयत्नांना यश**

**तभा वृतसेवा,**
**मंद्रुप, दि. १३ ऑक्टोबर-**

दक्षिण तालुका मतदारसंघातील होटगी रोडवरील प्रमुख रस्त्यापैकी एक असलेला होटगी रोड ते इंगळगीपर्यंत ३४ किलोमीटर रस्त्याच्या काँक्रिटीकरण कामास राज्य सरकारकडून हायब्रीड ॲन्युइटी मॉडेल प्रोग्राम (हॅम) अंतर्गत २२४ कोटी रूपये निधी राज्य सरकारकडून मंजूर झाले आहेत. यामध्ये होटगी रोड (महिला हॉस्पिटल) ते होटगी स्टेशनपर्यंतचा रस्ता चौपदरीकरण होणार आहे आणि त्यापुढील रस्ता दुपदरीसह संपूर्ण रस्ता हा सिमेंट काँक्रिटीकरण होणार आहे. या कामासाठी आ. सुभाष देशमुख यांनी राज्य सरकारकडे पाठपुरावा केला होता, अखेर त्याला यश आले आहे.



अक्कलकोट व दक्षिण सोलापूर या दोन तालुक्यांना जोडणारा महत्वाचा रस्ता आहे. या रस्त्यावर शहरातील आसरा चौक भागाबरोबरच होटगी - होटगी स्टेशन-औज (आ.)-इंगळगी आदी महत्त्वाची व वर्दळीची गावे आहेत. या रस्त्याचे काम झाल्यास होटगी आणि परिसरातील गावाचा मोठ्या प्रमाणात विकास होणार आहे. अक्कलकोट आणि दक्षिण सोलापूर तालुका ते कर्नाटक राज्य या मार्गावरील वाहतुकीचा प्रवास वेळ आणि अंतर कमी होणार आहे. तसेच या रस्त्याच्या परिसरातील एनटीपीसी, साखर कारखान्यांच्या ऊस वाहतुकीसाठी तसेच दक्षिण सोलापूर येथील चार ते पाच सिमेंट कारखान्यांना सिमेंटचा कच्चा माल कर्नाटकमधून, आंध्र येथून आणण्यासाठी हा रस्ता अतिशय उपयुक्त ठरणार आहे. या कामासाठी आ. देशमुख यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पाठपुरावा केला होता. अखेर त्याला यश आले असून यासाठी २२४ कोटींची मंजुरी मिळाली आहे. लवकरच काम सुरू होणार आहे. यामध्ये प्रमुख रस्त्यासह जुने आणि जीर्ण झालेले रस्त्यांची पुनर्बांधणी करणे, आवश्यक ठिकाणी लहान पूल बांधणे व संरक्षक भिंत बांधणे आदी कामांचा समावेश आहे.

### विकासाला चालना मिळेल

रस्त्याचा विकास झाल्यास भोवतालच्या परिसरातील पर्यटन व शेती मालाची वाहतूक वाढीसह या भागाच्या विकासाला चालना मिळणार आहे. त्यामुळे खासकरून होटगी आणि परिसराचा विकास साधणे शक्य होईल, असे आ. सुभाष देशमुख यांनी सांगितले.

# कुर्डूवाडीत पाच वर्षांत ३०० कोटींची विकासकामे

**तभा वृत्तसेवा,**
**कुर्डूवाडी, दि. १३ ऑक्टोबर-**

कुर्डूवाडी-उजनी पाणीपुरवठा नवीन पाईप लाईनसाठी ११६ कोटी रुपयांसह पाच वर्षांत कुर्डूवाडी शहराच्या सर्वांगिण विकासासाठी शासनाच्या विविध योजनेतून उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांच्या सहकार्यातून सुमारे तीनशे कोटी रूपये निधी खेचून आणला असून नगरपालिका इतिहासात आजपर्यंत एवढ्या मोठ्या प्रमाणावर निधी आणल्याचे आ. संजयमामा शिंदे यांनी कुर्डूवाडी येथे आयोजित पत्रकार परिषदेत सांगितले.



सांस्कृतिक भवनसाठी ५ कोटी मंजूर झाले आहेत. यातच ज्येष्ठ नागरिकांसाठी विरुंगळा केंद्र होणार आहे. महापुरुषांच्या पुतळा परिसर सुशोभीकरणासाठी १ कोटी ५० लाख, मुस्लीम कब्रस्थान सुविधासाठी १ कोटी, राज्य उत्पादन शुल्क इमारतीसाठी ४ कोटी, कुर्डूवाडीसाठी अंदाजे ३०० कोटींचा निधी या पाच वर्षात मंजूर झाला आहे. ट्रामा केअर सेंटरसाठी ७ कोटी ५० लाख, शहर पोलीस ठाण्यासाठी ६ कोटी, पाणीपुरवठा केंद्र येथे सौर ऊर्जा प्रकल्पासाठी २ कोटी, बसस्थानक काँक्रीटकारणासाठी २ कोटी, शहरातील रस्त्यासाठी ६९ कोटी निधीचा समावेश आहे.

# माढ्याच्या विकासकामांसाठी साडेचार कोटी निधी

**● जिल्हा दूध संघाचे अध्यक्ष रणजितसिंह शिंदे यांची माहिती**

**तभा वृत्तसेवा,**
**माढा, दि. १३ ऑक्टोबर-**

माढा नगरपंचायतीस स्थानिक क्षेत्रात नागरी सेवा व सुविधा पुरविण्याच्या योजनेतून करण्यात येणाऱ्या ४ कोटी ४८ लाख रुपयांच्या कामास प्रशासकीय मान्यता मिळाल्याची माहिती जिल्हा दूध संघाचे अध्यक्ष रणजितसिंह शिंदे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

माढा शहराच्या विकासासाठी आमदार बबनराव शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली शहरात माढा महातपूर ते भांगे वस्ती रस्ता डांबरीकरण ३५ लाख, माढा म हातपूर रस्ता येथील स्मशानभूमी बांधणे व काँक्रीट रस्ता करणे - १५ लाख, सटवाई मंदिर पाठीम ागून जाणारा रस्ता व मनकर्णा ओढ्यावर पूल बांधणे ४० लाख, भांगेवस्ती येथे इनलाईन गटार व अंतर्गत रस्ते काँक्रीटीकरण ३० लाख, कुमार चांगभले घर ते गजेंद्र चांगभले घर रस्ता काँक्रिटीकरण २० लाख, माढेश्वरी नगर आंबुरे प्लॉट इनलाईन गटर व काँक्रीट रस्ता ३५ लाख, नरसिंह मंदिर येथे सभामंडप १३ लाख, मुख्य वेस सुशोभीकरण २५ लाख, माढा वेस जवळून जाणारा नाला काँक्रीट गटार ४० लाख, नांदकनाथ मंदिर सुशोभीकरण २० लाख, बाजार पटांगण सुशोभीकरण २५ लाख, दिगंबरनगर ते कवडे सर घरापर्यंत इनलाईन गटार ३० लाख, गोसावी वस्ती ते चवरेवस्ती इनलाईन गटार व काँक्रीट रस्ता १० लाख, क्षीरसागर प्लॉट काँक्रीट रस्ता २५ लाख, कब्रस्तान ते पाणी टाकीपर्यंत डांबरीकरण रस्ता २० लाख, अण्णाभाऊ साठेनगर सम ाज मंदिर नूतनीकरण १५ लाख, गणेश मंदिर समोर पेव्हिंग ब्लॉक १० लाख, सोलापूर रोड ते बाबा मारकडवस्ती डांबरीकरण ३० लाख, जुना माढा वाकव रस्ता ते नाईकवाडे घर ते कदम घर काँक्रीट रस्ता १० लाख अशा कामांना प्रशासकीय मान्यता मिळाली असून ही कामे लवकरच सुरू होणार आहेत.



पत्रकार परिषदेस माजी जिल्हा परिषद सदस्य झुंजार भांगे, गटनेत्या संजीवनी भांगे, नगरसेवक राजू उर्फ चंद्रशेखर गोटे, राष्ट्रवादीचे नेते सुभाष जाधव, तालुका उपाध्यक्ष शहाजी चवरे, माढा शहराध्यक्ष दत्ता काका अंबुरे, युवक शहराध्यक्ष श्री. अनिकेत चवरे, अशोक चव्हाण, सचिन चवरे, औदुंबर चवरे, दर्शन कदम, विकास पवार, रणजित देवकुळे, अजय नाईकवाडे, शिवरंग गोटे उपस्थित होते.

# सांगोल्यात आज युवा सेनेच्या १४ शाखांचे होणार उद्घाटन

**आ. शहाजीबापू पाटील यांचा वाढदिवस**

**▸ शिवसेना शहरप्रमुख माऊली तेली यांची माहिती**

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. १३ ऑक्टोबर-**

आ. शहाजीबापू पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त सोमवार दि.१४ ऑक्टोबर रोजी स.१० वा. सांगोला शहरात युवा सेनेच्या १४ शाखांचे मान्यवरांच्या हस्ते उद्घाटन होणार असून आ. शहाजीबापू पाटील यांच्या कार्यावर आधारित ध्वनी गीताचा प्रसारण शुभारंभही होणार असल्याची माहिती शिवसेना सांगोला शहरप्रम ुख माऊली तेली यांनी दिली.



युवासेना शाखांचे उद्घाटन युवासेना जिल्हा संपर्क प्रमुख सागर पाटील, युवा नेते दिग्विजय पाटील, तालुकाप्रमुख दादासाहेब लवटे, विधानसभा प्रमुख प्रा. संजय देशमुख, ज्येष्ठ नेते आनंद घोंगडे, शहर संघटक आनंदा माने, महिला आघाडी तालुकाप्रमुख राणी माने, शहरप्रमुख छाया मेटकरी, उपप्रमुख अप्सरा ठोकळे यांच्या मार्गदर्शनाखाली व शहर उपप्रमुख अस्मिर तांबोळी, विजय इंगोले, समन्वयक अरुण बिले, एस. सी. सेल शहरप्रमुख कीर्तीपाल बनसोडे, उपप्रमुख सोमेश्वर यावलकर, मायाक्का प्रतिष्ठानचे अध्यक्ष काशिलिंग गावडे, शहर सहसंघटक अरुण पाटील, शहरप्रमुख समीर पाटील, उपप्रमुख सुजित भोकरे, काशिलिंग गाडेकर, सागर नरुटे, ओबीसी सेल शहरप्रमुख आयुब मुलाणीसह मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

### या ठिकाणी होणार शाखा

अहिल्यानगर, जयभवानी चौक, भुईटेवस्ती, खारवटवाडी, इंगोलेवस्ती, सुरवसे-केदारवस्ती, पुजारवाडी, सनगरगल्ली, इंदिरानगर वसाहत, वंदे मातरम् चौक, संजयनगर शाखा नं.१, संजयनगर शाखा नं.२, वाढेगाव नाका, आनंदनगर या ठिकाणी शाखांचे उद्घाटन करण्यात येणार आहे.





# माळशिरसमध्ये ५३ वर्षांपासून व्याख्यानमालेची परंपरा

**नवरात्र महोत्सव व सांकृतिक मंडळाचा उपक्रम; श्रोत्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद**

**तभा वृत्तसेवा,**
**सदशिवनगर, दि. १३ ऑक्टोबर-**

माळशिरस येथील नवरात्र महोत्सव व सांकृतिक मंडळाने गेली ५३ वर्षे व्याख्यानम ालेचे सातत्य टिकवले असून माळशिरससारख्या ग्रामीण भागातील श्रोत्यांसाठी ही व्याख्यानम ाला बौद्धिक, सामाजिक मेजवानीच आहे. या व्याख्यानमालेस कायम चांगला प्रतिसाद मिळत आहे.

कै. साहेबराव सुग्रीव पाटील उर्फ कांताआबा या मंडळाची स्थापना झाली. सुरुवातीपासूनच त्यांचे सहकारी कै.एन. डी. पाटील, आगतराव, पाटील यांच्यासह सर्व सहकाऱ्यांची गावातील लोकासाठी व्याख्यानमाला सुरु करावी धारणा होती त्यास सर्व स्तरातून चांगला प्रतिसाद मिळाला. या व्याख्यानमालेत प्रा. शिवाजीराव भोसले, द. मा. मिरासदार, शंकर खरात, अण्णा हजारे, जगदीश खेबुडकर, व्यंकटेश माडगुळकर, सिंधुताई सपकाळ, मुक्ता दाभोळकर, इंद्रजीत देशमुख, अपर्णा रामतीर्थकर, पुष्पा जवळकर, वि. वा. बुवा, नसीमा पठाण, प्रा. व. बा. बोधे, यु, म पठाण. आ. अण्णा डांगे, आ. राम सातपुते, प्रा. लक्ष्मणराव ढोबळे, ना. दो. महानवर, राहुल सोलापूरकर, विवेक घळसासी, रामचंद्र देखणे, जे. डी. दीक्षित या मान्यवराची व्याख्याने या व्यासपीठावर झाली आहेत. त्याचबरोबर गणपत पाटील, शरद तळवलकर, वसंत शिंदे या सीने कलाकारांनी हजेरी लावली. त्याचबरोबर अनेक हास्यसम्राट यांनी ही येथील श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. सुरुवातीच्या काही वर्ष ही व्याख्यानमाला वाघमोडे बंगला येथे होत होती.

श्रोत्यांचा वाढत्या प्रतिसादामुळे जागा अपुरी पडू लागल्याने कन्या प्रशालेच्या पटांगणात होऊ लागली. कै. साहेबराव सुग्रीव पाटील उर्फ कांताआबा यांच्या निधनानंतर ही त्यांचा मुलगा अजय पाटील याने ही परंपरा सुरु ठेवली आहे. या व्याख्यानमालेचे वैशिष्ट्य म्हणजे व्याख्यान मालेची सुरुवात कोणत्याही वक्त्यांच्या  व्याख्यानाने झाली तरी शेवटही फलटणचे प्रा. शिवाजीराव भोसले असेपर्यंत त्यांचे व्याख्यान होत होते. या मंडळाने ही परंपरा गेली ५३ वर्षे जोपासली असून सर्वसाम ान्यांमधून कौतुक होत आहे.



# स्त्री शक्तीच्या सन्मानासाठी मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना

**आ. शहाजीबापू पाटील यांचे भाळवणी येथे प्रतिपादन**

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. १३ ऑक्टोबर-**

स्त्रीमध्ये भगवंताचा अवतार असून स्त्रीशक्ती महान होत आहे. महाराष्ट्रात स्त्रीशक्तीचा सन्मान व्हावा या उद्देशाने महायुती सरकारने मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना सुरू केली. या योजनेमुळे स्त्रीशक्तीला अनमोल आनंद मिळत असून स्त्रीला स्वाभिमानी जीवन जगण्याचा हक्क मिळाला आहे असे प्रतिपादन आ. शहाजीबापू पाटील यांनी भाळवणी येथे केले.

आ. पाटील स्नेह परिवाराने भाळवणी (ता. पंढरपूर) येथे नवरात्र महोत्सवानिमित्त जागर स्त्रीशक्तीचा होम मिनिस्टर कार्यक्रम आयोजित केला होता, याप्रसंगी ते  बोलत होते. यावेळी राजलक्ष्मी पाटील, अर्चना कदम, चंद्रमाला बागल, रुक्मिणी बागल, भगिरथी जाधव, सुमन माने, सुनील पाटील, भगवान चौगुले, रणजीत जाधव, धनंजय काळे, शिवाजी बाबर, हरिभाऊ शिंदे, भोजप्पा बाबर, राजकुमार पाटील, सागर चौगुले, संदीप पाटील यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी शिवसेना नेते मारुती जाधव, शिवाजी बाबर यांनी मनोगत व्यक्त केले. आ. शहाजीबापू पाटील यांनी मुख्यमंत्र्यांकडे पाठपुरावा करून भाळवणी येथील शाकंभरदेवी मंदिराचा तीर्थक्षेत्र विकास आराखड्यात समावेश केला. त्याबद्दल त्यांचा नागरी सत्कार यावेळी करण्यात आला.

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## पंढरपूर-स्वारगेट बस छत्रपती शिवाजी महाराज चौकातून सुटणार

### ग्राहक पंचायतीचे शशिकांत हरिदास यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १३ ऑक्टोबर-**

पंढरपूर- टेंभुर्णी- स्वारगेट जाणारी बस छत्रपती शिवाजी महाराज चौकातून निघणार अशी माहिती अखिल भारतीय ग्राहक पंचायतीचे जिल्हा अध्यक्ष शशिकांत हरिदास यांनी दिली.

ग्राहक पंचायतीने अनेक दिवसांपासून राज्य परिवहन महामंडळाकडे करकंब टेंभुर्णी मार्गे पुण्याकडे जाणारी बस सेवा छ.शिवाजी महाराज चौकातून लिंक रोड, कॉलेज चौक या मार्गाने सोडावी अशी मागणी केलेली होती. त्याप्रमाणे सोमवार (दि.१४) पासून पहाटे ५-४५ ला सुटणारी बस छत्रपती शिवाजी महाराज चौकातून सुटणार आहे. ती ठाकरे चौक, लिंक रोड, कॉलेज चौक, सरगम चौक, करकंब टेंभुर्णी मार्गे स्वारगेटकडे जाईल.

तेथून परतीच्या प्रवासासाठी ११-४५ वा निघून याचमार्गे पंढरपूरला पोहचेल. पंढरपूरला येणाऱ्या भाविकांची, ज्येष्ठ नागरिक, स्थानिक प्रवाशांची थेट श्री विठ्ठल मंदिरापर्यंत येण्याची चांगली सोय होणार आहे तरी या सेवेचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा असे आवाहन आगार प्रमुख योगेश लिंगायत, स्थानक प्रमुख अंकुश सरगर, ग्राहक पंचायतीचे प्रांत कोषाध्यक्ष विनोद भरते, सदस्य सुभाष सरदेशमुख, जिल्हा संघटक दीपक इरकल, जिल्हा सचिव सुहास निकते, तालुका अध्यक्ष विनय उपाध्ये, उपाध्यक्ष नंदकुमार देशपांडे,सचिव प्रा.धनंजय पंधे,जिल्हा सदस्य अण्णा ऐतवाडकर,पांडुरंग अल्लापूरकर, तालुका सदस्य सागर शिंदे, अंकुश वाघमारे यांनी केले आहे.



## संक्षिप्त वृत्त...



### बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळामार्फत बार्शीतील कामगारांना गृहोपयोगी वस्तूंचे वाटप

**बार्शी, दि. १३ ऑक्टोबर-**

बार्शी तालुक्याचे लोकप्रिय आमदार विकासरत्न राजेंद्र राऊत यांच्या संकप्लनेतून महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळमार्फत बार्शी तालुक्यातील ६५० कामगारांना गृहोपयोगी वस्तूंचे वाटप माजी नगरसेवक विजयनाना राऊत यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी माजी नगरसेवक ॲड. महेश जगताप, संदेश काकडे, भाजपाचे शहराध्यक्ष तथा लायन्स क्लबचे अध्यक्ष महावीर कदम, भोला आडसुळ आदी उपस्थित होते.



### भटके विमुक्त युवा आघाडी प्रदेशाध्यक्षपदी अमोल गायकवाड

**वळसंग, दि. १३ ऑक्टोबर-**


भाजपा भटके विमुक्त युवा आघाडी प्रदेशाध्यक्षपदाची जबाबदारी अमोल गायकवाड यांच्यावर सोपवण्यात आली आहे. त्यांची ही दुसऱ्यांदा निवड झाली आहे. अमोल गायकवाड यांच्याकडे पहिल्यांदा प्रदेशाध्यक्षपदाची जबाबदारी असताना भटके समाजावर असलेल्या समस्या शासन दरबारी लावून धरून कामाचे अंमलबजावणी केली आणि संघटनात्मक कामामुळे पक्षात त्यांचे स्थान अजून भक्कम झाले भारतीय जनता पार्टीच्या विचारांचा प्रचार आणि प्रसार करण्यासोबतच रोखठोक भूमिका मांडण्यासाठी त्यांची ओळख आहे. कमी काळात आणि कमी वयात त्यांना भारतीय जनता पार्टीन संघटनात्यक दृष्टीने अत्यंत महत्त्वाची जबाबदारी असलेल्या भाजपा भटके विमुक्त युवा आघाडी प्रदेशाध्यक्ष पदावर फेरनिवड केल्याने सर्व स्तरातून त्यांचे कौतुक होत आहे.



### लोकमंगल पतसंस्थेमुळे अनेक तरुणांची व्यवसायात मोठी भरारी

**नातेपुते, दि. १३ ऑक्टोबर-**

सोलापूर जिल्ह्यात व जिल्ह्याबाहेर प्रसिद्ध असणारे लोकमंगल समूहाची लोकमंगल नागरी सहकारी पतसंस्था शाखा नातेपुते शाखेला तीन वर्ष पूर्ण झालेली असून पतसंस्थेची ठेवी ३.५० कोटी व कर्ज वाटप ७ कोटी झालेले आहे गरजू तरुणांना व्यावसायिक कर्ज दिल्यामुळे नातेपुतेसह परिसरातील अनेक तरुणांनी व्यवसायात उभारी घेतलेली आहे. समाजामध्ये लोकमंगल पतसंस्थेचे चांगले नाव आहे. तसेच सभासदांना चांगल्या प्रकारे १२.०५ टक्के लाभांश दिला जातो. ज्येष्ठ नागरिकांसाठी ठेवीवर १०.५० टक्के व्याजदर आहे. महिलांसाठी चांगल्या प्रकारच्या स्कीमा उपलब्ध आहेत. पतसंस्थेतील व्यवस्थापकसह सर्व कर्मचारी वर्ग ग्राहकांना अतिशय चांगल्या प्रकारे सेवा देत असल्यामुळे आपुलकीने वागणाऱ्या कर्मचाऱ्यांमुळे नातेपुतेसह परिसरातील लोकांना लोकमंगल पतसंस्था आपली पतसंस्था वाटत आहे.



### जनसेवक महादेव कोगनुरे यांनी केले आनंदराव देवकते यांना अभिवादन

**मंद्रुप, दि. १३ ऑक्टोबर-**

माजी दुग्धविकास मंत्री कै. आनंदराव देवकाते यांच्या पुण्यतिथीनिमित्त राजूर येथे एमके फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष तथा दक्षिण सोलापूर तालुक्याचे काँग्रेसचे नेते जनसेवक महादेव कोगनुरे यांनी कै. आनंदराव देवकते यांच्या स्मृतिस उजाळा देत प्रतिमेस पुष्प वाहून अभिवादन केले. यावेळी माजी सभापती अशोक देवकते, राधाकृष्ण पाटील, अप्पाशा मंदोली, राहुल देवकते, माझी जि. प. सदस्य आप्पासाहेब काळे, राजूर गावचे उपसरपंच सतीश देवकते, औरादचे नामदेव बंडगर, संजवाडचे बुळगुंडे, बनसोडे व गावातील प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# १२ नोव्हेंबरला पंढरपूर ते घुमान रथ, सायकल यात्रा

## संत नामदेव महाराज जयंती; महाराष्ट्र, कर्नाटक राज्यातील सायकल यात्रींचा असणार सहभाग

**तभा वृत्तसेवा**
**पंढरपूर, दि.१३ ऑक्टोबर-**

शांती, समता व बंधुता या संत विचारांचा प्रचार व प्रसार करण्याच्या हेतूने भागवत धर्माचे प्रचारक संत शिरोमणी श्री नामदेव महाराजांची ७५४ वी जयंती, संत श्री ज्ञानेश्वर महाराजांचा ७२८ वा संजीवन समाधीदिन सोहळा व शीख धर्माचे संस्थापक श्री गुरुनानकदेव यांच्या ५५५ व्या जयंतीनिमित्त श्री क्षेत्र पंढरपूर ते श्री क्षेत्र घुमान (पंजाब) अशी सुमारे २ हजार ३०० किलोमीटरची रथ व सायकल यात्रा निघणार आहे. या यात्रेचे प्रस्थान १२ नोव्हेंबर रोजी म्हणजे कार्तिक शुद्ध एकादशीच्या मुहूर्तावर करण्यात येणार आहे.

या सायकल यात्रेत महाराष्ट्र व कर्नाटक राज्यातील सायकल यात्रींनी सहभाग नोंदविला असल्याची माहिती भागवत धर्म प्रसारक मंडळाचे अध्यक्ष सूर्यकांत भिसे यांनी दिली. संत ज्ञानेश्वर महाराजांनी भागवत धर्माचा पाया रचला तर संत तुकाराम महाराज या धर्माचे कळस झाले.

संत शिरोमणी श्री नामदेव महाराजांनी उत्तर भारतात भागवत धर्माचा प्रचार व प्रसार केला व भागवत धर्माची पताका फडकावली. पंजाबमधील शीख धर्मीयांमध्ये आपल्या सात्त्विक विचारांचा प्रभाव तेवत ठेवला. मुगल सम्राट फिरोजशा तुघलक यांनी श्री क्षेत्र घुमान येथे संत नामदेव महाराज यांचे भव्य दिव्य मंदिर उभारले.

श्री विठ्ठल भक्तीचा व शांती, समता व बंधुता या संत विचारांचा प्रचार व प्रसार करण्याच्या उद्देशाने भागवत धर्म प्रसारक मंडळ, राज्य पालखी सोहळा पत्रकार संघ, नामदेव समाजोन्नती परिषद व समस्त नामदेव शिंपी समाज यांच्या संयुक्त विद्यमाने श्री क्षेत्र पंढरपूर ते श्री क्षेत्र घुमान अशी भव्य रथ व सायकल यात्रा २०२२ पासून सुरु करण्यात आली आहे.

### पंजाबचे राज्यपाल करणार स्वागत

संत नामदेव महाराजांच्या रथ व सायकल यात्रेचे २ डिसेंबर रोजी चंदीगड येथे राजभवन मध्ये पंजाबचे राज्यपाल सी . पी . राधाकृष्णन हे स्वागत करणार आहेत. त्यांच्या हस्ते पादुकांची पूजा व सायकल यात्रींचा सन्मान करण्यात येणार आहे . श्री क्षेत्र घुमान येथे ५ डिसेंबर रोजी सायकल यात्रेचा समारोप होणार आहे. त्यानंतर ही रथयात्रा पंजाब, हरियाणा, दिल्ली, उत्तर प्रदेश, मध्यप्रदेश राज्यातून प्रवास करीत दि.१२ डिसेंबर रोजी श्री क्षेत्र पंढरपूर येथे पोहोचेल.

### ५० वारकरी तर १०० सायकल यात्रींचा सहभाग

संत नामदेव रथ व सायकल यात्रेचे हे तिसरे वर्ष आहे . या यात्रेला महाराष्ट्रासह कर्नाटक राज्यातील सायकलस्वारांनी भरभरून प्रतिसाद दिला आहे. विविध राज्यांतील भाविकांची मागणी आणि संत नामदेव महाराजांच्या शांती, समता व बंधुता या विचारांचा प्रचार-प्रसार करण्यासाठी यंदाही भागवत धर्म प्रसारक मंडळ, पालखी सोहळा पत्रकार संघ, नामदेव समाजोन्नती परिषद, श्री नामदेव दरबार कमिटी (घुमान) व देशभरातील विविध नामदेव शिंपी समाज संस्था-संघटनांच्या वतीने ही यात्रा १२ नोव्हेंबर रोजी श्री क्षेत्र पंढरपूरहून श्री क्षेत्र घुमान (पंजाब) कडे प्रस्थान ठेवणार आहे. या यात्रेत सुमारे ५० वारकरी व १०० सायकलयात्री सहभागी झाले असून, ही यात्रा महाराष्ट्र, गुजरात, राजस्थान, हरियाणा मार्गे पंजाब राज्यात प्रवेश करेल. ४ डिसेंबर रोजी ती श्री क्षेत्र घुमान येथे पोहचणार आहे.

# अकलूजच्या प्रांत कार्यालयावर गोंधळी समाजाचा मोर्चा

## विविध मागण्यांसह आर्थिक विकास महामंडळ जाहीर करण्यासाठी एल्गार

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. १३ ऑक्टोबर-**

गोंधळी समाज हा मागासलेला समाज असून गेली अनेक वर्ष शासकीय योजने पासून वंचित राहिलेला आहे. भारताला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्ष पूर्ण झाली तरीही या समाजाचा आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक विकास झाला नाही. या समाजाच्या विकासासाठी शासनाने आर्थिक विकास महामंडळ जाहिर करावे या मागणीसाठी माळशिरस तालुक्यातील सकल गोंधळी समाजाच्या वतीने अकलूजच्या प्रांत कार्यालयावर भव्य मोर्चा काढण्यात आला.

युवा नेते महेश शिंदे यांच्या नेतृत्वाखाली गांधी चौक ते प्रांत कार्यालय असा मोर्चा काढण्यात आला. त्यात सोलापूर जिल्ह्यातील समाज बांधव सहभागी झाले होते. समाजाच्या वतीने प्रांताधिकारी विजया पांगारकर यांना समाजाच्या विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले. या निवेदनात म्हटले आहे की, महाराष्ट्रात ६० लाख संख्येत हा समाज असून या समूहाची अद्याप कोणीही दखल घेतली नाही. त्यामुळे गोंधळी समाजाच्या विविध मागण्यांसाठी मोर्चा काढण्यात आला. यामध्ये गोंधळी समाजासाठी आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्यात यावे, हा समाज मागास वर्गीय समूह असल्याने ॲट्रॉसिटीसारखा संरक्षण कायदा लागू करण्यात यावा, समाजातील वंचित व दुर्बल घटकास (प्रति कुटुंब) भूमिहीन ५ एकर जमीन देण्यात यावी, सामाजातील मुलां-मुलींसाठी मोफत शिक्षण देण्यात यावे, समाजातील मुलां-मुलींसाठी तालुकास्तरीय स्वतंत्र वसतिगृह स्थापन करण्यात यावे, हा समाज भटका समूह असल्याने गृह चौकशीच्या आधारे सरसकट जातीचे प्रमाणपत्र देण्यात यावे या व अशा विविध मागण्या घेऊन प्रांत कार्यालयावर समाजाच्या वतीने क्रांती मोर्चा काढण्यात आला. या मोर्चास अशोक माने, अनिल माने, संजय माने यांनी मार्गदर्शन केले.

यावेळी पाठिंबा देण्याकरिता अखिल भारतीय गोंधळी समाजाचे ज्येष्ठ नेते सूर्यकांत भिसे, अप्पासाहेब गायकवाड, उत्तम वाघमोडे, अमर वाडेकर, राजू वाघमारे, अनिल उगाडे, दत्ता शिंदे, संतोष कांबळे, विक्रम गायकवाड, संतोष वाघमोडे, शंकर भिसे, बाजीराव वाघमोडे, सुखदेव वाघमोडे, प्रकाश माने, अण्णा पवार, दिलीप माने, विष्णू भोरे, राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते उत्तमराव जानकर, माळशिरसचे माजी सरपंच विकास धाईंजे, आरपीआय आठवले गट मिलिंद सरतापे, किरण धाईंजे, नॅशनल दलित मुव्हमेंट फॉर जस्टीस संघटन दत्ता कांबळे, महाराष्ट्र विकास सेना पक्ष प्रमुख किरण साठे, स्वाभिमानी शेतकरी संघटना अजित बोरकर, बहुजन मुक्ती पार्टीचे सौरभ वाघमारे, मैत्री प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य संजय वाघमोडे, शंकर मस्के, केंद्रीय मानवाधिकार संघटन रणजीत सातपुते, सकल धनगर समाज अप्पासाहेब देशमुख, मागासवर्गीय मुस्लिम समाज अल्ताफ पठाण यांनी प्रत्यक्षरीत्या येऊन पाठिंबा दिला.

मोर्चासाठी सोलापूर जिल्ह्यासह महाराष्ट्रातील तमाम गोंधळी समाज बांधव उपस्थित होते. मोर्चा यशस्वी करण्यासाठी गोंधळी समाजाचे युवा नेते बाबासाहेब माने, प्रदीप वाघमारे, लखन काळे, योगेश माने, विनोद पवार, आदित्य माने, विष्णू इंगळे, निलेश माने, सचिन उगाडे, सुभाष काळे व जिल्ह्यातील गोंधळी समाजातील सर्व बांधव व भगिनींनी यासाठी परिश्रम घेतले.



गोंधळी समाज हा भटका समाज असून जीवन जगण्यासाठी सातत्याने संघर्ष करताना दिसतो आहे. आजपर्यंत अनेक सरकार आली. पण या समाजाकडे सर्वांनी दुर्लक्ष केले आहे. त्यामुळे तात्काळ महामंडळाची निर्मिती करून या समाजाला पुढे घेऊन जाणे गरजेचे आहे. आमच्या मागण्या मान्य नाही केल्या तर लाखो गोंधळी समाजाचे बांधव घेऊन आझाद मैदानावर बेमुदत आमरण उपोषण करतील व मंत्रालयावर मोर्चा काढण्यात येईल.
**- महेश शिंदे, युवक नेते, गोंधळी समाज**

## काँग्रेसच्या सुरेश हसापुरे यांना पितृशोक

**मंद्रुप, दि. १३ ऑक्टोबर-**



जिल्हा कॉंग्रेसचे कार्याध्यक्ष सुरेश हसापुरे यांचे वडील व निंबर्गीचे ज्येष्ठ नागरिक सिद्रामप्पा लक्ष्मण हसापुरे (वय ८५) यांचे शुक्रवारी रात्री हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले.

सिद्रामप्पा हसापुरे यांनी कंदलगाव येथे सोसायटी सेक्रेटरी म्हणून काम केले. त्यानंतर स्वत:च्या १७ एकर शेती करीत पाच मुलांवर उत्तम संस्कार केले. त्यामुळेच वेगवेगळया क्षेत्रात नावलौकिक मिळविला. विजयकुमार यांना सेक्रेटरी, प्रकाश यांना शेती, अप्पासाहेब यांना सिध्देश्वर साखर कारखान्यात नोकरी, सुरेश व रमेश यांना राजकारणात आवड असल्यामुळे ते दोघे याच क्षेत्रात कार्यरत आहेत. त्यांच्या संस्कारामुळे मुलांप्रमाणे नातू स्वप्नील मंद्रुप येथे शिक्षक, श्रीदीप निंबर्गीचे सरपंच, विशाल कंदलगाव येथे सेक्रेटरी तर समर्थ शिक्षण घेत आहे. मुलांच्या ११ कन्यांचे विवाह पाहण्याचा योग त्यांना मिळाला.

## रश्मी बागल यांच्या निवेदनाची रेल्वे विभागाकडून सकारात्मक दखल

### भूयारी मार्ग करण्यासंदर्भात प्रस्ताव वरिष्ठ कार्यालयास सादर

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि. १३ ऑक्टोबर-**

उमरड ते केडगाव, हजारवाडी ते जेऊरवाडी, पारेवाडी येथील पवार गुंडगिरे वस्ती याठिकाणी नागरीकांना लोहमार्ग ओलांडून जीव धोक्यात घालून प्रवास करावा लागतो. त्यामुळे याठीकाणी रेल्वे विभागाने भुयारी मार्ग करावा अशी मागणी भारतीय जनता पक्षाच्या प्रदेश उपाध्यक्षा रश्मी बागल यांनी सहाय्यक मंडळ अभियंता कुर्डूवाडी तसेच विभागीय रेल्वे व्यवस्थापक सोलापूर यांच्या कडे निवेदनाद्वारे केली होती



सदर निवेदनाची दखल सकारात्मक दखल घेत रेल्वे विभागाकडून उमरड ते केडगाव दरम्यान कि.मी.क्र ३३१/१ ते २. पारेवाडी येथील पवार-गुंडगिरे वस्ती नजीक कि. मी. क्र.३१९ १ ते २ आणि हजारवाडी ते जेऊरवाडी दरम्यान किमी. क्र. ३३८/४ते ५ याठीकाणी भूयारी मार्ग करण्यासाठी वरिष्ठ कार्यालयाकडे मंजुरीसाठी प्रस्ताव पाठण्यात आला असून डिसेंबरअखेरपर्यंत या तिन्ही भुयारी मार्गासंदर्भात सकारात्मक निर्णय होईल असे रेल्वे विभागाकडून सांगण्यात आले आहे. या कामासाठी भारतीय जनता पक्षाच्या प्रदेश कार्यालया कडून मोठे सहकार्य लाभत आहे.

## विविध स्पर्धेत मंद्रुप महाविद्यालयाचे यश

**तभा वृतसेवा,**
**मंद्रुप, दि. १३ ऑक्टोबर-**

येथील संतोष भीमराव पाटील महाविद्यालया तील विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धेत घवघवीत यश मिळवले आहे.

भौतिकशास्त्र विभागाच्या वतीने घेण्यात आलेल्या पोष्टर स्पर्धेत सानिया पटेल व मिसबाह शेख यांनी प्रथम, सुप्रिया कोले व प्रगती बिराजदार यांनी द्वितीय व तृतीय क्रमांक स्नेहल बिराजदार, वैभवी पवार, आरती मोसलगी, रेणुका निंबाळ यांना विभागून देण्यात आला. शिवाय स्वाती बिराजदार, स्नेहा माशाळे व लक्ष्मी दुधाळे, उषा साबळे यांनी उत्तेजनार्थ पारितोषिके पटकावली. या स्पर्धेचे उद्घाटन आयक्यूएसी समन्वयक डॉ. संतोष कदम यांच्या हस्ते करण्यात आले. स्पर्धकांना प्रा.एम. टी. म्हेत्रे, प्रा. डॉ. जे. डी. नादरगी व प्रा. पी. बी. दहिवडे यांचे मार्गदर्शन लाभले. सोलापूर विद्यापीठाच्या २० व्या युवा महोत्सवात स्थळ छायाचित्रण स्पर्धेत कौस्तुभ नारायणकर याने प्रथम तर मेहंदी कला स्पर्धेत सानिया इनामदार हिने द्वितीय क्रमांक पटकाविला. त्यांना प्रा. के. यू. गरड, प्रा. व्ही. एस. आटकर, प्रा. डॉ. ज्योती नादरगी व डॉ. लतिका कट्टीमनी यांचे मार्गदर्शन लाभले.

आंतरमहाविद्यालयीन तायक्वांदो स्पर्धेत प्रीती राठोड हिने सुवर्णपदक तर शिवराज बोळकोठे याने तृतीय क्रमांक पटकावला. त्यांना शारीरिक शिक्षण संचालक डॉ. शिवानंद तोरवी व प्रशिक्षक शिवराज मुगळे यांचे मार्गदर्शन लाभले. अमरावती येथे होणाऱ्या आव्हान या राज्यस्तरीय शिबिरासाठी ऋषिकेश सीताफळे याची निवड झाली आहे. याला रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. एच. एल. जाधव व प्रा. डॉ. एस. ए. निंबर्गी यांचे मार्गदर्शन लाभले.

या यशाबद्दल सोलापूर जिल्हा समाजसेवा मंडळाचे अध्यक्ष पी. एल. कोळी, उपाध्यक्ष डॉ. सी. जी. हविनाळे, सचिव एम. डी. कमळे, सहसचिव सुबोध कोळी, खजिनदार व्ही. के. पाटील व प्रभारी प्राचार्य डॉ. जवाहर मोरे यांनी अभिनंदन केले.

# वैरागच्या पाणीपुरवठ्यासाठी ३८.५४ कोटींची योजना

## राज्य शासनाकडून मंजुरी; आ. राजेंद्र राऊत यांची माहिती

**तभा वृत्तसेवा**
**वैराग दि १३ ऑक्टोबर-**

वैराग शहराच्या वाढत्या पाणीटंचाईची गरज पाहता नगरोत्थान महाभियानांतर्गत वैराग शहराच्या पाणीपुरवठा प्रकल्पासाठी ३८.५४ कोटी योजनेला महाराष्ट्र शासनाने मंजुरी दिल्याची माहिती पत्रकार परिषदेत आ. राजेंद्र राऊत दिली.

वैराग शहरासाठी मंजूर करण्यात आलेली ही तिसरी नळ पाणीपुरवठा योजना असून आत्तापर्यंतची सर्वात मोठी योजना ठरली आहे. या योजनेला मंजुरी देत असताना सन २०४० पर्यंत वाढत्या लोकसंख्येचा विचार करण्यात



आलेला आहे. नगरोत्थान महाभियानांतर्गत वैराग नगरपंचायत पाणीपुरवठा प्रकल्पाचा प्रस्ताव मुख्य अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, पुणे यांच्या तांत्रिक मान्यतेसह नगरपरिषद प्रशासन संचलनालयात सादर केलेला होता. त्यास नगरपरिषद प्रशासन संचालनालयाने देय तांत्रिक मान्यता शुल्क व प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार शुल्क यांचा समावेश करून ३८.५४ कोटी रुपये किंमतीचा प्रस्ताव शासनास सादर केलेला आहे. या योजनेच्या वित्तीय आकृतीबंधानुसार स्वहिश्यापोटी आवश्यक निधी उभारण्याबाबतचा ठराव वैराग नगरपंचायतीने आहे. सदर प्रकल्पासाठी ०.७०७ दलघमी पाणी आरक्षण अस्तित्वातील योजनेतून उपलब्ध असून दि.४ ऑक्टोबर २०२४ रोजीच्या पत्रान्वये ०.७६८ इतके वाढीव पाणी आरक्षण मंजूर झाले आहे. त्यामुळे सदर प्रकल्पासाठी १.४७५ एवढे पाणी आरक्षण मंजूर आहे, असे आ. राऊत यांनी सांगितले. या पत्रकार परिषदेस माजी जि. प. सदस्य संतोष निंबाळकर, माजी नगराध्यक्ष आसिफ तांबोळी, रमेश पाटील, केशव घोगरे, विलास रेणके, नाना धायगुडे आदी मान्यवर उपस्थित होते.

### २०४० पर्यंतच पाण्याचे नियोजन

पाणी आरक्षणाचा ३० टक्के पुनर्वापरासह विचार करता सदर पाणी आरक्षण २०४० पर्यंत पुरेसे ठरते असे सदर मान्यतेमध्ये नमूद करण्यात आले आहे. वैराग शहराला हिंगणी मध्यम प्रकल्पातून पाणीपुरवठा केला जातो. या प्रकल्पाची साठवण क्षमता ४५.५६ दशलक्ष घनमीटर इतकी आहे. दररोज शहरासाठी सुमारे दहा लाख लिटर पाणी लागते. त्यामुळे ही योजना वैरागकरांसाठी पाणीटंचाई दूर करणारी ठरणार आहे.

CMYK

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## आलुर ते बेळंब रस्त्यावर रात्री संशयित तरुणांचा गाड्या अडवुन गोंधळ

**तभा वृत्तसेवा**
**आलुर, दि.१३ ऑक्टोबर -**

आलुर मुरुम रोडवर आलुर ते बेळंब रस्त्यावर शुक्रवार दि.११ ऑक्टोबर रोजी रात्री बारा वाजता कर्नाटकातील बसवकल्याण येथील मालवाहतूक ट्रकमधुन शेतकऱ्यांचे सोयाबीन दुधनी येथे विकण्यासाठी जात असताना त्या ट्रकला वीस ते पंचवीस अनोळखी लोकांच्या जमावाने तोंडावर मास्क आणि हातामध्ये लोखंडी रॉड, बांबुची लाकडे घेऊन अडवण्याचा प्रयत्न केला.

पण ट्रक ड्रायव्हरने घाबरुन ट्रक न थांबवल्याने त्या ट्रकच्या हेडलाईटवर लोखंडी रॉडने मारले असता त्या ट्रकच्या उजव्या बाजुला हेडलाईटचे नुकसान झाले आहे. तो ट्रक तसाच पुढे जात असताना जवळपास अर्धा किलोमीटर दोन ते तीन मोटारसायकलवर पाठलाग करण्यात आले.

थोड्या वेळाने आलुर येथील दोन मोटारसायकली मुरुमहुन आलुरला येत असताना त्यांनासुद्धा अडवण्याचा प्रयत्न केला व लोखंडी रॉडने मारण्याचा प्रयत्न केला.

अशा प्रकारच्या घटनांमुळे वाहनचालकांमध्ये दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे. अशा घटनांमुळे परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

प्रशासनाने या रस्त्यावरील गैरप्रकारांना आवर घालावा, अशी मागणी नागरिकांमधून होत आहे.



### संक्षिप्त वृत्त...



## परंडा शहरात दसरा सण उत्साहात साजरा

**परंडा, दि.१३ ऑक्टोबर -**

परंडा येथे प्रतिवर्षी प्रमाणे यंदा ही दसरा सण मोठ्या उत्साहाने व आनंदी वातावरणात साजरा करण्यात आला. तसेच परंडा येथील उपकोषागार कार्यालयात तहसीलदार निलेश काकडे यांच्या हस्ते शस्त्र व लक्ष्मीपुजन करण्यात आले. त्यानंतर गार भवानी मंदिरात विधिवत पुजन करून सीमोल्लंघन साजरे करण्यात आले होते. तर पिठापुरी रस्त्यावर ही सोमवारी गल्ली विभागातील नागरिकांनी शहरातील मानाचे देशमुख मंडळी यांच्या हस्ते शस्त्र पुजन करून सीमोल्लंघन साजरे केले. या बहुसंख्य नागरिक व मुले मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यानंतर शहरातील नागरिकांनी भवानी शंकर मंदीर भगवती मंदीर गरग्याची आई व देशमुख वाड्यातील रेणुका मंदीरात दर्शनासाठी गर्दी दिसून आली. नतंर एकमेकांना सोने देऊन गळाभेट व मोठ्याचे दर्शन घेतले. नतंर भगवती आईच्या पालखी ची मिरवणूक काढण्यात आली होती. सीमोल्लंघनासाठी पुजेचे पौरोहित्य ग्राम उपाध्ये, पुरुषोत्तम वैद्य व नगरसेवक मकरंद जोशी यांनी केले होते.



## प्रज्वलित मंगरुळे यांची उपविभागीय मुख्य अभियंतापदी नियुक्ती

**मुरूम, दि.१३ ऑक्टोबर -**

मुरूमचे सुपुत्र प्रज्वलित उमाकांत मंगरुळे यांची तुळजापूर येथे उपविभागीय मुख्य अभियंता वर्ग-१ या पदासाठी नियुक्ती झाली आहे. यापूर्वी महाराष्ट्र लोकसेवा आयोग २०१३ मध्ये सहाय्यक अभियंता श्रेणी-२ साठी मंगरूळे यांची निवड झाली होती. नुकतेच त्यांची तुळजापूर येथील कृष्णा मराठवाडा बांधकाम उपविभागात उपविभागीय मुख्य अभियंता पदावर नियुक्ती झाली आहे. यामुळे त्यांचा मुरुम शहरातील मित्रपरिवार आणि माय बेस्ट फ्रेंड ग्रुपच्यावतीने सत्कार करण्यात आला. यावेळी प्रा.डॉ. रविंद्र गायकवाड, प्रा.डॉ. सुधीर पंचगल्ले, प्रा. विश्वजीत अंबर, सहशिक्षक अशोक जाधव, ज्ञानेश्वर चौधरी, बसवराज पाटील कदेरकर, परमेश्वर जवळगे, बाबुराव खटके, सुरेश मंगरूळे, मुकूंद सुर्यवंशी, माजी नगरसेवक अजित चौधरी, जगदीश बेंडकाळे, आसिफ कुरेशी, सतिश शेळके, संजय आळंगे, विनोद गायकवाड, दत्ता हुळमुजगे, बाळासाहेब खंडागळे आदींची उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे आयोजन ओम जाधव व आनंद जाधव यांनी केले.



## रामकृष्ण परमहंस महाविद्यालयास ३ सुवर्णपदक

**धाराशिव, दि.१३ ऑक्टोबर -**

दि.२० ते २९ सप्टेंबर यादरम्यान ५३ महाराष्ट्र बटालियन एनसीसी लातूर यांच्यावतीने छत्रपती शिवाजी महाविद्यालय उमरगा येथे संयुक्त वार्षिक प्रशिक्षण शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरामध्ये रामकृष्ण परमहंस महाविद्यालयातील NCC च्या केडेटसनी घवघवीत यश प्राप्त केले. या कॅम्प साठी पाच मुली आणि पाच मुले असे एकूण दहा जणांची निवड झाली होती. यामध्ये तीन मुलींनी इंटर कंपनी व्हॉलीबॉल स्पर्धेमध्ये चॅम्पियनशिप जिंकून सुवर्ण पदक प्राप्त केले. या विद्यार्थ्यांचे कौतुक करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जयसिंगराव देशमुख म्हणाले मुलींनी अतिशय दैदिप्यमान यश प्राप्त केले आहे.

## मोटार सायकल-कारच्या अपघातात एकजण जागीच ठार

**धाराशिव, दि.१३ ऑक्टोबर -**

मोटार सायकल व कारच्या धडकेत एकाचा मृत्यु झाली घटना नळदुर्ग ते तुळजापूर रोडवर घडली आहे. यात मयत विक्रम गोविंद राठोड (वय ३२, रा. अमराई तांडा किलज ता. तुळजापूर) हे दि.५. ऑक्टोबर रोजीनळदुर्ग ते तुळजापूर जाणारे रोडवरुन मोटरसायकल (क्र. एमएच २५/ एबी १७८३) जात होते. दरम्यान बसवंतवाडी पाटीकडे स्विफट डिझायर कार (क्र.एमएच १२/जेयु ८३०१) चा चालक जावेद शेख (रा. रहीमनगर नळदुर्ग ता. तुळजापूर) यांनी त्यांचे ताब्यातील कार ही हायगयी व निष्काळजीपणे चालवून विक्रम राठोड यांचे मोटरसायकलला पाटीमागून धडक दिली. या अपघातात विक्रम राठोड हे गंभीर जखमी होवून मयत झाले. याप्रकरणी राहुल गोविंद राठोड यांनी दि.११ ऑक्टोबर रोजी दिलेल्या तक्रारीवरुन नळदुर्ग पोलिस ठाणे येथे भा.न्या.सं. कलम २८१,१०६ सह कलम १८४ मोवाका अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### वाशी तालुक्यात सावंत यांच्या कामाची एक्स्प्रेस सुसाट...

# स्वखर्चाने बावी येथील ६५ विद्यार्थिनींना सायकल वाटप





**तभा वृत्तसेवा**
**तेरखेडा, दि.१३ ऑक्टोबर -**

राज्याचे आरोग्यमंत्री तथा धाराशिव जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. तानाजीराव सावंत यांनी मतदार संघात विकास कामाचा धडाका लावला आहे. कोट्यवधी रुपयांचा निधी परांडा मतदारसंघात खेचून आणत विकासाची एक्स्प्रेस सुसाट धावत असल्याचे पाहिला मिळत आहेत. तसेच स्वखर्चाने ही शेतकऱ्यांना शेतरस्ते, नागरिकांना मोफत साखर, नदी खोलीकरण तसेच बचतगटांना आर्थिक मदत अशी कामे मोठ्या प्रमाणात सुरू आहे. याचेच उदाहरण म्हणजे दि.११ ऑक्टोबर रोजी वाशी तालुक्यातील बावी येथील जनसेवा विद्यालय हायस्कूल येथे पालकमंत्री डॉ. तानाजीराव सावंत यांच्या स्वखर्चाने ६५ विद्यार्थिनींना सायकलीचे वाटप केले.

बावी गावापासून सुमारे दोन ते तीन किलोमीटर अंतरावर शाळा असल्याने मुलींना उन्हात, पाऊस पायपीट करत जावे लागत असल्याने गैरसोय होत असे, ही बाब गावचे ग्रामपंचायत सदस्य सोमनाथ शिंदे यांनी पालकमंत्री डॉ.सावंत यांचे पुतणे केशव सावंत यांची भेट घेऊन मुलींना शाळेत जाण्यासाठी सायकलीची मागणी केली होती. यासर्व व्यथा समजून घेऊन केशव सावंत यांनी पालकमंत्री तानाजीराव सावंत यांच्या स्वखर्चातून जनसेवा विद्यालय बावी येथील ६५ मुलींना सायकलचे वाटप केले. त्यामुळे मुलींच्या चेहऱ्यावरील आनंद ओसंडून वाहत होता. तसेच गावातील नागरिकांनी सावंत यांच्या कामाचे कौतुक केले.

याप्रसंगी डीसीसी बँकेचे डायरेक्टर केशव सावंत, माजी जिल्हा परिषद सदस्य बिभीषण खामकर, शिवसेना तालुका समन्वयक उद्धव साळवी, युवा सेना जिल्हा प्रमुख बाळासाहेब मांगले, संजय गांधी निराधार समिती अध्यक्ष रणजित घुले, शेरकर आबा, दत्त तोडकर तसेच गावातील नागरिक उपस्थित होते.

## आ. चौगुले यांच्या प्रयत्नांतून उमरगा व मुरूम बसस्थानकाच्या पुनर्बांधणीसाठी निधी मंजूर

**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.१३ ऑक्टोबर -**

महाराष्ट्र शासनाच्या परिवहन विभागाकडून उमरगा व मुरूम बसस्थानकाच्या पुनर्बांधणी, नूतनीकरणासाठी प्रत्येकी ५ कोटी रुपये असा एकुण १० कोटी रूपये निधी मंजूर झाल्याची माहिती आ. ज्ञानराज चौगुले यांनी दिली आहे.

उमरगा हे राष्ट्रीय महामार्गावरील शेवटचे व सीमावर्ती भागातील तालुक्याचे ठिकाण असून याठिकाणी शिक्षण व व्यापार यासाठी दररोज हजारो लोक येत असतात. परंतु येथील बसस्थानकाची सध्याची इमारत जीर्ण झाल्याने प्रवाशांना विविध गैरसोयीचा सामना करावा लागत होता. तसेच मुरूम बसस्थानक हे संपूर्ण मोडकळीस आल्याने नागरिक, विद्यार्थी व विशेषतः महिलांची गैरसोय होत होती. या अनुषंगाने आ. चौगुले यांच्या पाठपुराव्यामुळे या दोन्ही बसस्थानकाच्या पुनर्बांधणी व नुतणीकरणासाठी निधी मंजूर झाला आहे.

सदर कामासाठी निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल आ. चौगुले यांनी मुख्यमंत्री तथा परिवहन मंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे अध्यक्ष भरतशेठ गोगावले, तसेच याकामी वेळोवेळी मार्गदर्शन केल्याबद्दल माजी खा.प्रा. रवींद्र गायकवाड यांचे आभार मानले आहेत.

## जि.प. कन्या शाळेचे मुख्याध्यापक अंकुशराव जाधव पीएचडी 'पेट' पात्र

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.१३ ऑक्टोबर**

जि.प. कन्या शाळेचे मुख्याध्यापक अंकुशराव जाधव सेवानिवृत्तीच्या उंबरठ्यावर आले असताना त्यांनी पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर विद्यापीठ सोलापूर अंतर्गत ऑगस्ट मध्ये घेण्यात आलेल्या परीक्षेत पीएचडी 'पेट' परीक्षा पात्र झाले आहेत.



शासनाच्या वयोमानानुसार ते दोन वर्षात सेवानिवृत्त होणार असुन त्यांचे शिक्षण राष्ट्रभाषा पंडित, शालेय व्यवस्थापन पदविका, डीएड, बीए, एमए बीएड, एमएससी आयटी, जर्नालीझम पत्रकारीत पदवी प्राप्त केली आहे. याचबरोबर प्रा.अ.हा. साळुंखे इतिहास संशोधक यांच्या हस्ते गुणगौरव पुरस्कार मिळाला आहे. अंधश्रद्धा अभ्यासक्रम प्रमाणपत्र, स्त्रीभ्रूण हत्या यावर लेख लिहीले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचारधारा राष्ट्रीय प्रमाणपत्र अशा विविध सामाजिक शैक्षणिक क्षेत्रातील नामांकित संस्थांचे २४ पुरस्कार प्राप्त असून त्यांचा सामाजिक शैक्षणिक विविध क्षेत्रातील कार्य असताना पीएचडी 'पेट' पात्र धारक बनल्याने त्यांचा सर्व स्तरातून अभिनंदन कौतुक होत आहे.

## एन.व्हि.पी शुगर्सचा बॉयलर अग्नीप्रदीपन समारंभ संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१३ ऑक्टोबर -**

एन.व्हि.पी शुगर प्रा.लि. जागजी येथिल पहिल्या गळीत हंगामाचा बॉयलर अग्नी प्रदीपन कार्यक्रमाचा होम पूजा कारखान्याचे चेअरमन नानासाहेब पाटील व सुविद्य पत्नी अमृता यांच्या हस्ते पूजा संपन्न झाली.



बॉयलर अग्नी प्रदीपन कारखान्याचे मार्गदर्शक आप्पासाहेब पाटील, चेअरमन नानासाहेब पाटील, कार्यकारी संचालक अमृता पाटील, अक्षय पाटील, कृष्णा पाटील, पार्थ पाटील, मुख्य शेतकी अधिकारी जयवंत रोहिले, चिफ इंजिनिअर ओंकार मोकाशे, मे.चिफ केमिस्ट उमेश बिक्कड, पॅन इंचार्ज राजेंद्र शिंदे, बॉयलर अटेंडन अजय गाडे, चिफ अकाउंटंट निलेश कदम, टर्बाईन अटेंडन परमेश्वर वीर, सुरक्षा अधिकारी मेजर चंद्रकांत पवार आदी मान्यवरांच्या हस्ते संपन्न झाला. याप्रारंभी कारखान्याचे चेअरमन पाटील यांनी सर्व कर्मचाऱ्यांना विजयादशमी च्या शुभेच्छा दिल्या तसेच या वर्षीचा गळीत हंगाम पुर्ण क्षमतेने चालवणार असुन त्या दुष्टीने सर्व कामे प्रगतीपथावर घेऊन पुर्ण करण्याच्या सूचना केल्या.

या कार्यक्रमास जागजीचे सरपंच व्यंकट बंडगर, भिमराव सावंत, कृष्णा सावंत, विक्रम देशमुख, सुरेश सावंत, दिपक सावंत, लेबर ऑफिसर दत्तात्रय गायकवाड, विजय वाघे, प्रविण पाटील, सुधाकर खोत, राहुल जावळे, ढोकळे मास्तर, सावतर मास्तर, परचेस अधिकारी रवि जोगदंड, सागर शिंदे, पांडुरंग कावळे, विष्णू खोत, उपाध्ये मास्तर, वैभव शिंदे, कैलास धाबेकर, संभाजी चोरमले, कौस्तुभ शिंदे, सह सर्व विभाग प्रमुख, कर्मचारी उपस्थित होते.

# शिक्षकांचे ऑक्टोबरचे वेतन दिवाळीपूर्वी करा

### शिक्षक परिषदेची अर्थमंत्र्यांकडे मागणी...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१३ ऑक्टोबर -**

दिवाळी हा महत्वाचा सण शिक्षक-प्राध्यापक-शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना आनंदाने साजरा करता यावा, याकरिता त्यांचे ऑक्टोबर महिन्याचे नियमित वेतन दिवाळीपूर्वी अदा करण्यात यावे, अशी मागणी महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेच्या वतीने अर्थमंत्री अजित पवार यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

यासंदर्भात शुक्रवारी (ता.११) संघटनेच्या वतीने दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, भारतीय संस्कृतीत अत्यंत महत्त्वाचा मानला जाणारा दिवाळी हा सण यावर्षी दि.२९ ऑक्टोबर ते ३ नोव्हेंबर या कालावधीत सर्वत्र साजरा होत आहे. शासन मान्यता प्राप्त अनुदानित व अंशतः अनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधील शिक्षक कर्मचारी तसेच महाविद्यालयीन प्राध्यापक-शिक्षकेत्तर कर्मचारी यांना दिवाळी सण अत्यंत आनंदाने व समाधानकारकपणे साजरा करता यावा, त्यासाठी त्यांच्या हक्काचे ऑक्टोबर महिन्याचे वेतन दिवाळीपूर्वी म्हणजे २८ ऑक्टोबर पुर्वी करण्यात यावे. त्याचप्रमाणे शिक्षक कर्मचाऱ्यांची मागील थकीत वेतनाची देयके, वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीची देयके, सातव्या वेतन आयोगाच्या थकबाकीची उर्वरीत टप्प्यांची देयके इत्यादी हक्काची देयके दिवाळीपूर्वी अदा करण्यात यावीत.



यासाठी आवश्यक असलेला निधी राज्यातील वेतन पथक कार्यालयांना तात्काळ उपलब्ध करुन देण्यात यावा, अशी मागणी राज्याचे अर्थमंत्री अजित पवार यांच्याकडे करण्यात आल्याची माहिती महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेचे राज्य कार्याध्यक्ष उमाकांत कुलकर्णी यांनी दिली.

## आई राजा उदो, उदोऽऽऽ च्या जयघोषाने नळदुर्ग शहर दुमदुमले



**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१३ ऑक्टोबर -**

विजयादशमीनिमित्त आई राजा उदो, उदोच्या प्रचंड जयघोषात निघालेल्या अंबाबाईच्या पालखी मिरवणुकीनंतर नळदुर्ग येथे दि.१२ ऑक्टोबर रोजी नवरात्र महोत्सवाची मोठ्या उत्साहात सांगता झाली. यावेळी पालखी मिरवणुक सोहळ्यात हजारोंच्या संख्येने हिंदु बांधव सहभागी झाला होता. यामध्ये महिलांची संख्याही मोठी होती.

दि.१२ ऑक्टोबर रोजी विजयादशमीनिमित्त नळदुर्ग शहरात सायंकाळी सहा वाजता अंबाबाईची पालखितुन भव्य मिरवणुक काढण्यात आली. अंबाबाई मंदिर ते बसस्थानकच्या पाठीमागे असणाऱ्या पारंपारीक सिमोल्लंघन मैदानापर्यंत ही पालखी मिरवणुक काढण्यात आली. या मिरवणुकीत आ. राणाजगजितसिंह पाटील हे कांही काळ सहभागी होऊन पालखीला खांदा दिला होता त्याचबरोबर राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश कार्यकारीणी सदस्य अशोक जगदाळे हेही मिरवणुकीत सहभागी झाले होते. आई राजा उदो, उदोच्या जयघोषात निघालेल्या या भव्य पालखी मिरवणुकीत हिंदु बांधव मोठ्या संख्येने सहभागी झाला होता. नागरीक व युवकांनी डोक्यावर भगवी टोपी परीधान केल्याने शहरात सर्वत्र भगवेमय वातावरण निर्माण झाले होते. मिरवणुकीत सहभागी झालेल्या आराधी महिला हलगीच्या तालावर हातात पोत घेऊन अंगात येऊन नाचत होत्या. मिरवणुकीत सहभागी झालेल्या सर्व हिंदु बांधवाना नळदुर्ग शहर सकल हिंदु समाजाच्या वतीने भगव्या टोप्यांचे वाटप करण्यात आले.

त्याचबरोबर अनेक ठिकाणी मिरवणुकीत सहभागी झालेल्या नागरीकांना पिण्याचे पाणी व दुध तसेच ज्युसचे वाटप करण्यात आले.

## राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्ष गाव तिथे घोंगडी बैठक घेणार : राहुल बनसोडे

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.१३ ऑक्टोबर -**

परंडा विधानसभा निवडणुकीच्या तयारीसाठी शासकीय विश्रामगृहात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार सामाजिक न्याय्य विभागाची बैठक जिल्हाध्यक्ष राहुल बनसोडे यांच्या नेतृत्वाखाली संपन्न झाली.



माजी आमदार राहुल मोटे यांच्या मार्गदर्शनाखाली तालुक्यातील प्रत्येक गावात गाव तिथे घोंगडी बैठक आयोजित करण्यात येणार असून पक्ष्याची विचारधारा समजतील शेवटच्या घटकांपर्यंत पोहोच करून महाविकास आघाडीच्या उमेदवारास निवडून आणण्यासाठी प्रयत्न करावेत असे आवाहन जिल्हाध्यक्ष राहुल बनसोडे यांनी केले आहे.

यावेळी जिल्हा सरचिटणीस घनश्याम शिंदे, तालुकाध्यक्ष भाऊसाहेब ओव्हाळ, नागनाथ थोरात, विश्वास माने, राजेंद्र शिंदे, युवराज सोनवणे, संकेत कांबळे, दशरथ चाबुकस्वार, हरी साळवे, सोहेल बेग, युवराज भोसले, रत्नमाला निकाळजे, लक्ष्मी सरवदे, रमेश गायकवाड, बबन काळे बाळू चौधरी, हिरामण गायकवाड, अशोक जाधव, सचिन भोसले, राहुल केंगार, सुनील सुरवसे, राजाभाऊ डावरे, अजय बनसोडे, रुपेश बनसोडे, सिध्दार्थ वाघमारे, प्रतिक बनसोडे, अभिजित कांबळे, ऋषीकेश बनसोडे, अभिजित नलवडे, सौरभ बनसोडे यांच्यासह तालुक्यातील पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# 'विजयादशमी'च्या मुहूर्तावर नॅचरल शुगरच्या २३ व्या गळीत हंगामाचा बॉयलर अग्नि प्रदीपन

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.१३ ऑक्टोबर -**

नॅचरल शुगरच्या २३ व्या गळीत हंगामाचा बॉयलर अग्निप्रदीपन कारखान्याचे प्रवर्तक बालाजी शिंदे आणि त्यांच्या सुविद्य पत्नी अंजली शिंदे यांचे हस्ते विधीवत बॉयलरची पूजा करून आणि नॅचरल शुगरचे संस्थापक अध्यक्ष कृषिरत्न बी.बी. ठोंबरे यांचे अध्यक्षतेखाली 'विजयादशमी' चे शुभ मुहूर्तावर संपन्न झाला.

नॅचरल शुगरचे माध्यमातून या पंचक्रोशितील शेतकऱ्यांच्या आणि सर्वसामान्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी विविध उपक्रम उभारून शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्याचा अथक प्रयत्न यापूर्वी केला आहे आणि यापुढेही करतच राहणार असल्याचे नॅचरल शुगरचे संस्थापक अध्यक्ष कृषिरत्न बी.बी.ठोंबरे यांनी बॉयलर अग्निप्रदिपन वेळी उपस्थितांना सांगितले. नॅचरल शुगरचे माध्यमातून या पंचक्रोशितील शेतक-यांच्या आणि सर्वसामान्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी विविध उपक्रम उभारून शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्याचा अथक प्रयत्न बी.बी. ठोंबरे यांनी केला असल्याचे हभप. नारायण महाराज उत्रेश्वर पिंपरीकर यांनी सांगितले. प्रत्येक मानसाने जीवनात येवून आयुष्यभर कर्म करत रहायचे असते त्याचे फळ हे निश्चित मिळते व त्याचा लाभ सर्वसामान्यांसाठी होतो असेच कार्य बी.बी. ठोंबरे यांनी केल्याचे नारायण महाराजांनी सांगितले. तसेच साईबाबा पुण्यतिथी निमीत्त हभप. नारायण महाराज यांचे हरी किर्तन झाले.



महाराष्ट्रातील बऱ्याच कारखान्यांच्या गाळप क्षमतेमध्ये वाढ झालेली असल्याने, साखर कारखान्यांपुढील भविष्यकाळात भेडसावणाऱ्या ऊस टंचाईच्या समस्या आणि त्यावर उपाययोजना करून कांडी लागवडी बरोबरच ऊस रोप लागवड मोठया प्रमाणात करावी. ऊस रोप लागवडीचे अनेक फायदे आहेत. त्याचा ऊस उत्पादकांनी जास्तीत जास्त फायदा घ्यावा असेही बी.बी. ठोंबरे यांनी यावेळी सांगितले. बॉयलर अग्निप्रदीपन आणि हभप. नारायण महाराज उत्रेश्वर पिंप्रीकर यांचे हरी किर्तना नंतर प्रसाद वाटप करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

सदर कार्यक्रमास कारखान्याचे संचालक, प्रवर्तक, सभासद, शेतकरी व कर्मचारी उपस्थित होते.

# तुळजापूर, नळदुर्गचा कायापालट होणार, साथ द्या

## विजयादशमीच्या शुभमुहूर्तावर नवीन तहसीलचे भूमिपूजन; आमदार राणाजगजितसिंह पाटील यांचे आवाहन

**धाराशिव, दि.१३ ऑक्टोबर -**

तुळजापूर आणि नळदुर्ग शहर व परिसरात विकासाची गंगा येणार आहे. केंद्र सरकार आणि राज्यातील महायुती सरकारमुळे तुळजापूर तालुक्याचा प्रचंड वेगाने विकास होणार आहे. 'हा केवळ विकासाचा ट्रेलर आहे, पिक्चर अभी बाकी है', आपल्या सर्वांच्या सहकार्यानेच हे सर्व शक्य होणार असल्याचा विश्वास आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी व्यक्त केला आहे.

विजयादशमीच्या मुहूर्तावर तुळजापूर येथील तहसील कार्यालयाच्या नवीन तहसील इमारतीचे भूमिपूजन आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर नळदुर्ग येथे शासन निर्णयानुसार मंजूर झालेल्या अपर तहसील कार्यालयाचा शुभारंभही आमदार पाटील यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी बोलत होते.




तुळजापूर येथील कार्यक्रमात आमदार पाटील म्हणाले की, तीर्थक्षेत्र तुळजापूरला साजेशी भव्य नवीन तहसील इमारत निर्माण होणार आहे. त्यामुळे नागरी सेवा-सुविधा मिळणे अधिक सुलभ होणार आहे. उत्तम व वेगवान सुविधा आणि सेवेसाठी तालुक्यातील प्रशासकीय व्यवस्था मजबूत व्हावी, यासाठी आपण नेहमीच प्रयत्न केला आहे. त्यासाठी मोठा निधी उपलब्ध करण्यावर भर दिल्याने आपल्या मतदारसंघाची आदर्श आणि विकसित क्षेत्र म्हणून वाटचाल होत आहे.

नळदुर्ग येथील अपर तहसील कार्यालय शुभारंभप्रसंगी आमदार राणाजगजितसिंह पाटील म्हणाले की, नळदुर्गला अपर तहसील होणे फार गरजेचे होते. नळदुर्ग हा तालुका होण्याच्या दृष्टिने हे महत्वाचे पाऊल आहे.तहसीलदार संवर्गातील अधिकाऱ्यांची अतिरिक्त तहसीलदार उद्याच नेमणूक करण्यात येणार आहे.

नळदुर्ग, होर्टी येथे एमआयडीसी उभारून त्या ठिकाणी वेगवेगळे उद्योग आणून स्थानिकांच्या हाताला काम देण्यासाठी आपण प्रयत्न करीत आहोत. नळदुर्ग येथे कृषी उत्पन्न बाजार समिती होण्यासाठी जागा आरक्षित करण्यात आली आहे. त्यापुढील कार्यवाही देखील लवकरच पूर्ण केली जाणार आहे. शहराला स्वच्छ पाणी, २४ तास पाणी मिळणार आहे. एकंदरीत तुळजापूर आणि नळदुर्ग शहरांच्या विकासाबरोबर ग्रामीण भागाचाही विकास होण्यासाठी आपण महायुती सरकारला ताकदीने साथ देणे अपेक्षित असल्याचे आमदार पाटील म्हणाले.

यावेळी ज्येष्ठ कार्यकर्ते शफीभाई शेख यांनी, आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्यात विकासकामे करून दाखविण्याची धमक आहे. त्यांच्या नेतृत्वाखालीच नळदुर्ग हा तालुका व्हावा. तसेच तुळजापूर आणि नळदुर्ग दोन्ही शहरांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न करणारे आमदार पाटील यांच्या पाठीशी नळदुर्गची जनता कायम सोबत असेल, असा शब्द शेख यांनी दिला. यावेळी भाजपा, शिवसेना शिंदे गट व राष्ट्रवादी अजित पवार गटाचे स्थानिक पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ▸▸ संक्षिप्त वृत्त...



### गार भवानी मंदिर, शिक्षक सोसायटी येथे दसरा सिमोल्लंघन मोठ्या उत्साहाने साजरो

**धाराशिव, दि.१३ ऑक्टोबर -**

भाजपा नेते मा.आ. सुजितसिंह ठाकूरसाहेब यांच्या हस्ते गार भवानी, शिक्षक सोसायटी येथील भवानी मातेची आरती करून दसरा सिमोल्लंघन कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा झाला. यानंतर भारतीय जनता पार्टीचे विधानपरिषदेचे माजी आ.सुजितसिंह ठाकूर यांना महाराष्ट्र विधानपरिषद शतक महोत्सवी कार्यक्रमात भारताच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु यांच्या हस्ते विधानपरिषदेतील उत्कृष्ट भाषण पुरस्कार देण्यात आला त्याबद्दल शिक्षक सोसायटीच्या वतीने सत्कार करुन शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी दिपक थोरबोले, उमाकांत गोरे, गजानन तिवारी, उमेश थोरबोले, मुसळे आप्पा, रमेश थोरबोले, मनोहर पवार, धनंजय काळे तसेच शिक्षण सोसायटी येथील जेष्ठ मंडळी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित

### गायरान जमिनीवरील अतिक्रमणे कायम करुन नागरिकांना ८ 'अ' देण्याची मागणी

**कळंब, दि.१३ ऑक्टोबर -**

कळंब तालुक्यातील डिकसळ येथील गायराण जमीन सर्व्हे नं.(३०)मध्ये गेल्या (५०) वर्षांपासून अतिक्रमण करुन नागरीक वास्तव्य करत आहेत परंतु सदरील ठिकानचे ८ 'अ' अद्यापही नागरिकांना मिळाले नसल्याने बहुजन जनता पक्षाच्या वतीने पक्षाचे जिल्हाध्यक्ष विकास गायकवाड यांनी जिल्हाधिकारी यांना निवेदन देउन मागणी केली आहे. गायरान जमिनीचे व बेकायदेशीर गरीब अतिक्रमण धारकांचे सर्वेक्षण करून घरकुला पासून वंचित राहणाऱ्या कुटुंबांना सध्या वास्तव्य करीत असलेल्या ठिकाणच्या जागेचा ग्रामपंचायत स्तरावर अभिलेखात पक्की नोंद करुन ८'अ' देण्याकरीता संबंधितांना आदेशीत करावे अशी मागणी करण्यात आली आहे. सदरील प्रकरणी योग्य तो न्याय न मिळाल्यास आंदोलन केले जाईल असा इशारा देण्यात आला आहे. दिलेल्या निवेदनावर बहुजन जनता पक्षाचे जिल्हाध्यक्ष विकास शिवाजी गायकवाड यांची स्वाक्षरी आहे.

# तुळजापूर शुगरचा बॉयलर अग्नी प्रदीपन सोहळा संपन्न

**तभा वृत्तसेवा**

**धाराशिव, दि.१३ ऑक्टोबर -**

तुळजापूर शुगर प्रा. लि., काटी, ता. तुळजापूर, जि. धाराशिव येथील गूळ पावडर कारखान्याच्या २०२४-२०२५ चाचणी गळीत हंगामाचा बॉयलर अग्नी प्रदीपन सोहळा आज संपन्न झाला. कारखान्याचे चेअरमन डव्होकेट अनिल काळे यांनी कारखाना उभा करण्यासाठी स्वत:चा आणि आपल्या कुटुंबाचा संघर्ष सांगितला. साध्या शेतकरी कुटुंबातून उद्योजक बनण्यापर्यंतचा हा प्रवास किती संघर्षमय होता, याबाबत त्यांनी अनुभव कथन केले.

कारखाना नेहमीच शेतकऱ्यांच्या बाजूने उभा राहील, असेही त्यांनी यावेळी सांगितले. इंडियन गूळ मनुफाचूरिंग अससोसिएशनने ठरविल्याप्रमाणे उसाचा योग्य दर देण्यात येईल, तसेच संपूर्ण बिल दिवसांत शेतकऱ्यांच्या खात्यावर लवकरात लवकर जमा केले जाईल, याची ग्वाही त्यांनी दिली. ते स्वतः शेतकऱ्यांच्या संपर्कात राहून त्यांच्या सर्व अडचणींच्या प्रश्नांचे निराकरण करतील, असेही त्यांनी नमूद केले. तसेच शेताऱ्यांनी कमीतकमी खर्चात एकरी १०० टन उसाचे उत्पादन कसे घेता येईल यावरती लक्ष द्यावं जेणेकरून रिकव्हरी मध्ये मदत होईल असेही त्यांनी यावेळी सांगितले.

कृषी विज्ञान केंद्र, सोलापूर येथील वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. तांबडे यांनी ऊस लागवडीबाबत उपस्थित शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी ऊस लागवड कार्यशाळा घेण्याचे नियोजनही तुळजापूर शुगरसोबत असल्याचे सांगितले. गुरुवर्य मनुकाका बोधले महाराज व डव्होकेट लोमटे महाराज यांनी चेअरमन साहेबांचे अभिनंदन केले व त्यांना शुभेच्छा दिल्या.

सिद्धिविनायक समूहाचे दत्ताभाऊ कुलकर्णी यांनीही कारखान्याच्या टीमचे अभिनंदन केले आणि शुभेच्छा दिल्या. रुपामाता परिवाराचे प्रमुख तसेच इजमा अध्यक्ष व्यंकट गुंड यांनी गूळ पावडर कारखान्याच्या अडचणी आणि त्यावरील उपाययोजनांची माहिती दिली. तसेच शेतकऱ्यांनी उत्तम उत्पादन घेऊन आणि गुणवत्तेवर लक्ष केंद्रित करून कारखान्याच्या पाठीशी उभे राहावे, असे आवाहन केले. चेअरमन साहेबांच्या प्रवासाला त्यांनी उजाळा दिला. भाजपाचे जिल्हाध्यक्ष संताजी चालुक्य यांनी तुळजापूर शुगर युनिट २ च्या भूमि पूजनासाठी लवकरच बोलावण्यात येईल, असा विश्वास व्यक्त केला. या कार्यक्रमात सर्व मान्यवर, कर्मचारी व शेतकऱ्यांच्या उपस्थितीत बॉयलर अग्नी प्रदीपन समारंभ यशस्वीरीत्या पार पडला. यावेळी धनंजय शिंगाडे, विक्रम देशमुख, संतोष बोबडे, प्रभाकर मुळे, धनंजय रणदिवे, आदेश कोळी, राम गरड, राजेंद्र धाराशिवकार, मनोज घोगरे आदी मान्यवर उपस्थित होते.

### जीवनानुभव, आत्मानुभव असो वा परानुभव, जो त्याच्या काव्यातून प्रगल्भतेने मांडतो तो गझलकार : डॉ. श्रीकृष्ण राऊत

**तभा वृत्तसेवा**

**उमरगा, दि.१३ ऑक्टोबर -**

गझल हा वृत्तबद्ध काव्यप्रकार आता महाराष्ट्राला धमन्यातून वाहतो आहे. मूलतः इस्लामी साहित्याकडून भारतीय साहित्यास मिळालेली गझलेची ही भेट भारतीय साहित्यमृदेत अशा आत्मीयतेने रुजली आहे की आज ती आम्हाला आमचीच वाटायला लागली आहे. सौंदर्यासोबत जीवनानुभव, आत्मानुभव असो वा परानुभव, जो त्याच्या वृत्तबद्ध काव्यातून प्रगल्भतेने मांडतो तो गझलकार असे मत डॉ. श्रीकृष्ण राऊत यांनी 'गझलकार सीमोल्लंघन २०२४' या मराठी गझल वार्षिकांक प्रकाशन प्रसंगी व्यक्त केले. या अंकाचे ऑनलाईन प्रकाशन ८९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष मा. श्रीपाल सबनीस यांच्या हस्ते करण्यात आले. ऑनलाईन विशेषांक ही अभिनव संकल्पना पर्यावरणपूरक असून आजच्या पिढीला भावणारी आहे असे प्रतिपादन श्रीपाल सबनीस यांनी याप्रसंगी केले.

गझलकार सीमोल्लंघन-२०२४ च्या सर्वांगसुंदर अंकामध्ये धाराशिव जिल्ह्यातील गझलकार प्रा. विनोद देवरकर, बाळ पाटील, भागवत घेवारे, सुधाकर झिंगाडे, प्रा. विद्या देशमुख, स्नेहलता झरकर-अंदुरे, धनाजी जाधव व रमेश मंमाळे यांच्या गझला समाविष्ट केल्या गेल्या आहेत. याबद्दल सर्व स्तरातून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

### विभागस्तरीय बेस बॉल स्पर्धेत आरळी(बु)चा संघ लातुर विभागात द्वितीय



**तभा वृत्तसेवा**

**नळदुर्ग, दि.१३ ऑक्टोबर -**

विभागस्तरीय बेस बॉल स्पर्धेत जि.प .प्रशाला आरळी(बु) चा संघ लातुर विभागात द्वितीय क्रमांक पटकालिा आहे. क्रीडा मार्गदर्शक प्रकाश स्वामी यांच्या मार्गदर्शनाखाली संघाची यशस्वी घौडदौड सुरू नांदेड (दि.१०) नांदेड येथील पीपल्स कॉलेज च्या क्रीडांगणावर विभागस्तरीय बेसबॉल क्रीडा स्पर्धा दि. १० ते ११ ऑक्टोबर २०२४ दरम्यान पार पडल्या.

त्यामध्ये जिल्हा परिषद प्रशाला आरळी बुद्रुक येथील१४ वर्षे वयोगटातील विद्यार्थिनीच्या संघाने लातुर विभागात द्वितीय स्थान पटकावत प्रशाला आरळी बु.चे नाव विभागात गाजवले.

१४ वर्षे वयोगटातील मुलींनी नांदेड ग्रामीण संघाला सेमी फायनल मध्ये हरवत अंतिम सामन्यात धडक मारली व बेसबॉल क्रीडास्पर्धेच्या विभागस्तरीय अंतिम सामन्यात नांदेड शहरी संघाबरोबर लढत असताना पहिल्या डावात विजयश्री खेचून आणत आपणच विभागाचे विजेते होणार ही दावेदारी सिद्ध केली पण दुसऱ्या डावात नांदेड शहरीच्या मुलींनी पहिल्या डावातील पिछाडी दूर करत दुसऱ्या डावात विजय प्राप्त करत आरळी बु च्या संघाला द्वितीय स्थानावर समाधान मानण्यास भाग पाडले.

नांदेड शहरी संघाबरोबर अंतिम सामन्यात आरळी बु च्या संघाने दिलेली लढत अत्यन्त चुरशीची होती व जरी विभागात प्रथम येण्याचे स्वप्न भंगले तरी आरळी च्या विद्यार्थिनींचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

शाळेतील १४ वर्षे वयोगटातील मुलींना क्रीडा शिक्षक प्रकाश स्वामी व मुख्याध्यापक गौतम राठोड व शाळेतील सर्व शिक्षक वृंद यांचे अनमोल मार्गदर्शन लाभले.

या यशाबद्दल जिल्हा क्रीडा अधिकारी हरनाळे, शिक्षण अधिकारी (प्रा) अशोक पाटील, तुळजापूर तालुक्याचे गटविकास अधिकारी अमोल ताकभाते, गटशिक्षणाधिकारी इनामदार तसेच तालुका क्रीडा अधिकारी अक्षय बिरादार, तालुका क्रीडा स्पर्धा मुख्य समन्वयक इसाक पटेल, तालुका क्रीडा संयोजक राजेश बिलकुले, असोसिएशन पदाधिकारी अनिल धोत्रे, संदीप गंगणे, विष्णू दळवी यांनी विद्यार्थिनींचे अभिनंदन केले आहे.

तसेच आरळी बुद्रुक गावचे सरपंच किरण व्हरकट, उपसरपंच संजय पाटील तसेच सर्व ग्रा.पं.सदस्य, प्रशाला आरळी बु शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष मकरंद बामणकर, प्रा.शा.आरळी बु. व्यवस्थापन समिती अध्यक्ष रामेश्वर तानवडे, उपाध्यक्ष किरण गायकवाड आणि सर्व सदस्य, आरळी बु.गावातील सर्व पालक आणि नागरिक यांनी या सर्व विजेत्या विद्यार्थिनींचे कौतुक केले आहे.

संघातील खेळाडू-धनश्री भोसले, गौरी घोडके, आकांक्षा जाधव, अनुष्का बामनकर, भाग्यश्री शेळके, स्वराली तेलंग, आर्या घोडके, श्रावणी कचरे, वैष्णवी पारवे, पायल कचरे, दीपाली सोनवणे, आकांक्षा कचरे, स्वराली मातोळे, समीक्षा घोडके, प्रांजल पारवे, मुक्ता भोसले, संस्कृती दरेकर, आसावरी भोसले यांचा समावेश होता. यशस्वी विद्यार्थी व शिक्षकांचे ग्रामस्थांतून कौतुक केले जात आहे.



### प्रतिभा जगदाळे यांना पुरस्कार प्रदान

**तभा वृत्तसेवा**

**नळदुर्ग, दि.१३ ऑक्टोबर -**

कवितेला वाहिलेले, नानाविध आणि वैशिष्ट्यपूर्ण उपक्रमाने कार्यरत असलेले, अनेक थोर साहित्यिकांनी आवर्जून भेट दिलेले, हे कवितेचे घर. हे घर शेगाव (बु.), ता. वरोरा जि. चंद्रपूर येथे आहे. येथे राज्यस्तरीय बाल साहित्य संमेलनाचे आयोजन केले होते.

या कार्यक्रमात प्रतिभा जगदाळे यांच्या हसरी शाळा या बाल काव्यसंग्रहाला बाबुरावजी पेटकर बाल साहित्य पुरस्कार २०२४ हा उत्कृष्ट बालसाहित्याचा पुरस्कार प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार, साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त बाल साहित्यिक एकनाथ आव्हाड आणि ग्रंथाली प्रकाशनचे विश्वस्त सुदेश हिंगलासपुरकर यांच्या हस्ते देण्यात आला. यावेळी सुप्रसिद्ध चित्रकार पुंडलिक वझे, बाल कवयित्री सुमन नवलकर, ज्येष्ठ उद्योजक प्रकाशजी पद्मावार, साहित्यिक श्रीकांत पेटकर, किशोर पेटकर, प्रा. डॉ. प्रमोद नारायणे आणि मान्यवर मंडळी उपस्थित होती.

# लोहारा शहरासाठी समांतर पाणीपुरवठा योजनेचे काम मंजुर करुन, ग्रामस्थांना दिलेला शब्द पाळला : आ.ज्ञानराज चौगुले

**तभा वृत्तसेवा**

**नळदुर्ग, दि.१३ ऑक्टोबर -**

लोहारा शहरासाठी समांतर पाणीपुरवठा योजनेच्या कामाचासाठी ३४ कोटी रुपये निधी मंजुर करुन ग्रामस्थांना दिलेला शब्द पाळला आहे, असे प्रतिपादन आ. ज्ञानराज चौगुले यांनी केले. लोहारा तालुक्यातील माकणी निम्न तेरणा प्रल्पातुन महाराष्ट्र शासन सुवर्ण जयंती महाअभियान अंतर्गत लोहारा शहर समांतर पाणीपुरवठा योजनेच्या कामाचा भुमिपुजन शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात दि.११ ऑक्टोंबर २०२४ रोजी माजी खा.प्रा.रविंद्र गायकवाड व आ.ज्ञानराज चौगुले यांच्या हस्ते व युवा सेना मराठवाडा निरीक्षक किरण गायकवाड, जिल्हा प्रमुख मोहन पणुरे यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी खा. प्रा.रविंद्र गायकवाड़ होते. तर प्रमुख म्हणुन शिवसेना तालुका प्रमुख जगन्नाथ पाटील, नगराध्यक्षा वैशालीताई खराडे, उपनगराध्यक्ष आयुब हबीब शेख, ज्येष्ठ नेते नागण्णा वकील, भिमराव वरनाळे, गटनेत्या सारिका बंगले, पाणीपुरवठा सभापती शमाबी आयुब शेख, माजी गटनेते अभिमान खराडे, माजी सरपंच शंकर अण्णा जट्टे, शिवसेना नेते राजेंद्र माळी, नगरसेवक अमिन सुंबेकर, नगरसेविका कमल भरारे, नगरसेविका शामल माळी, नगरसेवक अविनाश माळी, नगरसेवक जालिंदर कोकणे, नगरसेवक गौस मोमिन, नगरसेविका सुमन रोडगे, नगरसेविका संगिता पाटील, नगरसेविका आरती कोरे,नगरसेविका आरती गिरी, नगरसेवक विजयकुमार ढगे, मेडिकल असोसिएशन तालुकाध्यक्ष प्रमोद बंगले, माजी नगरसेवक आयुब अब्दुल शेख, बाजार समिती माजी सभापती दयानंद गिरी, ओम कोरे, प्रताप लोभे, उपलुका प्रमुख परवेज तांबोळी, दिपक रोडगे, शहर प्रमुख श्रीकांत भरारे, के.डी. पाटील, नगरसेवक आरिफ खाणापुरे, विनोद मुसांडे, इंद्रजित लोमटे, अशोक माळी, प्राचार्य शहाजी जाधव, शंकरराव वकील, नयुम सवार, मारुती बंडगर, बाळु कांबळे, शम्मु भोंगळे, अदि उपस्थित होते. यावेळी आ.चौगुले पुढे बोलताथा म्हणाले कि, लोहारा शहरातील नागरिकांनी शहरासाठी कायमस्वरुपी पाणीपुरवठा योजना राबविण्यात यावी, अशी मागणी केली होती. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार महायुतीकडे पाठपुरावा करुन लोहारा तालुक्यातील माकणी निम्न तेरणा प्रकल्पातुन लोहारा शहरासाठी समांतर पाणीपुरवठा योजनेसाठी ३४ कोटी रुपये निधी मंजुर करुन घेऊन आज या कामाचा भुमिपुजन सोहळा संपन्न झाला आहे. आम्ही नुसते आश्वासन देत नसतो तर दिलेला शब्द पाळत असतो, आज तो शब्द पाळला. आम्ही ८० टक्के समाजकारण व २० टक्के राजकारण करीत असतो. आमच्याकडे कोणी काम घेऊन आले तर आम्ही त्याची जात, पात, पक्ष न बघता प्रत्येकांची अडचण सोडविण्याचे काम प्रमाणिकपणे केले आहे. लोहारा शहरासाठी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करुन विकास कामे करुन शहराला विकासाकडे नेण्याचे काम केले आहे. आम्ही सर्व समाजाला सोबत घेऊन विकास कामे मतदार संघात मोठ्या प्रमाणात केली आहेत. आम्ही विकास कामाला महत्व देत असतो, येणारी निवडणूक विकासाच्या जोरावर व तुमच्या सहकार्याने जिंकुन चौकार मारणार, असे आ.ज्ञानराज चौगुले यांनी सांगीतले. यावेळी माजी खा.प्रा. रविंद्र गायकवाड बोलताना म्हणाले कि, लोहारा शहरासाठी जास्तीत जास्त निधी देण्याचे काम आ. ज्ञानराज चौगुले यांनी केले आहे. पुढील काळातही शहराच्या विकासासाठी आम्ही कटीबध्द आहोत, असे प्रतिपादन केले. यावेळी शहरासाठी समांतर पाणीपुरवठा योजनेचे काम मंजुर केल्याबद्धल लोहारा नगरपंचायतीच्यावतीने माजी खा.प्रा. रविंद्र गायकवाड, आ.ज्ञानराज चौगुले, युवा नेते किरण गायकवाड यांचा जंगी सत्कार करुन ग्रामस्थांच्यावतीने आभार मानले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अभिमान खराडे व सुत्रसंचालन बालाजी मक्तेदार यांनी तर आभार गटनेत्या सारिका बंगले यांनी मानले. यावेळी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वसंतराव नाईक यांचे स्मारक राज्यातील सर्वात सुंदर स्मारक असेल : आ. राणाजगजितसिंह पाटील

## हरीत क्रांतीचे प्रणेते वसंतराव नाईक यांच्या स्मारकाचे भुमीपुजन; दिवंगत वसंतराव नाईक यांच्या विचारांचा हा खराखुरा सन्मान

**तभा वृत्तसेवा**

**नळदुर्ग, दि.१३ ऑक्टोबर -**

हरीत क्रांतिचे प्रणेते माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांचे स्मारक राज्यातील सर्वात चांगले आणि अभिमानास्पद असेल. यातून अनेकांना चिरंतन प्रेरणा मिळणार आहे. स्मारक अधिक समर्पक आणि भव्यदिव्य करण्यासाठी आपण जाणीवपुर्वक प्रयत्न केले आहेत. त्यासाठी महायुती सरकारनेही अडीच कोटींचा निधी मंजुर केला आहे. दिवंगत वसंतराव नाईक यांच्या विचारांचा हा खराखुरा सन्मान आहे. असल्याचे आमदार राणा जगजितसिंह पाटील यांनी म्हटले आहे.

नळदुर्ग येथील वसंतनगर येथे उभारण्यात येत असलेल्या दिवंगत वसंतराव नाईक यांच्या स्मारकाचे भूमिपूजन रविवारी आमदार राणा जगजितसिंह पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. राज्यातील बंजारा समाज बांधवांच्या बाबतीत महायुती सरकारने नेहमीच आस्था बाळगलेली आहे. यापुढेही त्यात तसुभर फरक पडणार नाही. आपल्या महायुती सरकारने आता राज्यातील तांड्यांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी व्यापक विकास आराखडा तयार करण्याचे नियोजन केले आहे. विकास आराखड्यानुसार सर्व तांड्यांचा सर्वांगीण विकास करण्याचे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवण्यात आले आहे. राज्यातील कृषी क्षेत्राला अभिमानास्पद आयाम देणाऱ्या हरीत क्रांतीचे प्रणेते राहिलेल्या वसंतराव नाईक यांच्या स्मारकाच्या कामापासुन या सर्वांगीण विकासाचा शुभारंभ होत असल्याचेही आमदार पाटील यांनी यावेळी नमुद केले.

विजयादशमीच्या शुभ मुहुर्तावर नाईक यांच्या स्मारकाचे आपल्या सर्वांच्या साक्षीने भुमिपुजन झाले आहे. यानिमित्ताने एकमेकांच्या अडचणी सोडविण्यासाठी आज आपण एकमेकांना शब्द देत आहोत. मात्र त्यासाठी सर्व बंजारा समाज बांधव आणि भगिनींनी आपल्या महायुतीच्या पाठीशी खंबीरपणे उभे रहायला हवे. नाईक यांच्या स्मारकाच्या माध्यमातून ही नवी सुरुवात आहे. पुढील काळात आपल्याला आणखी नवनवे टप्पे गाठायचे आहेत. आपल्या भागातील तरुणांना आपल्याला हक्काचा रोजगार उपलब्ध करुन द्यायचा आहे. नवनवे उद्योग आपल्या भागत आणण्यासाठी आपले प्रयत्न सुरू आहेत.

कौडगाव येथे एमआयडीसीच्या माध्यमातुन तांत्रिक वस्त्रोद्योग निर्मिती प्रकल्प उभारण्यात येत आहे. पायाभुत सुविधांसाठी पहिल्या टप्प्यात आपल्या सरकारने २४ कोटी रुपयांचा निधीही मंजूर केला आहे. याठिकाणी दहा हजार रोजगार निर्मिती




अपेक्षित आहे. तामलवाडी येथेही ३७० एकरावर एमआयडीसी साकारण्याचे काम सुरू आहे. तेथेही सोलापुर जिल्ह्यातील दीडशेहुन अधिक उद्योजक गुंतवणूक करण्यासाठी उत्सुक आहेत. त्यामुळे तामलवाडी एमआयडीसीत १२ हजार रोजगार निर्मितीचे आपले उद्दिष्ट आहे. हे सर्व एकट्या दुकट्याचे काम नाही. त्यासाठी आपल्या सर्वांचे पाठबळ आणि सहकार्य महत्वाचे असल्याचे आवाहनही आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी केले.

राज्यात १९७२ साली भयंकर दुष्काळ पडला होता. त्यावेळी राज्याचे मुख्यमंत्री वसंतराव नाईक हे होते. त्यावेळी ते स्वतः नळदुर्ग येथे आले होते. त्यांच्या पदस्पर्शामुळे वसंतनगराचा हा परीसर पावन झालेला आहे. या पावन भुमीवर वसंतराव नाईक यांचे स्मारक असावे अशी बंजारा समाज बांधवांची मागील अनेक वर्षापासूनची मागणी होती. आपल्या माध्यमातून या मागणीला मुर्त रूप येत आहे.वसंतराव नाईक यांचे स्मारक साकारण्याची संधी आपल्याला लाभली हे आपले भाग्य असल्याचेही आमदार पाटील यांनी यावेळी म्हटले.

यावेळी भाजपाचे विशेष निमंत्रित प्रदेश कार्यकारणी सदस्य विद्यानंद राठोड व त्यांच्या टीमने वसंतराव नाईक यांच्या स्मारकासाठी परीश्रम घेतल्याने त्यांचे टाळ्या वाजवुन स्वागत करण्यात आले. तर संत सेवालाल महाराज तांडा समृद्धी योजनेचे धाराशिव जिल्हा अशासकीय सदस्य प्राचार्य संतोष चव्हाण व विलास राठोड यांनी आमदार राणा जगजितसिंह पाटील यांना तांडा समृद्धी योजनेचा विकास आराखडा सादर केला.

यावेळी तुळजापुर तालुका बंजारा बांधवांच्या वतीने व वसंतराव नाईक स्मारक समितीच्या वतीने आमदार पाटील यांचा जंगी सत्कार करण्यात आला. तर शासनाच्या संत सेवालाल बंजारा तांडा समृद्धी योजना नागपुर विदर्भ कमीटीवर अशासकीय सदस्यपदी प्रविण पवार यांची निवड झाल्याबद्दल आमदार पाटील यांनी सन्मान केला.

याप्रसंगी भाजपाचे विशेष निमंत्रित प्रदेश कार्यकारणी सदस्य विद्यानंद राठोड, भाजपा तालुकाध्यक्ष संतोष बोबडे, प्रदेश कार्यकारिणी सदस्य सतीश दंडनाईक, सुशांत भुमकर, किसान मोर्चाचे रामदास कोळगे, माजी जि.प.सदस्य गणेश सोनटक्के, कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक सिध्देश्वर कोरे, ताराबाई पवार, प्रशांत लोमटे, साहेबराव घुगे, अप्पू जेवळे, विवेकानंद मेलगिरी, भिवा इंगोले, युवराज पाटील, धिमाजी घुगे, श्रमिक पोतदार,पद्माकर घोडके, नगरपरिषदेचे माजी नगरसेवक निरंजन राठोड ,छमाबाई राठोड , आनिल पवार, शिवाजी चव्हाण शिंगोली यांची प्रमुख उपस्थितीत होती.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी निरंजन राठोड, प्रवीण पवार, विलास राठोड, दामाजी राठोड, महेश चव्हाण यांनी परीश्रम घेतले.

# जिल्हा रूग्णालय किंवा इतर ठिकाणी रेफर न करता स्थानिक रूग्णालयातच शस्त्रक्रिया होणार

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१३ ऑक्टोबर**

रुग्णालयात रुग्णांची तपासणी करून रोगाचे निदान झाल्यानंतर करण्यात येणाऱ्या शस्त्रक्रिया या स्थानिक रुग्णालयातच करण्यात याव्यात. रुग्णांना जिल्हा रुग्णालय किंवा इतर रुग्णालयात रेफर करू नये असे आदेश बीड जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अशोक थोरात यांनी काढले असून मोबाईल व्हॅन नंतर त्यांनी दुसरा चांगला निर्णय घेतला आहे. यामुळे सर्वांकडून समाधान व्यक्त करण्यात येत आहे.



जिल्हाभरातील कुठल्याही आरोग्य संस्थांमध्ये तपासणी करिता येणाऱ्या रुग्णांची तपासणी केल्यानंतर निदान होऊन मोठ्या किंवा दुर्बिणीतून करण्यात येणाऱ्या शस्त्रक्रियेची आवश्यकता असल्यास रुग्णांना जिल्हास्तरावर किंवा इतरत्र रेफर न करता संबंधित रुग्णांना स्थानिक आरोग्य संस्थेमध्येच शस्त्रक्रिया करण्याचे आदेश देण्यात आले आहेत, आरोग्य संस्थेतील शस्त्रक्रियागृह पूर्ण क्षमतेने कार्यान्वित आहे अशा उपजिल्हा अथवा ग्रामीण रुग्णालयांमध्ये सदरील शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे. सदर शस्त्रक्रिया करण्यासाठी नियोजन करण्यात आले आहे. महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या मंगळवारी उपजिल्हा रुग्णालय गेवराई आणि ग्रामीण रुग्णालय माजलगाव येथे मेजर कॅम्प तर दुर्बिणीद्वारे शस्त्रक्रिया ग्रामीण रुग्णालय तालखेड आणि तेलगाव येथे करण्यात येतील. प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या मंगळवारी उपजिल्हा रुग्णालय केज आणि ग्रामीण रुग्णालय धारूर येथे मेजर कॅम्प तर ग्रामीण रुग्णालय नांदुर घाट आणि चिंचवन येथे दुर्बिणीद्वारे शस्त्रक्रिया करण्यात येईल. महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या शुक्रवारी ग्रामीण रुग्णालय पाटोदा आणि आष्टी येथे मेजर कॅम्प तर ग्रामीण रुग्णालय रायमोहा येथे दुर्बिणीद्वारे शस्त्रक्रिया करण्यात येईल. दुसऱ्या व चौथ्या शुक्रवारी लोखंडी सावरगाव उपजिल्हा रुग्णालय परळी वैजनाथ आणि स्त्री रुग्णालय येथे मेजर कॅम्प तर ग्रामीण रुग्णालय धानोरा बुद्रुक येथे दुर्बिणीद्वारे शस्त्रक्रिया करण्यात येतील.या अनुषंगाने महिन्यातील प्रत्येक मंगळवार व शुक्रवारी स्थानिक शासकीय रुग्णालयासमोर दर्शविलेल्या दिवशी तपासणी करून शस्त्रक्रियेसाठी तयार असलेल्या रुग्णांना संबंधित दिवशी आरोग्य संस्थेत येण्याबाबत सूचित करणे तसेच आरोग्य संस्थेत शस्त्रक्रिया होत आहेत, हे येणाऱ्या रुग्णांना माहिती व्हावी याकरिता रुग्णालयाच्या दर्शनी भागात सूचना फलक लावावे. जेणेकरून जास्तीत जास्त रुग्णांना याचा लाभ घेता येईल. अशी सूचनाही बीड जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.अशोक थोरात यांनी दिली आहे.

# बीड रेल्वे स्थानकास भारतरत्न डॉ. बाबासाहेबांच्या नावासाठी माजी सैनिक अनुरथ वीर यांचे तीव्र उपोषण

## प्रशासनानी दखल घ्यावी – राजेंद्र मस्के

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१३ ऑक्टोबर**




अहिल्यानगर – बीड – परळी रेल्वे मार्गावरील बीड रेल्वे स्थानकास भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्यासाठी माजी सैनिक अनुरथ सोपान वीर यांचे गेली चार दिवसापासून जिल्हाधिकारी कार्यालया समोर तीव्र अन्नत्याग उपोषण चालू असून, त्यांनी जलत्यागही सुरु केला आहे. प्रशासनाने या आंदोलनाची तातडीने दखल घ्यावी. वीर यांना ठोस आश्वासन देऊन, उपोषण मागे घेण्यासाठी तातडीने प्रयत्न करावे असे आवाहन भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी केले आहे.

# मुख्यमंत्री ग्रामसडक संशोधन योजने अंतर्गत ४० किमी सिमेंट रस्त्याला ६५ कोटी रुपयाचा निधी मंजुर

## आ.लक्ष्मण पवारांच्या प्रयत्नाला यश ; ग्रामीण भागात थिन व्हाईट टॉपिंगचा राज्यातील पहिलाच प्रयोग

**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.१३ ऑक्टोबर**

गेवराई विधानसभा मतदार संघाचे आ.लक्ष्मण पवार यांच्या पाठपुराव्यामुळे मुख्यमंत्री ग्रामसडक योजना संशोधन व विकास अंतर्गत तालुक्यातील ७ गावच्या एकूण ४० कीमी रस्त्यासाठी थिन व्हाईट टॉपिंग नुसार ६५ कोटी रुपयांचा निधीला १८ जुलै २०२४ रोजी च्या शासन निर्णयानुसार मंजुरी देण्यात आली असून हे सर्व रस्ते सिमेंट कॉंक्रीटने होणार असून ग्रामीण भागातील रस्त्यासाठी होणारा हा महाराष्ट्रातील पहिलाच प्रयोग असून संबधित गावच्या रस्त्याचा प्रश्न कायमचा मार्गी लागणार आहे.

आ. लक्षण पवार यांच्या माध्यमातून तालुक्यातील ग्रामीण भागातील जवळपास सर्वच रस्त्याचे प्रश्न मार्गी लागले असून राहिलेल्या आणखी सात गावच्या ४० किमी रस्त्यासाठी पुन्हा ६५ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असून हे सर्व रस्ते पूर्ण सिमेंट कॉक्रीटीकरण होणार असून लवकरच या रस्त्याच्या कामाला सुरुवात होणार आहे. यामध्ये तलवाडा रोड ते रेवकी-देवकी व गोंदी या १२.२० किमी रस्त्यासाठी २७ कोटी रुपये, रामपुरी ते ढालेगाव या ४.७० किमी रस्ता ७ कोटी ४४ लक्ष रुपये, सुर्डी फाटा ते सेलू ३.५०.किमी रस्ता ५ कोटी २४ लक्ष रुपये, लोणाला फाटा ते खेर्डावाडी- सिंदफना चिंचोली ४.६० किमी रस्त्याला ६ कोटी ६८ लक्ष रुपये, जातेगाव रोड ते मुधापुरी ५.६१ किमी रस्त्याला ७ कोटी ९१ लक्ष रुपये, राष्ट्रीय महामार्ग (सावरगाव) ते चिखली ४.२० किमी रस्त्याला ६ कोटी २८ लक्ष रुपये, चकलांबा रोड ते ब्रम्हगाव ३.१० किमी रस्त्याला ४ कोटी ३९ लक्ष रुपये असा एकूण ४० किमी रस्त्यासाठी ६५ कोटी रुपयांच्या निधीला १८ जुलै २०२४ रोजी च्या शासन निर्णयानुसार मंजुरी देण्यात आली असून हे सर्व रस्ते थिन व्हाईट टॉपिंग नुसार पूर्णपणे सिमेंट कॉक्रीटीकरनाणे पूर्ण होणार आसून ग्रामीण भागातील रस्त्यासाठी हा महाराष्ट्रातील पहिला प्रयोग असून यामुळे हे रस्ते वर्षानुवर्षे टिकून राहतील असे सांगण्यात आले. दरम्यान येत्या दोन दिवसात या सर्व रस्ता कामाचे उदघाटन होणार आसून लवकरच या कामाला सुरुवात होणार असल्याचे आ.लक्ष्मण पवार यांच्या कार्यालयाकडून कळवण्यात आले आहे.



# बिना पुतळ्याचे शहर म्हणून ओळख असलेल्या अंबाजोगाई शहरानजीकच्या मोरेवाडी चौकात अखेर छत्रपती संभाजी राजेंचा पुतळा बसला

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.१३ ऑक्टोबर**

बिना पुतळ्याचे शहर म्हणून ज्या अंबाजोगाई शहराची देशाच्या नकाशावर नोंद होती त्या अंबाजोगाई शहरानजीकच्या मोरेवाडी चौकात अखेर विजया दशमीच्या शुभमुहूर्तावर छत्रपती संभाजी राजेंचा पुतळा रातो रात बसवल्या गेला आहे.

सुसंस्कृत व शांतताप्रिय शहर म्हणून ज्या अंबाजोगाई शहराची देशभरात ओळख निर्माण झालेली होती त्या शांतताप्रिय शब्दा मागे कारण होते की शहरात एकाही महापुरुषांचा पुतळा नाही आणि पुतळ्याच्या कारणा मुळे ज्या अन्य शहरात जातीय दंगली होतात त्या कधीच जातीय दंगली अंबाजोगाई शहरात घडल्याचा इतिहास नाही, त्यामुळे पुतळ्याच्या बंदोबस्ताचा पोलिसांवर कधी ताण येण्याचे कारणही घडले नाही. सर्व जाती धर्माचे लोक या ठिकाणी गुण्या गोविंदाने राहतात त्यामुळे बिना पुतळ्याचे शहर म्हणून देशभरात अंबाजोगाईची नोंद झाली होती.

मात्र अंबाजोगाई शहराची व्याप्ती दिवसेंदिवस वाढते आहे, शहरा नजीकची मोरेवाडी, शेपवाडी, चनई, जोगाईवाडी ही गावे आज शहरात मोडू लागली आहेत आणि याच मोरेवाडी मधून लातूर, बीड कडे जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्गावरील पाण्याच्या टाकी नजीकच्या नव्याने बनवल्या गेलेल्या छत्रपती संभाजीराजे चौकात या परिसरातील युवकांनी विजया दशमीच्या शुभमुहूर्तावर छत्रपती संभाजी महाराज यांचा भव्य पुतळा उभा केला असुन रातो रात उभा झालेला हा पुतळा पाहून सर्वत्र एकच विषय चर्चिल्या जात आहे.



# स्थिर राजकीय नेतृत्व विकासासाठी गरजेचे–आमदार प्रकाश सोळंके

## साठ कोटी रूपायाच्या सुर्डीते सादोळा रस्ते कामाचे उद्घाटन

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.१३ ऑक्टोबर**

माजलगाव मतदार संघात आतापर्यंत मतदारांनी मला चार वेळा आमदार म्हणून निवडून दिले असून मतदार संघाचे स्थिर राजकीय नेतृत्वचं विकासासाठी गरजेचे असते २०१४ ते १९ दरम्यान चुकीचा आमदार निवडल्यामुळे पश्चताप करण्याची वेळ असे मत आमदार प्रकाश सोळंके यांनी दि.१३ रविवार रोजी सुर्डी ते सादोळा ६० कोटी ४० लाख रुपयांच्या हायब्रीड म्यूनिटी हॅम अंतर्गत सूर्डी ते सादोळा सिमेंट कॉंक्रिट रस्ता १३ किमी रस्त्याचा शुभारंभ सोहळ्या प्रसंगी व्यक्त केले.

यावेळी व्यासपीठावर बाबूराव पोटभरे,जयसिंह सोळंके, सभापती जयदत्त नरवडे,श्रीहरि मोरे, संभाजी शेजूळ, भागवत खुळे,डॉ.वसीम मनसबदार,नवनाथ धाईजे,सरपंच अजय शिंदे आदी उपस्थित होते पुढे बोलतांना प्रकाश सोळंके म्हणाले की,लोणी सावंगी उपसा सिंचन योजना आणून योजनेचे काम आज रोजी ९० टक्के पूर्ण झाले




आहे.त्यामुळे धरणात ३०० एमएम क्यूब पाणी येणार असल्यामुळे हजारो हेक्टर जमीन सिंचनाखाली येणार आहे त्यामुळे येथील पाणी प्रश्न कायमचा मिटणार आहे. तसेच पैठण ते माजलगाव उजव्या कालव्याची क्षमता ७०० ते ८०० क्युसेस असून त्यासाठी ५३५ कोटी रु.मंजूर करण्यात आला. त्यामुळे धरण भरण्यासाठी कालव्याचा उपयोग होईल. व शेतकऱ्यांना शेतीसाठी व पिण्यास मुबलक पाणी मिळेल. मतदार संघात पिण्याच्या पाण्यासाठी ५०० कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. तर २०० ते २५० कोटी रुपयांचा निधी मतदार संघात रस्त्यासाठी आणला आहे.असे सांगून ते म्हणाले की सुजाण नागरिक निवडणुकीत कायापालट करु शकतो.मतदानाचा पवित्र अधिकार बाबासाहेबांनी करून दिलेला आहे म्हणूनच लोकशाही देशात टिकून आहे.योग्य माणसांची निवड केली तर पश्चातापाची वेळ येत नाही. तसेच निवडणुक काळात भविष्य अबाधित राहावं यासाठी आपण मतदान करावं.

### या निवडणुकीतही मी प्रकाश दादा सोबत– बाबूराव पोटभरे

आमदार प्रकाश सोळंके हे विकास पुरुष असून त्यांनी आपल्या कार्यकाळात विविध विकास कामे करून मतदारसंघाचा कायापालट केला आहे. आगामी होऊ घातलेल्या निवडणुकीत मी त्यांच्या सोबतच आहे असे बाबुराव पोटभरे यांनी बोलताना व्यक केले.

### नरवडे सारख्या प्रामाणिक कार्यकर्त्यांची गरज

नरवडे सारख्या प्रामाणिक कार्यकर्ते मिळण्यासाठी नशीब लागते त्यामुळेच त्याप्रमाणे कुणामुळेच मी त्यांना अनेक संधी दिली आहेत यापुढेसंधी देण्यात येईल

# पक्षाने संधी दिल्यास आपण परळी विधानसभा मतदार संघातून निवडणूक लढवण्यास तयार आहोत: अभिजीत देशमुख

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.१३ ऑक्टोबर**

पक्षाने संधी दिल्यास परळी विधानसभा मतदार संघातून महाविकास आघाडीकडून निवडणूक लढवण्यास आपण तयार आहोत अशी माहिती राष्ट्रवादी कॉंग्रेस (शरद पवार गट) चे युवक नेते व पक्षाच्या युवा आघाडीचे माजी प्रदेश सरचिटणीस अभिजीत उत्तमराव देशमुख तसेच महाराष्ट्रा शेतकरी शुगर, ली (सायखेडा). आत्ताचा- २१ शुगर, यूनिट-२ चे संस्थापक अध्यक्ष यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

देशमुख यांच्या गणेशपार भागातील विठाई निवास ह्या त्यांच्या निवासस्थानी शुक्रवारी (दि. ११) ही पत्रकार परिषद झाली. श्री देशमुख म्हणाले, परळीच्या राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, धार्मिक अशा विविध क्षेत्रात माझे काका माजी नगराध्यक्ष कै. एन. के. देशमुख (मालक) यांनी उल्लेखनिय कार्य केले आहे. परळी पालिकेचे अध्यक्ष असताना त्यांनी शहराच्या सर्वांगिण विकासासाठी विविध विकास योजना कार्यान्वित केल्या, शासन दरबारी आपले संबंध वापरून त्यांनी शहराच्या विकासासाठी निधी खेचून आणला, परळीचा सर्वांगिण विकास करण्यात कै. एन. के. देशमुख (मालक) यांचा सिंहाचा वाटा आहे. त्यांनी परळी शहराच्या विकासासाठी केलेले कार्य परळीकर कधीही विसरू शकनार नाही. कै.एन. के. देशमुख मालकांचा वारसा पुढे चालवण्यासाठी श्री अभिजीत देशमुख यांनी परळीच्या सामाजिक, राजकीय क्षेत्रात सक्रीय होण्याचा निर्णय घेतला आणी गेल्या दोन दशकांपासून परळीच्या व्यापार उद्योग क्षेत्रात कार्यरत असलेले अभिजीत देशमुख यांनी परळी परिसरातील सायखेडा (ता. सोनपेठ) येथे महाराष्ट्र शेतकरी शुगर या साखर कारखान्याची उभारणी केली. हा कारखाना अखंडपणे सुरू रहावा, शेतकऱ्यांचे हित साधले जावे म्हणून हा कारखाना हस्तांतरित केला.



आगामी परळी विधानसभेची निवडणूक लढवण्यासाठी आपण इच्छूक आहोत, इतर इच्छुक उमेदवारांबरोबरच आपलीही पक्षाने दखल घेवून मुलाखतीसाठी आपल्याला मुंबईत पक्ष कार्यालयात बोलावून घेतले होते. या निवडणुकीसाठी आपण इच्छूक असून पक्षाने संधी दिल्यास आपण ही निवडणूक लढवण्यास तयार आहोत असे श्री अभिजीत देशमुख यांनी यावेळी सांगितले.

दरम्यान, परळी विधानसभेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष मा. श्री. शरदचंद्र पवार साहेब, आमदार रोहितदादा पवार, मा.ना. श्री. बजरंग बप्पा सोनवणे मा. श्री. मेहबूब शेख युवक अध्यक्ष राष्ट्रवादि प्रदेश कॉंग्रेस शरतचंद्र पवार. यांच्यासोबत आपली चर्चाही झाली असल्याचे अभिजीत देशमुख यांनी सांगितले. परळी-तील व परळी मतदार संघातील सामाजिक, राजकीय विषयावर मा. शरदचंद्र पवार साहेब व रोहितदादा पवार यांनी आपल्याबरोबर चर्चा केल्याचे श्री देशमुख म्हणाले. येणाऱ्या काळात मला जे काही शक्य होईल तेवढे काम मी परळी वैजनाथ मतदार संघातील माझ्या मायबाप जनते साठी करेल. असे देशमुख म्हणाले.

# गोकुळ शिशुवाटिकेत भारतरत्न नानाजी देशमुख यांची जयंती साजरी

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१३ ऑक्टोबर**

दीनदयाल शोध संस्थान संचलित, गोकुळ शिशुवाटिका येथे भारतरत्न नानाजी देशमुख जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. सर्वप्रथम भारतरत्न नानाजी देशमुख यांच्या प्रतिमेस मान्यवरांच्या हस्ते



पुष्पहार अर्पण करून प्रमुख पाहुणे संतोष बबनराव धापसे सर व अध्यक्ष सौ. अर्चनाताई मोराळे व गोकुळ शिशू वाटिका प्रमुख सौ. स्नेहलताई देशपांडे यांनी दीप प्रज्वलन केले. कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून ध्रुवगटाचे पालक संतोष बबनराव धापसे सर हे लाभले यांनी मुलांना नानाजींच्या स्वाभिमान,व्यक्तिमत्व व समाजसेवा हे सांगून त्यांनी नानाजी देशमुख यांची प्रतिकृती आमच्या डोळ्यासमोर उभी केली. त्यानंतर प्रल्हाद गटातील सम्राज्ञी सुपेकर, सई सावरे,अथर्व गुळवे आणि ध्रुव गटातील स्वरांजली तकिक, वैभवी धापसे,साची पवार यांनी सुंदर असे भाषणे केली. त्यानंतर नानाजी देशमुख जयंती निमित्ताने गणेशोत्सवात घेण्यात आलेल्या स्पर्धांचे बक्षीस वितरण करण्यात आले. व नानाजी देशमुख विद्यामंदिरातील प्रभारी मुख्याध्यापिका सौ. अर्चनाताई मोराळे यांनी भारतरत्न नानाजी देशमुख यांची माहिती सांगून अध्यक्षीय समारोप केला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. मधुराताई गुळवेलकर यांनी केले. या कार्यक्रमासाठी डॉ. सीमाताई जोशी, अर्चनाताई तुंगार, सुनंदाताई कुलकर्णी व गंगाधरजी देशमुख सर यांचे मार्गदर्शन लाभले. व कार्यक्रमाचा शेवट 'नमो मातृभूमी' या प्रार्थनेने झाला.अशा पद्धतीने कार्यक्रम यशस्वीपणे पार पडला.

# धारूरमध्ये मोकाट कुत्र्यांचा सुळसुळाट

## नगरपरिषद मुख्याधिकारी गायकवाड यांना निवेदन दिले; कुत्र्यांच्या समस्येच्या उपाययोजनेसाठी आंबेजोगाई नगरपरिषद टीम बोलावण्याचे आश्वासन

**तभा वृत्तसेवा**
**किल्लेधारूर दि.१३ ऑक्टोबर**

डोंगरवेस धारूर येथील रहिवाशांनी ११ ऑक्टोबर रोजी नगरपरिषद किल्ले धारूर येथे मुख्याधिकारी गायकवाड यांना निवेदन दिले.मोकाट कुत्र्यांचा सुळसुळाट असल्याने लहान मुले, वयोवृद्ध व्यक्ती आणि शाळेतील विद्यार्थी या कुत्र्यांच्या सतत पाठलागामुळे भितीत आहेत.

अर्जदार शेख कलीम जलील व इतर रहिवाश्यांनी यांच्या मते, मोकाट कुत्रे त्यांच्या गल्लीतून सतत फिरत असून, त्यामुळे स्थानिकांना अत्यंत असुविधा अनुभवावी लागते. अनेकदा लहान मुले आणि वयोवृद्ध व्यक्ती कुत्र्यांच्या पाठलागामुळे भीतीने घराबाहेर जाऊ शकत नाहीत, असे अर्जदारांनी स्पष्ट केले.

अर्जदारांनी मुख्याधिका-यांसमोर विचारले की, कुत्र्यांचा बंदोबस्त करण्यात येणार का? यावर मुख्याधिकारी गायकवाड यांनी निवेदन स्वीकार दिलेनंतर सांगितले की धारूरमध्ये कुत्र्यांसंबंधी कोणतीही टीम उपलब्ध नाही, त्यामुळे अडचण निर्माण होत आहे. त्यांनी आश्वासन दिले की लवकरात लवकर आंबेजोगाई नगरपरिषद येथील टीम बोलावून मोकट कुत्र्यांची नसबंदी करण्यात येईल.याशिवाय, ग्रामीण रुग्णालय किल्ले धारूरमध्ये कुत्रा चावलास इंजेक्शन उपलब्ध नसल्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

# लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखान्यात बॉयलर अग्नी प्रदिपन समारंभ

**तभा वृत्तसेवा**
**किल्लेधारूर दि.१३ ऑक्टोबर**

सुंदरनगर, तेलगाव येथील लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखाना लिमिटेडमध्ये १२ ऑक्टोबर रोजी बॉयलर अग्नी प्रदिपन समारंभ पार पडला. या समारंभात ह.भ.प. एकनाथ महाराज माने यांच्या हस्ते अग्नी प्रदिपन साधला गेला. या कार्यक्रमामध्ये कारखान्याचे कार्य, गाळप क्षमता आणि शेतकऱ्यांच्या आर्थिक समृद्धीवर भाष्य करण्यात आले.

समारंभात उपस्थित असलेले प्रकाश सोळंके यांनी सांगितले की, कारखान्याने आपल्या गाळप क्षमतेनुसार हंगामाच्या काळात उसाचे गाळप करण्याचे काटेकोरपणे नियोजन केले आहे.

यावेळी त्यांनी यावर विशेष जोर दिला की, ऊस कमी असो की जास्त, ३२ वर्षांच्या कार्यकाळात कारखान्याने एकही गाळप हंगाम बंद ठेवला नाही. यामुळे शेतकऱ्यांना अडचणी न जाणवता कारखाना सुरळीतपणे चालला आहे, याचा आनंद व्यक्त केला.

सोळंके यांनी पुढे स्पष्ट केले की, कारखान्याच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या जीवनात आर्थिक समृद्धीचा प्रकाश पडावा हीच भावना आजवर उराशी बाळगली आहे. त्यांच्या मते, तुमच्या सर्वांच्या विश्वासावरच कारखाना तग धरून आहे.

यावेळी, शेतकऱ्यांना आवाहन करण्यात आले की, हा गाळप हंगाम असलेली कसोटी आहे आणि आपण सर्वांनी जसा पूर्वी कारखान्यास सहकार्य केले, तसेच



पुढेही सहकार्य करत राहावे. लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखान्याची स्थापना शेतकऱ्यांची आर्थिक स्थिरता आणि विकास साधण्यासाठी करण्यात आली होती. या कारखान्याचे महत्त्व म्हणजे त्या क्षेत्रातील शेतकऱ्यांना उत्पादनाची सुरक्षितता आणि आधार मिळवणे.

CMYK

लातूर दिनांक

लातूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केल

## स्वरक्षणासाठी मुलींनी खंबीर, कणखर व्हावे : विजया भुसारे

**तभा वृत्तसेवा,**
**अहमदपूर, दि. १३ ऑक्टोबर-**

महाराष्ट्रासह देशांमध्ये महिला असुरक्षित असून कलकत्ता सारख्या बलात्कार प्रकरणाला समर्थपणे तोंड देण्यासाठी सर्व मुलींनी अगदी बालवयातच स्वरक्षणासाठी खंबीर व कणखर व्हावे, असे प्रतिपादन इनरव्हील क्लबच्या अध्यक्षा विजया भुसारे यांनी केले.

संत ज्ञानेश्वर विद्यालयात नवरात्र म होत्सवाच्या निमित्ताने इनरव्हील क्लबच्या वतीने आयोजित कराटे प्रशिक्षणात व्यक्तिमत्व विकास आणि मुलींचे स्व रक्षण याविषयी प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका आशा रोडगे, मुख्याध्यापक मीना तोवर,कराटे प्रशिक्षक यशवंत मेकले, रेखा बालुरे यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती होती. यावेळी कराटे प्रशिक्षक यशवंत मेकले म्हणाले की, मुलींच्या स्वरक्षणासाठी कराटे हा प्रकार योग्य असून त्यातून मुलींचा आत्मविश्वास वाढतो. कलकत्ता प्रकरणाची पुनरावृत्ती होऊ नये. मुलींच्या अंगावर पाच-सहा मुले जरी आले आणि मुलगी कराटे प्रशिक्षक असेल तर ती समर्थपणे तोंड देऊ शकते म्हणून मुलींनी कराटे प्रशिक्षण घ्यावे असे सांगून त्यांनी कराटेचे प्रात्यक्षिक करून दाखविले. प्रास्ताविक इनरव्हील क्लब च्या सचिव रेखा बालूरे यांनी केले. सूत्रसंचालन सतीश साबणे यांनी तर आभार मीना तोवर यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.



### संक्षिप्त वृत्त



## केळगाव सोसायटीच्या वतीने सभासदारांना मोफत साखर वाटप

**निलंगा, दि. १३ ऑक्टोबर-**

तालुक्यातील केळगाव येथील विविध कार्यकारी सोसायटीच्या वतीने दिवाळी व दुसऱ्याच्या सणासाठी आज दसऱ्याच्या शुभ मुहूर्तावर एका सभासदाला पाच किलो या प्रमाणे मोफत साखरेचे वाटप करण्याचा शुभारंभ करण्यात आला. सोसायटीचे सचिव शिवाजीराव चव्हाण यांच्या वतीने नारळ फोडून हा श्री गणेशा करण्यात आला. एकूण ३७६ सभासदांना याचा मोफत लाभ मिळणार असल्याने आनंत व्यक्त करण्यात येत आहे. यावेळी जगन सूर्यवंशी, शंकर चव्हाण, मोहसीन पांढरे, मधुकर चव्हाण, गणी दालिंबकर, जोहर पांढरे, महेबूब डाळिंबकर, सुलेमान देशमुख,रहीम पटेल, शिवाजी सूर्यवंशी, पत्रकार जावेद मुजावर सोसायटीचे संचालक व इतर ही सभासद उपस्थित होते. या निर्णयाचे सभासदाराकडून स्वागत केले जात आहे.



## आ. अमित देशमुख यांच्या हस्ते माता वैष्णोदेवीची आरती

**लातूर, दि. १३ ऑक्टोबर-**

राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री तथा लातूरचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या हस्ते लातूर शहरातील आदर्श कॉलनी परिसरातील माता वैष्णोदेवीची आरती करण्यात आली. यावेळी आमदार देशमुख यांनी उपस्थितांना विजयादशमीच्या शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष किरण जाधव, ट्वेंटीवन शुगरचे व्हा. चेअरमन विजय देशमुख, डॉ.कल्याण बरमदे, वैष्णोदेवी सार्वजनिक नवरात्र महोत्सव, आदर्श कॉलोनी, लातूर ट्रस्ट अध्यक्ष दिनेश भंडारे, सचिव प्रसाद डीगे, उत्सव अध्यक्ष आदेश शेटे, उमेश पाटील, संतोष चव्हाण, दीपक जाधव, संकेत उडगे, गुरुशांत डोने, डॉ.मनोज देशमुख, अमोल शिंदे, अजय पाटील, नामदेव जाधव, अभिजीत पाटील, विजय पाटील उपस्थित होते.



## यशोधरा मंडळाच्या वतीने धम्मचक्र प्रवर्तन दिन साजरा

**अहमदपूर, दि. ८ ऑक्टोबर-**

अशोका विजयादशमी व धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या निमित्ताने प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी तथागत चौक, सैनिक कॉलनी अहमदपूर येथे यशोधरा महिला मंडळाच्या वतीने धम्मचक्र प्रवर्तन दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात महामानव तथागत भगवान गौतम बुद्ध व विश्वरत्न बोधिसत्व परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पूजन महिला मंडळाच्या अध्यक्षा विजया गायकवाड, सचिव तेजस्विनी वाघमारे यांच्या हस्ते करून करण्यात आली. धम्म चक्र प्रवर्तन दिनानिमित्त पंचशील ध्वजाचे ध्वजारोहण प्रमुख पाहुणे स्वाभिमानी शिक्षक संघटनेचे विभागीय अध्यक्ष शिक्षक नेते बाबासाहेब वाघमारे यांच्या हस्ते करण्यात आले. ध्वजारोहणानंतर सामूहिकरित्या त्रिशरण पंचशील ग्रहण करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे माजी पोलीस अधिकारी धर्मपाल गायकवाड यांनी उपस्थित सर्वांना अशोका विजयादशमी व धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त माजी पोलीस अधिकारी धर्मपाल गायकवाड, शिक्षक नेते बाबासाहेब वाघमारे, विद्यासागर कोकणे, राजकुमार गायकवाड व यशोधरा म हिला मंडळाच्या सदस्या आरती कोकणे, जयश्री गायकवाड, विमल बनसोडे, त्रिशला अंधोरीकर, मीनाक्षी कांबळे, छाया गायकवाड, वैशाली गायकवाड, वर्षा वाघमारे, सुशीला इंगळे, रमाबाई परतवाघ, रेशम तलवारे उपस्थित होते. प्रास्ताविक व सूत्रसंचालन विद्यासागर कोकणे यांनी केले तर आभार राजकुमार गायकवाड यांनी मानले.

## गुरूजी आयटीआयमध्ये उद्योजकता शिबीर

**लातूर, दि. १३ ऑक्टोबर-**

श्री गुरूजी आय टीआय विद्यार्थ्यांना आत्मनिर्भरतेचे धडे मिळावेत तंत्र शिक्षणसोबतच विद्यार्थी आत्मनिर्भर व्हवा या साठी श्री गुरूजी आयटीआय मध्ये उद्योजकतावर मोटीव्हेशनल व्याख्याते लक्ष्मीकांत माळवदकर यांचे उद्योजकतावर शिबीर आयोजीत करण्यात आले होते. शिबीरा नंतर विद्यार्थ्यांची अभाविपच्या वतीने उद्योजकता विकास यात्रा काढण्यात आली यातून विद्यार्थी प्रेरीत होऊन त्याच्यातील उद्योगकतेचा विकास व्हावा हा हेतू साध्य करण्यात आला. यावेळी योग शिक्षक डॉक्टर पंकज तेरकर प्राचार्य अविनाश पाटील, शिक्षक, निदेशक, कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

# बळीराजाच्या पाठीमागे महायुती सरकार

### आ. पाटील-निलंगेकर

### साल्वंट सोयाबीन प्रकल्प युनिटचे उद्घाटन

**तभा वृत्तसेवा,**
**निलंगा, दि. १३ ऑक्टोबर-**

राज्यातील महायुती सरकार हे शेतकरी शेतमजूर यांच्या पाठीमागे खंबीरपणे उभे असून त्यांच्या विकासासाठी सदैव तत्पर आहे, असे प्रतिपादन आ. संभाजीराव पाटील-निलंगेकर यानी साल्वंट सोयाबिन प्रकल्प युनिट २ उद्घाटन प्रसंगी केले आहे.

यावेळी व्यासपिठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष माजी खासदार रूपा पाटील-निलंगेकर, नर्मदा साल्वंटचे चेअरमन डॉ. महेश क्षिरसागर, मंगेश पाटील, कुमोद लोभे, काशिनाथ गरीबे, सभापती शिवकुमार चिंचनसुरे, नरसिंग बिरादार, सदाशिव पाटील, दगडू सोळुंके, बाळासाहेब शिंगाडे मधुकर माकणीकर, बंडू नाईकवाडे, अंगद नाईकवाडे, माधवराव नाईकवाडे उपस्थित होते.

पुढे बोलताना निलंगेकर म्हणाले, सोयाबिन तफावत रक्कम, अतिवृष्टी, नुकसानभरपाई पिकविमा असे मिळून या महायुती सरकारने




प्रत्येक शेतकऱ्यांना ४० हजार रूपये रक्कम शेतकऱ्यांना ऐन दिवाळीत देणार असून यावर्षीची शेतकऱ्यांची दिवाळी गोड होणार आहे.गेल्या चौदा वर्षापासून बंद पडलेला अंबुलगा कारखाना चालू करून ऊस उत्पादक शेतकऱ्यांना जिल्ह्यात सर्वात जास्त भाव आपण दिला आहे. २० वर्षात आपण जेवढा तालुक्याचा विकास केला आहे.तेवढाच विकास आपण येणाऱ्या पाच वर्षात करू आणि तालुक्याचा चेहरामोहरा बदलू असे भावनिक साद यावेळी उपस्थिताना आमदार निलंगेकर यानी घातली आहे. प्रास्तविक कंपनीचे व्यवस्थापक हणमंत सौदागर यानी तर सूत्रसंचालन महादेव मेहकरे यानी केले आहे.

दस-याच्या मोहर्तावर या कारखान्याचे भूमिपूजन केले असून शेतकऱ्यांच्या जीवनात आर्थिक क्रांती होईल व शेतकरी वनवन भटकू नये म्हणून कारखाना नव्याने चालू केला असून या भागातील शेतकरी सुखी समाधानी जीवन जगावे व त्यांचे मुलबाळ चांगल्या दर्जाचे शिक्षण घ्यावे यासाठी हा सोयाबिन प्रक्रिया प्रकल्प आपल्या तालुक्यातील संभाजीरावानी आणला असून ख-या आर्थाने सर्वानी कामाला लागावे व संभाजीरावाच्या विजयाचा गुलाल उधळावा असा संदेश माजी खासदार रूपा पाटील-निलंगेकर यांनी दिला.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शांतीचा मार्ग दाखवला : क्रीडा मंत्री संजय बनसोडे

**तभा वृत्तसेवा,**
**उदगीर, दि. १३ ऑक्टोबर-**



१४ ऑक्टोबर १९५६ रोजी दीक्षाभूमी, नागपूर येथे विश्वरत्न, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बौद्ध धर्म स्वीकारून आपल्या सर्वांच्या जीवनाला दिशा दिली. आज आपली जी प्रगती आहे ती महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेली देणगी असून आपण आयुष्य जगत असताना विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आपणास बुध्दांचा शांतीचा मार्ग दाखवला असुन आपण सर्वांनी त्यांच्या तत्वांचे अनुकरण करून आपण आपले जीवन सुखी करावे, असे मत राज्याचे क्रीडा व युवक कल्याण, बंदरे मंत्री संजय बनसोडे यांनी व्यक्त केले.

ते उदगीर शहरातील तळवेस येथे उभारण्यात आलेल्या विश्वशांती बुद्ध विहारात धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त आयोजित महाबुद्ध वंदने नंतर समाज बांधवांना संबोधित करत होते. यावेळी भन्ते नागसेन बोधी, भिक्कु संघ , समाजातील प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते. पुढे बोलताना नामदार संजय बनसोडे म्हणाले, गुलबर्गा येथील बुद्ध विहाराप्रमाणे उदगीर शहरातील तळवेस येथे भव्य बुध्द विहार उभारुन या विहाराचे लोकार्पण महामहिम राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते केले. आपल्या समाजामध्ये महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आचार, विचार आपल्या पुढच्या पिढीमध्ये रुजावे म्हणून या विहाराची निर्मिती केली असून आपल्या येणाऱ्या प्रत्येक पिढीला हे विहार प्रेरणा देईल. भविष्यात विश्वशांती हे बुद्ध विहार एक संस्कार केंद्र म्हणून ओळखले जावे असा विश्वास ना.बनसोडे यांनी व्यक्त केला. प्रारंभी ना. बनसोडे तथागत भगवान बुध्द आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

## माजी गृहमंत्री शिवराज पाटील यांचा सत्कार

**लातूर, दि. १३ ऑक्टोबर-**

लातूर देशाचे माजी गृहमंत्री मा.शिवराज पाटील चाकुरकर यांच्या वाढदिवसा निमीत्त लातूरचे माजी आमदार व भाजपा किसान मोर्चा गोवा व गुजरात प्रभारी शिवाजीराव पाटील कव्हेकर साहेबांनी देवघर या पाटील लातूर येथील निवासस्थानी जाउन त्यांचे पुष्पगुच्छ देउन सत्कार केला. या वेळी पाटील यांच्या बरोबर लातूर व राष्ट्रीय प्रश्नावरती चर्चा झाल्याची माहिती शिवाजी पाटील कव्हेकर यांनी दिली.



## तरुण पिढीने धम्माचे आचरण करावे : अरविंद कांबळे

**तभा वृत्तसेवा,**
**निलंगा, दि. १३ ऑक्टोबर-**

आजचा नवतरुण समाज दिवसेंदिवस अंधश्रध्दा कर्मकांडात अधिक प्रमाणात रुतत चालला आहे. याकरिता आजच्या तरुण पिढीने बाबासाहेबांनी दिलेल्या मार्गाने चालून कर्मकांडाचा व अंधश्रद्धेचा त्याग करून धम्माचे आचरण करावे असे मत येथील जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते, विचारवंत तथा माजी उपनगराध्यक्ष अरविंद कांबळे यांनी व्यक्त केले.

ते विजयादशमी दिनानिमित्त डॉ.बाबासाहेब आंबेडकर पार्क येथे आयोजित करण्यात आलेल्या अभिवादन सभेस संबोधित करीत होते. यावेळी ज्येष्ठ विधीज्ञ जे. बी.(दादा) सूर्यवंशी, अरविंद कांबळे, रजनीकांत कांबळे,विजयकुमार सूर्यवंशी,इंद्रजित कांबळे,धम्मानंद काळे,संतोष गायकवाड,छगन सूरवसे, विशाल गायकवाड,रोहन सूरवसे, स्वप्नील कांबळे जितू कांबळे,पांडुरंग पात्रे,जेष्ठ महीला प्रतीनिधी गुणा कांबळे, शिलाबाई कांबळे उपस्थित होते. कांबळे पुढे म्हणाले, बाबासाहेबांनी दिलेल्या २२ प्रतिज्ञा पैकी एकाही प्रतिज्ञाचे पालन करीत नाहीत.त्यामुळे पुन्हा एकदा बहुजन (बौद्ध) समाज गुलामगिरीच्या खाईत जात असल्याची खंतही त्यांनी यावेळी व्यक्त केली. कार्यक्रम यशस्वीतेसाठी इंद्रजित कांबळे व विशाल गायकवाड यांनी परिश्रम घेतले.

# अहमदपुरात दसरा महोत्सवात प्रवचन, रावण दहन

**तभा वृत्तसेवा,**
**अहमदपूर, दि. १३ ऑक्टोबर-**

अनादी काळापासून देशातील नारीशक्ती ही महान असून या आदिशक्ती वरच पृथ्वी चालत असते परंतु जगविख्यात साम्राज्य असलेला रावण परस्त्रीच्या अध्यपथनामुळे आणि त्याच्यातील असलेल्या अहंकारामुळे त्याच्या राज्याचा सर्वनाश झाला असे प्रतिपादन वीरमठ संस्थानचे मठाधिपती तथा युवा संत राजशेखर गुरु शिवलिंग शिवाचार्य महाराज यांनी केले.

सार्वजनिक दसरा महोत्सव समितीच्यावतीने अहमदपूरचे महात्मा गांधी महाविद्यालयाच्या दसरा मैदानावर आयोजित प्रवचन व नयनरम्य आतिषबाजी आणि रावण दहन सोहळ्या त आशीर्वचन पर बोलत असताना व्यक्त केले.

यावेळी व्यासपीठावर भागवतकार ह भ प परमपूज्य अनंत महाराज बेलगावकर, भक्ती स्थळाचे प्रमुख परमपूज्य आचार्य गुरुराज स्वामी महाराज, आमदार बाबासाहेब पाटील, उपजिल्हाधिकारी मंजुषा लटपटे यांच्यासह मान्यवरांचे उपस्थिती होती.

यावेळी हभप अनंत महाराज बेलगावकर म्हणाले की, सबंध देशामध्ये नारीशक्तीचा सन्मान करा स्त्रियावर अन्याय अत्याचार करू नका. या समयी आचार्य गुरुराज स्वामी महाराज म्हणाले की भारतीय संस्कृती म्हणजे संस्कार आणि स्त्रियांचा सन्मान करणारी संस्कृती असल्याचे सांगितले. प्रास्ताविक सार्वजनिक दसरा महोत्सव समितीचे अध्यक्ष ॲड. अजिंक्य चामे यांनी सूत्रसंचालन राम तत्तापुरे यांनी तर आभार सतीश सूर्यवंशी यांनी मांनले. या समयी सामाजिक कार्यकर्ते मोहसीन बायजीत यांचे मनोगत पर भाषण झाले.कार्यक्रमाचा शुभारंभ तहसीलदार उज्वलाताई पांगरकर यांच्या हस्ते शमिपूजन करून करण्यात आला. या सोहळ्यामध्ये राजेश्वरी देवीची पालखी ब्राह्मण गल्लीतून, परमपूज्य मडिवाळ शिवाचार्य महाराज यांची पालखी, देशी स्वामी महाराज मेना, मलसिद्ध महाराज पालखी यांची महादेव गल्ली मधून वाजत गाजत शहराच्या प्रमुख रस्त्यावरून दसरा मैदानावर आगमन झाले. रावण दहन उपजिल्हाधिकारी तथा नगरपरिषदेच्या प्रशासक मंजुषा लटपटे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी देणगीदारांचा उपस्थित असलेल्या गुरुमाऊलींच्या हस्ते स्मृतीचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे सरचिटणीस शिवानंद हेंगणे, भाजपाचे जिल्हाध्यक्ष



दिलीपराव देशमुख, काँग्रेसचे सरचिटणीस सांब महाजन, भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष बालाजी पाटील चाकूरकर, भाजपाचे जिल्हा चिरचिटणीस ॲड. भारत चामे, डॉ. मधुसूदन चेरेकर, संस्थापक मार्गदर्शक, डॉ. अशोक सांगवीकर, ओम पुणे, सूर्यकांत आय्या, माधवराव पुणे, गोविंद गिरी, अश्विनी कासनाळे, लक्ष्मीकांत कासनाळे, अभय मिरकले, मुख्याधिकारी संतोष लोमटे, प्रा. विश्वंभर स्वामी, ॲड. निखिल कासनाळे, बालाजी पाटील मनकरी, अझहर बागवान, जीवन कुमार मददेवाढ, शिवकुमार उटगे, केदारनाथ काडवादे,दयानंद पाटील यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती होती. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जयराज तेलंग, वैभव बल्लोरे, ॲडव्होकेट ऋषिकेश गुट्टे, योगेश शेटकार, बालाजी काडवादे, नितीन धर्माधिकारी, राम पाटील, सुभाष गुंडिले यांनी परिश्रम घेतले.

# लातुरात ११० किलो रांगोळीतून रेखाटले श्रीराम

**तभा वृत्तसेवा,**
**लातूर, दि. १३ ऑक्टोबर-**

नवरात्र महोत्सवाचा उत्साह शिगेला पोहचला आहे. नवरात्री मध्ये दुर्गा मातेच्या धार्मिक पूजाअर्चनासोबत विविध देवींच्या मंदिरात, सार्वजनिक नवरात्र महोत्सवात सामाजिक, सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. लातूर शहरातील जुन्या औसा रोड परिसरात असलेल्या श्री कालिकादेवी मंदिरात काही कलाकारांच्या वतीने भव्य दिव्य अशी रांगोळी रेखाटली आहे.



यामध्ये जवळपास विविध १२ रंगाच्या ११० किलो रांगोळीच्या उपयोगातून २० बाय ३० म्हणजेच जवळपास ६०० स्क्वेअर फुट जागेवर भव्य अशी प्रभू श्रीरामचंद्रांची प्रतिमा साकारली आहे. यासाठी पाच युवक-युवती मिळून जवळपास ४० तासांच्या कालावधीत ही प्रतिमा साकारली आहे. लातूर शहरातील काही कलाकार आजही आपली संस्कृती, परंपरा आपल्या कलेतून जोपासत आहेत. यामध्ये नवरात्र महोत्सवानिमित्त शहरातील श्री कालिकादेवी मंदिर येथे विविध धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये भव्य दिव्य

अशी रांगोळी काढली आहे. यासाठी युवा कलाकार संकेत बारस्कर यांच्या मार्गदर्शनाखाली स्वप्ना पंडित, वैष्णवी पंडित, निकिता प्रदीप पोतदार आणि आकाश अमोल दैठणकर यानी परिश्रम घेतले. हे युवक-युवती ६०० स्क्वेअर फुट जागेवर प्रभू श्रीरामचंद्राची प्रतिमा रेखाटली. दिवसभर मंदिरात भाविकांची रेलचेल पाहता रांगोळी रेखाटण्याचे काम हे रात्री केले.

गतवर्षी नवरात्र महोत्सव-२०२३ मध्ये ध्यानस्थ मुद्रेत असलेल्या श्री हनुमान भगवंतांचे दर्शन रांगोळी देखाव्यांतून घडवले गेले होते. शिवाय निरनिराळ्या उत्सवांमध्ये शंकर भगवानांचा रुद्र अवतार, देवी आरती करताना छत्रपती शिवाजी महाराज, ज्ञानेश्वर महाराज, कालिया मर्दन कृष्णा अवतार, बालाजी, महाकाली रुद्र अवतार अशा बरेच रांगोळ्या यापूर्वीच्या वर्षामध्ये काढल्या. या नवरात्र महोत्सवात प्रभू श्रीरामांची जवळपास ११० किलो विविध रंगांच्या रांगोळी पासून प्रतिमा साकारली आहे.

साकारलेली ही भव्य रांगोळी दसऱ्यापासून कोजागरी पौर्णिमेपर्यंत भाविकांना, नागरिकांना पहावयास मिळणार आहे. सर्व कलाकार दैनंदिन कामकाज सांभाळत काम करताहेत. मंगळवार, दि. ८ ऑक्टोबरपासून ही रांगोळी काढण्यास सुरूवात झाली आहे. दरम्यान, शनिवार, दि. १२ ऑक्टोबर रोजी विजयादशमी दिवशी भाविकांना ही भव्य दिव्य रांगोळी पाहता आली.

## परतीच्या पावसाने शेतकरी चिंतेत

**तभा वृतसेवा,**
**शिरूर अनंतपाळ, दि.१३ ऑक्टोबर-**

तालुक्यातील हिप्पळगाव, गणेशवाडी, कांबळगा, थेरगाव, आरी, लक्कडजवळगा शिवपुर परिसरातील शेतकऱ्यांनी सकाळी कडक सुर्य प्रकाश पडल्यामुळे मजूरांमार्फत सोयाबीन काढण्याची लगबग सुरू केली होती.



या लगबगीत मजूर एकचित्त असतानाच अचानक वातावरणात बदल झाला आणि बघता बघता पावसाने रौद्र रूप धारण केले. त्यामुळे शेतकरी व शेतमजूरांची एकच धावपळ उडाली. गेल्या काही दिवसांपासून पावसाने उघडीप दिल्याने शेतकरी शेतमजूरांच्या मदतीने काढणीला आलेल्या सोयाबीनचे गुत्ते पद्धतीने किंवा रोजंदारी पद्धतीने सोयाबीन काढणे किंवा अंतर्गत पिक न घेता फक्त सोयाबीनचे पीक घेतले आहे अशा ठिकाणी हर्वेस्टरच्या साह्याने रास करणे या कामाला वेग आला आहे. दि. १६ व १७ ऑक्टोबर या तारखेपर्यंत हवामान खात्याने परतीच्या पावसाचा अंदाज दिला असल्यामुळे शेतकरी तसेच गुत्तेदार सद्या चिंतेच्या वातावरणात आहेत. या पावसामुळे शेतमजुरांना मजूरीचा पाहिजे तो भाव मिळत असल्याने मजूर खूष तर शेतकरी नाखुष आहेत. आगाऊचे पैसे मोजण्यात आले तर चालेल परंतु रानावरचे सोयाबीन एकत्रित करून गंजी लागली आणि त्यावर ताडपत्री, मेनकापड झाकले तर आम्ही समाधानी आहोत असे शेतकरी वर्गातून बोलले जात आहे.